म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ........ आ. वा.
दा. क्र. १२२

BVBK-0400922

वाचनालय
बाल वाङ्मय विभाग
दिनांक
विषय ९२२
BVBK-0400922

सूर्यग्रहण
(संक्षिप्त आवृत्ती)

## १, पुरश्चरणाचे पवित्र स्थान

BVBK-0400922

परळीच्या डोंगरावरील एक खबदडीचा ... र्वांची समजूत अशी की, त्या भागाकडे गेल्यास समर्थांच्या नाराजीस ापण कारण होऊ. यामुळे त्या बाजूस कधीही कोणी जात नसे. समर्थ एकटे जात. ते तिकडे गेले असता त्यांच्या अत्यंत एकनिष्ठ शिष्यांपैकी दोघाचौघास काही कारणापरत्वे त्यांची गाठ घेण्याची जरूर पडली, तर त्यांना जाण्याची मुभा असे. समर्थांच्या दर्शनासाठी अत्यंत उत्सुक अशा कित्येक गृहस्थांनी एक दोन वेळा तिकडे जाऊन समर्थांचे दर्शन घेण्याचा खटाटोप केला होता; परंतु ते थोडीशी वाट चालून गेले न गेले, तों वाटेत हजारों विंचू, इंगळ्या, साप असे भयंकर प्राणी त्यास दिसले. त्याबरोबर त्यापैकी काहींनी मुकाट्याने मागल्या पावलीच घरची वाट धरली. एक दोघे थोडे धीट होते, ते जरा पुढे तसेच जातात तों तीन अक्राळ विक्राळ वाघ त्यांच्या दृष्टीस पडल्याबरोबर त्यांची पुरीच गाळण उडाली; आणि समर्थांच्या मनात आपल्याला दर्शन द्यावयाचे नाही, असा पोक्त विचार करून समर्थास तेथूनच वंदन करून ती मंडळी परत फिरली. लोकात अशा अनेक वार्ता असल्यामुळे समर्थ त्या बिकट स्थळाकडे जाऊन बसले आहेत असे कळले की, कोणी त्या मार्गाला जायचा नाही. केवळ एक श्रीधरस्वामी, कल्याण-वामी व वेणुबाई ही तिघे तिकडे वाटेल त्या वेळी जात. त्यांना कधी विंचवासापांची व लांडग्यावाघांची भीती वाटली नाही. श्रीसमर्थ रामदास-वामी त्या बिकट जागेतून पलीकडे कोठे तरी गुहा आहे; तेथे जाऊन तपश्चरण करीत असतात अशी सर्वांच्या मनाची समजूत होती, परंतु ती गुहा इतरेजनांना कधीच दिसली नाही. कित्येक असेही सांगत की, शिवाजी-महाराजांचे गुरू समर्थ, तेव्हा त्यांच्याजवळ जावळीच्या चंद्ररावाच्या मृत्यूची

हकीकत सांगण्यासाठीं त्याचा भाऊ मोठी हिंमत करून त्या गुहास्थानाकडे जाण्यास निघाला. त्याने वाटेत कित्येक भुजंग मारले, वाघांचा समाचार घेतला काटेरी कुंपण तोडून तो पुढे जाऊ लागला, तों त्याच्या कानी धीरगंभी वाणीने उच्चारलेले पुढील शब्द कानी पडले; "बाबारे, पुढं येऊ नको. काय सांगणार ते अंतर्ज्ञानानं मला आधीच कळलं आहे. झालं त्यात शिवबाचा काही बाक नाही. शहाणे होऊन त्यालाचं आता साहाय्य करा, नाही तर फुकट मराल. पण तुम्ही त्याला साहाय्य देणार नाही. त्याच शत्रू लवकरच तुमच्याकडे साहाय्य मागेल तेव्हा त्याला द्याल. तुमचे मु मला दिसायला नको." हे शब्द ऐकल्याबरोबर असा अंतर्ज्ञानी पुरुष आप पाहिला नाही, तर आपला जन्म व्यर्थ असे त्याच्या मनात येऊन तो मार्ग तील अडचणी निवारून दूर करीत जरा पुढे जातो तों काट्याच्या कुंपणा आग लागली आणि तो बेशुद्ध होऊन पडला; आणि जागा होऊन पाहतं तों आपण आपल्या ओळखीच्या जावळीच्या रानात आहो असे त्यास दिसले. त्याने आपला अनुभव आपल्या लोकास सांगितल्यावर हां हां म्हणता ती बातमी सगळीकडे पसरली. तेव्हापासून समर्थांचे दर्शन घेण्या साठी उत्सुक अशा लोकांना असे कळले की, स्वामी आपल्या पुरश्चरणाच्या पवित्र स्थळी जाऊन बसले म्हणजे प्रत्यक्ष दर्शनाची उत्सुकता दाबून ठेऊन केवळ पादुकांचे दर्शन घेऊनच आपण आपल्या चित्ताचे समाधान करून घ्यावे.

जावळीकर चंद्ररावाच्या बंधूंपैकी एकाची ही गोष्ट दिगंत झाल्या पासून समर्थांची कीर्तीही दिगंत झाली; अर्थात् लोकांची त्यांच्या दर्शनाविषयं उत्सुकताही फार वाढली. पहिल्यापेक्षा जास्त लोक त्यांच्या दर्शनाकरिता येऊ लागले. परंतु पुरश्चरणाच्या पवित्र स्थानापर्यंत चारपाच व्यक्तींखेरीज कधीच कोणाचे पाय पोचले नाहीत. वर्षातून कधी अकरा दिवस, क एकवीस दिवस, कधी एकशे एकवीस दिवस, परंतु एकंदरीत चार महि तरी समर्थ त्या पुरश्चरणाच्या स्थळी जाऊन प्राचीन काळच्या ऋषींप्रमा उग्र तपश्चर्या करीत असत. त्यावेळी सर्वांना,—अत्यंत भक्त म्हणून मानलेल्या शिष्यांनासुद्धा—अशी सक्त ताकीद असे की, विशेष कारण असल्या खेरीज आमचा तपोभंग करण्यास कोणी येऊ नये. यामुळे कल्याणस्वाम

श्रीधरस्वामी व वेणुबाई ही मंडळींसुद्धा फारच क्वचित तिकडे जात. पुरश्चरणास स्वामी बसले म्हणजे त्यास आहाराची मुळीच आवश्यकता असावयाची नाही. अर्थात अमूक कारणाकरिता कोणी जाणे अवश्य आहे असे कारणच निघणे मोठे मुष्किलीचे होते. फक्त पुरश्चरण संपण्याच्या दिवशी सकाळीच कल्याणस्वामी, श्रीधरस्वामी व वेणुबाई तेथे जात.

आमची ही कथा ज्या दिवशी सुरू होत आहे, तो दिवस अशा काही विशेष कारणाचा होता. समर्थांच्या उपोषणाचा आजचा एकविसावा दिवस होता. तेव्हा सायंकाळी स्वामींचे पुरश्चरण समाप्त होऊन त्यांनी थोडासा आहार घेण्याचा संभव. तेव्हा वर सांगितलेली तीन मंडळी काही आहारसामुग्री घेऊन तेथे जाण्यास निघाली होती. त्यास अर्थातच वाटेत विंचू , साप, वाघ किंवा लांडगे यांच्यापासून काही त्रास झाला नाही. ती मंडळी सरळ चालली होती.

ते स्थान अतिशय रम्य—झाडी दाट, एका बाजूस उंच सुळक्या-सारखा वर गेलेला डोंगर, दुसऱ्या बाजूस सुंदर छायेच्या वृक्षांची राई, नाना प्रकारचे सुस्वर काढणारे पक्षी खुशाल इकडून तिकडे हिंडताना दिसायचे. जणू काय आपण या स्थानातल्या वृक्षांवर आहो हे आपले महाभाग्य आहे, याची त्यासही जाणीव होती! त्या स्थानास एक तर नैसर्गिक सौंदर्य होतेच; परंतु त्याशिवाय स्वामींच्या तपस्तेजाचाही प्रभाव त्याच्या सौंदर्यास विशेष दर्शनीयता आणीत असला पाहिजे. वरील मंडळी त्या छायामय मार्गाने पुढे गेल्यानंतर, काही अंतरावर एकदम सर्व अशा जागी आले की, तेथे डोंगराच्या वरच्या बाजूस एका खबदडीत हिरवीगार करवंदीची जाळी होती. त्या खबदडीच्या आजूबाजूला सुमारे दोनशे पावलांच्या परिघावर ती जाळी पसरलेली; जाळीत शिरले की काही अंतरावर एक विवर लागे. आत डोकावून पाहिले असता प्रथम अंधार-- अगदी काळाकुट्ट अंधार; परंतु अंधारात शिरावयाचे असा निश्चय करून आत मान घातली व थोडे पुढे गेले की, ती तपस्तेजाने देदीप्यमान दिसणारी समर्थमूर्ती दृष्टीस पडून आपण पवित्र झालो, आपल्या अंतःकरणा-तील अंधःकार गेला, असे कोणाही प्रेक्षकास वाटल्याखेरीज राहत नसे. विवराच्या भोवती असलेल्या जाळीत एकही पक्षी किंवा कीटक नव्हता. तेथे

यत्किंचितसुद्धा शब्द होत नसे. शांतता केवळ मूर्तिमंत नांदत होती. प्राचीन काळच्या ऋषींच्या तपोवनांचे वर्णन करताना संस्कृत कवी प्रशांत रमणीय असे त्यास विशेषण लावीत असत. तेच विशेषण समर्थांच्या या सर्व लोकांच्या उपसर्गापासून अगदी अलिप्त अशा तपश्चरण–स्थानाला अगदी यथार्थपणे लाविता येईल. त्या प्रशांत रमणीय स्थानी पाऊल घालून त्या काळी ते ऐश्वर्य ज्याने पाहिले, त्याची धन्यता काय वर्णन करावी! एवढेच की, तेथे पाऊल घालण्याचे व ते स्थान पाहण्यास मिळण्याचे भाग्य फारच थोड्यांना असे. समर्थ पृथ्वीवर होते, तेव्हा सुद्धा या स्थानाचे दर्शन फार थोड्यास प्राप्त होई हे आतापर्यंतच्या एकंदर वर्णनावरून वाचकास दिसून आलेच असेल. परंतु या स्थानाच्या पुण्यदर्शनापासून आमच्या नव्या कथेचे उद्‌घाटन होत आहे आणि न जाणो या स्थानाच्या पुन-र्दर्शनानेच कथेचा समारोप होईल.

वर सांगितलेली तीन मंडळी त्या जाळीजवळ जाऊन पोचली. त्यांनी कानोसा घेतला तेव्हा त्यांना दिसले की, स्वामींचे पुरश्चरण चालूच होते. त्यांची पूर्ण समाधी लागली होती; आणि ती लवकरच उतरेल असा रंगही दिसत नव्हता. तथापि तो शेवटला दिवस असल्यामुळे त्यांना तेथे थांबणे अवश्यच होते. म्हणून ती तीनही मंडळी त्या विवरापासून काही अंतरावर बसली. तेथे बसल्यावर श्रीधरस्वामी कल्याणस्वामीस म्हणाले, “ महाराज बरेच दिवसात इकडे आले नाहीत. तिकडील हालहवाल कशी काय आहे कोण जाणे! बाकी समर्थांना काही तरी पत्र यायचं. ते आलेलं नाही तेव्हा काही तरी मोठ्या कारस्थानात गुंतले असले पाहिजेत महाराज.”

“ विलक्षण पुरुष आहे-बोवा तो! समर्थांना जसा शिष्य पाहिजे तसा तो आहे यात काही शंका नाही. नाही तर आम्ही! त्यांची पुरती सेवासुद्धा आमच्यानं होईना. छत्रपती शिवाजी खरा शिष्य असून कोणाला सुद्धा ते माहीत नाही. आमचा मात्र डांगोरा पिटला जातो आहे खरे शिष्य म्हणून. समर्थांना तरी महाराजांची केवढी काळजी! काय असेल ते असो, इतके लोक दर्शनासाठी येतात, परंतु त्यांना समर्थांचे दर्शन सुद्धा होत नाही. आणखी महाराजांना! महाराजांचा उलटा निदिध्यास यांना लागलेला आहे!”

त्यावर वेणुबाई मध्येच म्हणाल्या, “ बाबांनो, जसं नरनारायणाचं

नातं, तसंच हे महाराजांचं आणखी समर्थांचं नातं आहे. त्यांची बरोबरी आपण करण्याचं मनात तरी आणावं कशाला? महाराजांच्या चरित्रावर यांची फार सूक्ष्म दृष्टी असते. महाराजांच्या हातून जगाच्या कल्याणाची अशी कितीक तरी कार्ये करावयाची असा त्यांचा संकल्प."

अशा त्या तिघांच्या शिळोप्याच्या गोष्टी चालल्या असता आतून बुभुःकार ऐकू आला. त्याबरोबर ती तीनही मंडळी त्या विवराकडे गेली, तों श्रीस्वामी रामनामाचा मोठमोठ्याने जयजयकार करीत आहेत असे दिसले. ही तिघेही त्यांच्या समीप गेली. स्वामी रामनामाचा अगर बलभीमाचा जयजयकार करीत होते; परंतु त्यांचे मन अद्यापि पृथ्वीतलाकडे आलेले नव्हते असे स्पष्ट दिसले. नंतर हळू हळू त्यांनी डोळे उघडले आणि त्यांची पहिली दृष्टी श्रीधरस्वामीकडे गेली. त्याबरोबर त्यास ते म्हणाले, "काय श्रीधरस्वामी, सूर्यग्रहणाचा योग आहे हे कळलं आहे का आपल्याला? काही काळपर्यंत अगदी खग्रास सूर्यग्रहणाचा योग आहे!" स्वामींच्या या बोलण्याचा त्या तिघासही अर्थ समजला नाही. स्वामी आपले इतके दिवसांचे पुरश्चरण संपवून उठल्याबरोबर पहिल्या प्रथम बाहेरच्या बाजूस जाऊन वरून खळखळ वाहत येणाऱ्या झऱ्याजवळ जाऊन आचमन वगैरे करावयाचे, तोपर्यंत एक अक्षरसुद्धा बोलावयाचे नाहीत. परंतु आज एकदम समाधी उतरल्याबरोबर, "सूर्यग्रहणाचा योग आहे" असे का म्हणू लागले? श्रीधरस्वामींनी अनेक प्रकारे तर्क केले, परंतु एकही तर्क जुळेना. समर्थ तर एकसारखे म्हणत: "एकूण सूर्यग्रहणाचा – काही काळ-पर्यंत खग्रास सूर्यग्रहणाचा—योग आहे! केतु ग्रास करण्याला सोडीत नाही. पण .. पण काही हरकत नाही. ग्रासातून मोक्ष होईल, आणि सूर्य विशेषच तेजःपूंज दिसू लागेल. त्याबद्दल काळजी करण्याचे विशेष कारण नाही."

समर्थांचे हे भाषण कोणाला उद्देशून असे नव्हते. पहिल्याने जरी ते श्रीधरस्वामींना उद्देशून बोलले, तरी हे पाठीमागले बोलणे स्वगतच होते असे दिसले.

★ ★ ★

# २. तीन प्रवासी

समर्थांच्या पुरश्चरणास बसण्याच्या विवरात वरील प्रकार चालला होता. त्याच दिवशी प्रातःकाळी तेथून सुमारे चार कोसांवर (म्हणजे आठ मैलांवर) तीन प्रवासी घोडेस्वार सावकाशपणे आपल्या सभोवतालची सृष्टिशोभा पाहत स्वामींच्या मठाकडेच येत होते. त्यापैकी एक मोठ्या थोरल्या काळ्या घोडीवर बसला होता. त्याचा बांधा अगदी ठेंगणा, चेहरा किंचित लांबट, नाक पोपटाच्या चोचीसारखे, पण मोठे आणि लांब, डोळे अत्यंत पाणीदार की, त्याच्या योगाने हा पुरूष अगदी असामान्य असावा असे तेव्हाच कोणाच्याही लक्ष्यात आले असते! त्याचप्रमाणे दृष्टी इतकी तीक्ष्ण की, ती कोणाच्या चेहेऱ्याकडे लागली असल्यास त्याला आपल्या अंतःकरणात एखाद्या तीराचे टोकच बोचत आहे असे वाटून त्याने अगदी अस्वस्थ व्हावे. परंतु विशेष मजा ही की, हा गृहस्थ ज्याच्याकडे आपली कृपादृष्टी फिरवील, तो त्याच्या त्या कृपादृष्टीने आपणावर मोठे छत्र उभारले आहे असे समजेल; असा काही तीत प्रभाव होता. त्याचा चेहरा मोठा गंभीर व उदात्त आणि नेहमी मन विचारमग्न आहे असे दाखवीत असे. त्याची घोड्यावरील बैठक व त्याची शस्त्रास्त्रे असे दाखवीत की, हा पुरुष घोड्यावर बसण्यासाठी व शस्त्रास्त्रे बाळगून पीडितांचे रक्षण करण्यासाठीच जन्माला आला आहे.

दुसरा त्याच्या बरोबरीचा गृहस्थ या पहिल्या गृहस्थापेक्षा थोडा उंच होता. त्याचा चेहरा फार आनंदी व विनोदी दिसे. तिसरा माणूस या दोघांचा नोकर असावा. पहिल्या दोघांपैकी विनोदी गृहस्थ मध्येच म्हणाला, "हं! जसवंतसिंग आणखी शहाजादे झाले, आता काय हे जयसिंग आणि दिलेरखां आले काय? बरं आहे म्हणावं; जी गत शास्तेखानांची आणि अफ्जलखांची झाली, तीच आपलीही करून टाकायला बसलोच आहो आम्ही! खांची खां खां झाली म्हणजे सिंगांची शिंगं मोडायला किती वेळ लागणार आहे! या रजपुतांचा मला खरोखर चमत्कार वाटतो, की त्यांच्या मनात या औरंगजेबाची नोकरी,– आणखी ती आमच्यासारख्याना दडपून टाकण्याच्या संबंधात—करावी असं येतं तरी कसं?"

" कसं येतं अन् काय येतं ? आमच्या वाडवडिलांच्या मनात कसं येत होतं ? एकदा माणसाच्या अंगवळणी एखादी गोष्ट पडली, की त्यात त्याला तसंच काही विशेष कारण झाल्याखेरीज वावगेपणा वाटत नाही. "

" मी म्हणतो, अकबर बादशहाच्या वेळी एक काही तरी कारण बरोबर होतं. तो धर्माच्या बाबतीत जुलूम करीत नसे. पण हा औरंगजेब-हा सगळ्या मुलुखाचा कपटी, जुलमी, संशयी, हेकेखोर आणखी त्याच्या नोकरीत राहण्याची न् त्याचं राज्य वाढविण्याची यांनी इच्छा धरावी, याला काय म्हणावं ? या जयसिंगानं जर सांगितलं असतं की, नाही बोवा आता मी मोहिमेवर जात, तर काय झालं असतं ? "

" पण तो आला, तर त्यात तरी काय वागावं होणार आहे ? जसा जसवंतसिंग आपल्याला अनुकूल झाला, तसाच हाही अनुकूल होऊन आपला कार्यभाग चांगला सुधारणार नाही म्हणून कशावरून ? "

" त्यात आणखी त्या औरंग्याची मजा कशी आहे पहा की, एकट्या रजपुताला कधी पाठवित नाही. त्याच्याबरोबर दुसरा कोणी तरी एक आपला जातभाई जोडून देतो. एकटा रजपूत आला तर तो मथवला जाईल ! फार दुष्ट बादशहा ! त्याची त्या राजसिंहानं फार चांगली खोडकी मोडली. त्याला जर साहाय्य मिळतं तर खरोखर दक्षिणेत जसं आपण केलं आहे, तसंच त्यानं केलं असतं. "

" खरं आहे तुझं म्हणणं, अगदी खरं आहे ! बादशहाच्या पाठीमागं तिकडे काही तरी ससेमिरा लागला, तर एवढाली मोठी सैन्यं अन् मोठाले सरदार इकडे पाठवणं त्याला शक्यच व्हायचं नाही. तसा कोणी तरी तिकडे भुंगा लावला पाहिजे. राजसिंह एक तसा भुंगा लावू शकेल असा माणूस आहे. दुसरा हा जयवंतसिंग आणि हे मिर्झा राजे. ही माणसं लहानसहान का आहेत ? परंतु त्यांना औरंगजेबाची सेवा करण्यापलीकडं काहीच दिसत नाही. आपल्या धर्माचा किती छळ चालला आहे, गोहत्या किती होत आहे, याची काहीच दाद त्यांना नाही-अशासारखं आपलं त्यांचं वर्तन दिसतं. "

" बादशहाची नोकरी करून त्याच्या कृपेच्या सावलीत खुशाल ऐषाराम भोगीत बसावं हेच त्यांना आवडायला लागलं आहे—सवय पडली,

दुसरं काही नाही. खरं जर पुसाल, तर माझ्या मनात मधून मधून येतं की, बैराग्या–गोसाव्याचा वेष घेऊन एकदा त्या प्रांतात हिंडून पाहावं की, या बड्या दरकदारांच्या शरीरात जीव आहे, की ते म्हणजे बादशहाला खडी ताजीम देणारी बाहुली आहेत ? ”

“ तुझा विचार तर फार चांगला आहे. आणखी वेष घेऊन लोकांना फसवण्यात तर तुझा अगदी हातखंडा आहे. पण तिकडं जाऊन पाहून येऊन उपयोग काय ? तिकडची माणसं काय किंमतीची आहेत, हे आपल्याला जसवंतसिंगासारख्यावरून नाही का दिसत ? यांना काही चेव आला पाहिजे. तो काही येईल, आणखी त्यांच्या हातून काही होईल असं नाही मला वाटत. तिकडच्या तिकडे जर कोणी बादशहाच्या मागं ससेमिरा लावील, तर फार चांगलं होईल; त्याला इकडं नजर फेकायला वावच मिळू नये. आमच्या समर्थासारखे तिकडे कोणी साधुपुरुष आता उरले नाहीत. ”

“ खरंच. समर्थ तरी केवढे महात्मे ! त्यांचं दर्शन झालं की एक प्रकारचं विलक्षण स्फुरणच चढतं. नेहमी असं वाटतं की यांनी आपल्याला काही तरी सेवा सांगावी आणखी आपण ती करावी; पण ते स्वतःची सेवा एक वेळ सांगतील तर शपथ. त्यांचा निरपेक्षपणा काही विलक्षण आहे. आपण होऊन द्रव्य पाठवावं, तर त्यांनी दानधर्म करून टाकावा. शिष्यांनी आणलेल्या भिक्षेवरच आपला योगक्षेम चालवावयाचा असा त्यांचा विलक्षण निश्चय ! ”

“ त्यांची गोष्ट कशाला पाहिजे ! त्यांच्यासारख्यांच्या कृपादृष्टीनं तर साऱ्या आपल्या गोष्टी चालल्या आहेत. बाबारे, असे महात्मे जिथं जिथं आहेत, तिथं तिथंच काही तरी डोकं वर उचललं जातं आहे. नाही तिथं सगळा अंधार ! ”

अशा प्रकारे त्या दोघांचे भाषण चालले आहे, तों रानाच्या एका गर्द भागातून अत्यंत आर्त असा स्वर त्यांच्या कानी पडला; त्याबरोबर ज्या बाजूने तो आर्त स्वर कानी पडला, तिकडे त्या दोघांनी आपले घोडे जोराने दवडून ते त्या रानात घुसले; व पुढे जातात तों त्यांच्या दृष्टीस पुढील प्रकार पडला.

एक तरुण मराठा तीन मुसलमानांशी झगडतो आहे आणि पलीकडे

एका हाकेच्या अंतरावर एक मेणा खाली पडला असून दोघे मुसलमान त्या मेण्याच्या भोयांशी दंगामस्ती करीत आहेत; व एक मुसलमान त्या मेण्याचे दार उघडून एका तरुण स्त्रीस बाहेर ओढीत आहे व ती स्त्री आर्त स्वराने " धावा, धावा " म्हणत आहे.

हा एकंदर प्रकार पाहिल्याबरोबर आमच्या या दोघा मराठा घोडेस्वारांच्या तळपायाची आग मस्तकास गेली आणि ते जोराने त्या स्त्रीस सोडविण्याकरिता आणि मराठा वीराच्या मदतीकरिता धावले. त्या स्त्रीच्या अंगाशी झगडणाऱ्या इसमावर वार करून त्याला निपचीत पाडल्यावर इतर मुसलमानांनाही त्यांनी जमिनीवर पाडले.

शत्रूचा पुरा धुव्वा उडाला असे पाहताच तो मराठा वीर आमच्या या दोघांच्या जवळ येऊन हात जोडून नम्रपणाने म्हणाला, " संकटात पडलेल्या लोकांच्या सोडवणुकीस धावणारे हे महात्मे कोण, हे मला माहीत नाही; परंतु ते शिवाजीमहाराजांच्या सैन्यापैकीच असले पाहिजेत हे खास. माझा जीव आपण बचावला आहे. हा जीव आता माझा नाही, आपला आहे. आपण त्याचे काय वाटेल ते करावे. "

हे बोलणारा तरुण मराठा फार देखणा, उंच, फार बांदेसूद होता. त्याचा चेहरा मोठा उमदा, डोळे पाणीदार आणि एकंदर झोक मोठा ऐटीचा होता. त्याचे युद्ध करण्याचे कौशल्यही फार चांगले असल्याबद्दल त्या दोघांची नुकतीच खात्री झाली होती. त्याचे ते विनयाचे बोलणे ऐकल्याबरोबर, हा कोणी तरी विजापूर दरबारात वागलेला माणूस आहे असे त्या दोघास वाटले व त्यांना एक प्रकारचे समाधानही झाले. आमच्या पहिल्या दोन स्वारांपैकी उंचेला स्वार त्यास म्हणाला, " होय. आम्ही शिवाजीमहाराजांच्या लोकांपैकीच आहोत. आपली मंडळी मेण्यात आहेत, तिकडे आपण जाऊन समाचार घ्यावा आणखी आपल्याला कोणत्या वाटेने जायचे आहे, ते कळले तर आम्ही आपल्या ठिकाणापर्यंत पोचवावयाला येऊ. "

" आम्ही परळीजवळ कोणी रामदासस्वामी म्हणून महासाधुपुरुष आहेत, त्यांच्या दर्शनासाठी जातो आहोत. थोडे दिवसांपूर्वी मी फार आजारी होतो, तेव्हा माझ्या मातुःश्रीनी असा नवस केला की, हा बरा

झाला म्हणजे जोड्याने स्वामींच्या दर्शनास पाठवीन. तो नवस फेडण्यासाठी मी आलो आहे. ”

स्वामींचे नाव काढताच या दोघासही विशेष कौतुक वाटले व यांच्यापैकी उंचेला गृहस्थ त्यास म्हणाला, “ आम्हीही स्वामींच्या दर्शनास चाललो आहो. आता आपण बरोबर जाऊ ”, व त्याने त्याची माहिती विचारली, तेव्हा तो तरुण मराठा म्हणाला, “ विजापुरात अब्रुदार घराण्यातील माणसांनी आता राहू नये हेच चांगलं अशी स्थिती आहे. बादशहा स्वतः काही पाहत नाही. जो सरदार ज्यावेळी पुढं असेल, त्यानं खूष होण्याजोगं काही कृत्य केलं की, त्याच्यावर बहाल मर्जी ! मग त्यानं वाटेल ते करावं. त्या सरदारापैकी कोणाची तरी आमच्यावर हल्ला करणारी ही मंडळी आहेत. काय उद्देशानं आमच्या पाठीमागं आली, तो नीच उद्देश बोलून दाखविण्याचं काही कारण नाही ! आपल्यास त्याचा सहज तर्क करता येईल. ”

हे त्यांचे बोलणे चालले असता तो ठेंगण्या बांध्याचा दुसरा गृहस्थ आपला ओठ चावीत त्याच्याकडे पाहत होता, पण त्याचे मन निराळ्याच विचारात गुंतले होते, हे उघड दिसत होते. बराच वेळ आपल्याशी विचार करीत राहिल्यानंतर तो आपल्या सोबत्यास म्हणाला, “ एकूण जी स्थिती आज कित्येक वर्षे आहे, तीच कायम आहे आं ! असं काही ऐकलं म्हणजे मला फार त्वेष येतो. एकदा निकराचा निश्चय करून सोक्ष की मोक्ष करून टाकावा असं वाटतं. परंतु पुन्हा वाटतं, डोंगर पाडण्याची इच्छा धरणारानं त्याच्यावर कपाळ आदळून काही उपयोग नाही; त्याच्या तळाशीच पोखरायला सुरुवात केली पाहिजे म्हणजे तो आपोआप एक दिवस खाली येईल. असो. देवी भवानीच्या मनात येईल ते दिवशी तीच आपल्याला यश देईल. आपण समर्थांचे आशीर्वाद घेऊन उद्योग करीत राहावे एवढाच आपला अधिकार. चला आपल्याला तेथे पोचायला उशीर होईल. आपल्यालाही तेथेच जायचं आहे, तर चला आपण आमच्याबरोबरच. परस्परांची परस्परास सोबत होईल. ”

तो तरुण मराठा विजापूरकर आपल्या जनान्याकडे गेला; त्याने आपले घोडे जमा केले आणि पुढील गावाकडे जाण्यासाठी सर्व निघाले.

आता ते स्थळ सोडताना, त्या ठेंगू गृहस्थाने हल्ला करणाऱ्या सर्व मुसलमानांकडे पाहिले, तेव्हा ते सर्व इहलोक सोडून गेल्याचे त्यास दिसून आले. ती सर्व मंडळी लवकरच एका खेड्याजवळ आली. तेथे येताच त्या ठेंगू गृहस्थाने गावात कोणी मुसलमान आहे काय, म्हणून शोध केला. दोन मुसल्मान आहेत असे कळल्यावर त्यांना बोलावून आणून आपल्या कर्मीने वाटेत मरून पडलेल्या पाचसहा मुसलमानांना मूठमाती देण्यास सांगून व त्याकरिता लागणाऱ्या खर्चासाठी एक मोहोर त्यांच्या अंगावर झुगारून दिली. हे त्याचे करणे पाहून त्या तरुण मराठ्यास थोडे आश्चर्य वाटले व तो दुसऱ्या गृहस्थास म्हणाला, " हे काय हे ! त्यांना काय द्यायची आहे मूठमाती ! कोल्ह्याकुत्र्यांना आज मेजवानी मिळाली असती, ती या तुमच्या करण्यानं बिचाऱ्यांची बुडेल ! "

" छे. छे. छे. बाबा, असं मोठ्यानं बोलला नाहीस हे बरं केलंस. महाराजांनी आपल्या लोकास शिस्त लावून ठेवली आहे, त्यात एक असं सांगून ठेवलं आहे की, जोपर्यंत समोरासमोर सामना चालू असेल, तोपर्यंत काय ते शत्रुत्त्व. एकदा का माणूस मरून पडला, किंवा शरण आला की मग शत्रुपणा संपला. मग तो आपल्यापैकीच आहे असं समजून त्याच्या मूठमातीची अगर संरक्षणाची तजवीज केली पाहिजे. महाराजांच्या इच्छे-प्रमाणेच त्यांनी आता केलं आहे. तेव्हा ते बरोबरच आहे. "

ते ऐकून त्या तरुण मराठ्याला फार आश्चर्य वाटलेसे दिसले.

* * *

## ३. विचार

मंडळी परळीजवळ जाऊन पोचली. त्या पुण्य प्रदेशाच्या दर्शनानेच सर्वांस अत्यंत आनंद झाला. तेथे असणारी झाडेझुडपे किंवा तो पुढे उभा असलेला डोंगर, यात काही विशेष होते असे मुळीच नाही. परंतु पाहणाराच्या मनात त्या सर्व वस्तूंविषयी अतोनात भक्ती असल्याकारणाने त्या सर्वांच्या ठिकाणी काहीना काही तरी विशेष आहे असे त्यास वाटू लागले.

त्या पुण्य प्रदेशात पुण्य पुरुषाच्या दर्शनाकरिता येऊन ते दर्शन झाल्यानंतर पुनः त्या अविंधांच्या सेवेला जावे, यासारखे महत्पातक कोणचेही नाही, असा विचारसुद्धा त्या तरुण मराठ्याच्या मनात येऊ लागला. त्याच्या थोड्या वेळापूर्वीच्या भाषणाने विजापुराला तो कंटाळला होता, तेथील बेबंदशाहीचा त्याला तिरस्कार आला होता, हे वाचकास दिसून आलेच असेल. आपल्याच धर्माचा सदोदित छल करू इच्छिणारांची सेवा करण्यापेक्षा आमच्या पुण्य-पुरुषाच्या सेवेत आपले आयुष्य कंठिलेले काय वाईट! हा विचार राहून राहून त्याच्या मनात आला, आणि त्याप्रमाणे करण्याचा त्याचा निश्चयही होत चालला. आपल्याला रानात संकटकाळी मदत करणारी मंडळी शिवाजी-महाराजांच्या हद्दतातील असली पाहिजेत असेही त्यास स्पष्ट दिसून आले. माझ्यासारख्या यःकश्चित् मनुष्याकरिता आपला रस्ता सोडून त्याच्या सोडवणुकीला धावावयाचे म्हणजे काही अशी तशी गोष्ट नव्हे. परंतु जो कोणी आर्त—जेथे कोठे दिसेल—त्याचे रक्षण करावयाचे हे जे महाराजांचे ब्रीद आजपर्यंत आपण ऐकत होतो, ते ब्रीद त्यांच्या पदरच्या सर्व माणसात सारखे जागत असले पाहिजे हे उघड आहे. तर आपण तरी आता परत जाऊन काय करायचे? येथेच साधुपुरुषांच्या सेवेत राहावे—अथवा महाराजांची सेवा करण्यात आपली मर्दुमकी उपयोगाला लावावी, असेही विचार त्याच्या मनाला व्यापू लागले.

मंडळीं परळीस पोचल्यावर मठातला जो माणूस प्रथम भेटला, त्याच्याजवळ त्यांनी स्वामीमहाराजांची चौकशी केल्यावर त्याचे जे उत्तर मिळाले, त्यामुळे त्यांची मने खट्टू झाली. कारण सर्वांची—त्यातून विजापुराहून आलेल्या माणसाची—फार आशा होती की, मठात प्रवेश होताच स्वामींचे दर्शन होईल. परंतु स्वामी पुरश्चरणास बसले आहेत हे ऐकताच एका प्रकारे त्यास खिन्नता आली. हे पाहून ठेंगण्या गृहस्थाने त्यास म्हटले, "आपल्याला खिन्नता येण्याचे कारण नाही. आपल्या मना-प्रमाणे स्वामींचे दर्शन होईल. मात्र ते त्यांचे दर्शन निरुपयोगी न होण्याची योजना मनात बाळगली पाहिजे."

आपल्या मनातील विचारांचे ज्ञान झाल्याप्रमाणे यांचे हे भाषण असल्याचे पाहून, विजापूरकर गृहस्थ काही बोलणार, तों मठातील एक

माणूस ठेंगण्या गृहस्थाजवळ आला व त्यास मोठ्या आदराने म्हणाला, " समर्थ पुरश्चरणाच्या स्थानी जाऊन बसल्याला आज बरोबर एकविसावा दिवस आहे. कल्याणस्वामी, श्रीधरस्वामी आणखी वेणुबाई तिकडं नित्य परिपाठाप्रमाणं आता नुकत्याच गेल्या आहेत. कदाचित पुरश्चरण संपले असेल. महाराजांनी .. "

परंतु तितक्यात त्या ठेंगण्या गृहस्थाने त्या बोलणाऱ्यास काही खूण केल्यामुळे त्याने आपले बोलणे अर्धवटच ठेवले. त्या ठेंगण्या गृहस्थाने विजापूरकर गृहस्थाची नीट व्यवस्था लावण्यास मठातील त्या माणसास सांगून आणि त्यास त्याच्या स्वाधीन करून, तो व त्याचा सोबती दोघेच पुढे समर्थांच्या पुरश्चरणाच्या जागेकडे गेले. श्रीधरस्वामी व कल्याणस्वामी यांनी या दोघास पाहताच त्यास विलक्षण आनंद झाल्याप्रमाणे दिसले. श्रीधरस्वामी त्यास एकदम म्हणाले, " वा ! आपलं नुकतंच स्मरण झाल होतं, तोंच आपण येथे येऊन दाखल झाला. मनोमन साक्ष म्हणतात ती अशी असते ! समर्थांचे पुरश्चरण संपून ते समाधी उतरवीत आहेत असं वाटतं. प्रथम काही गूढ असं मध्येच बोलले. आम्हाला त्याचा उकल झाला नाही. माझी समजूत आहे की, ते काय गूढ भाषण करीत होते, त्याचा आपल्याशीच संबंध असावा. "

आमचे दोघे प्रवासी विवराजवळ येऊन पोचले, तेव्हा पहिल्या प्रकरणाच्या शेवटी सांगितलेले समर्थांचे भाषण होऊन ते पुनः स्तब्ध बसले होते. त्यांची पुनः समाधी लागली होती. मधून मधून ते आपले जटाविभूषित मस्तक हलवीत व मध्येच बुभुःक्कार करून ' श्री रघुवीर समर्थ ' असे म्हणत. त्याप्रमाणे प्रकार चांगला दोन तीन घटका चालला. श्रीधरस्वामी, कल्याणस्वामी व वेणुबाई प्रथम ज्या स्थितीत स्वामींच्या आजूबाजूस व मागे उभे राहिले होते त्याचप्रमाणे एकसारखे उभे राहिले. चारचार पाचपाच घटकापर्यंत अशा प्रकारे उभे राहण्याचा त्यांचा हा पहिलाच प्रसंग नव्हता, यामुळे तसे उभे राहण्यात त्यास त्रास वाटला नाही. उलट असे उभे राहणे आपले सेवाकर्तव्य आहे, असे त्यास वाटून ते तसे उभे होते. अशी ती मंडळी उभी असता आमचे दोघे प्रवासी तेथे येऊन ठेपले व वर सांगितल्याप्रमाणे त्यांचे व श्रीधरस्वामींचे भाषण झाले.

" गूढ भाषण काय केले ? " त्या ठेंगण्या गृहस्थाने विचारले.

" आज एकविसावा दिवस म्हणून आम्ही नेहमीच्या परिपाठाप्रमाणं आलो व बाहेर बसलो. काही वेळानं बुभु:कार झाला, तो ऐकताच आम्ही जवळ आलो, तो थोड्या वेळानं मला उद्देशून समर्थ म्हणाले, 'काय श्रीधरस्वामी, सूर्यग्रहणाचा योग आहे, हे कळलं आहे का तुला ? काही काळपर्यंत अगदी खग्रास सूर्यग्रहणाचा योग आहे !' नंतर पुनः समाधी लावून बसल्याप्रमाणे बसले, ते अजून तसेच आहेत. मी त्यांच्या त्या सूर्यग्रहणाबद्दल पुष्कळ विचार केला, परंतु मला त्याचा काही उकला झाला नाही. आपण चालविलेल्या उद्योगात काही तरी विघ्न येणार, त्यालाच उद्देशून त्यांचे हे उद्गार असावेत. नाही तर सूर्य कोण आणखी ग्रहण कसले ? ते त्रिकालज्ञ आहेत; तेव्हा पुरश्चरण चालले असता काही तरी त्यांच्या दिव्य दृष्टीस दिसले असले पाहिजे. जे काय उद्गार आम्ही ऐकले ते आपल्याला सांगितले. "

तेथे बसावे की जावे याबद्दल श्रीधरस्वामी व कल्याणस्वामी यांचे बोलणे चालले होते, तेव्हा वेणुबाई मात्र म्हणाल्या, " खग्रास सूर्यग्रहणाचा योग येणार, असा जो काय त्यांना दृष्टांत झाला त्या दृष्टांताचा पुरता निकाल करून घ्यावयाचा म्हणूनच महाराज पुनः समाधी लावून बसले आहेत. लवकरच समाधी उतरेल असे वाटते. तेव्हा आपण इथून हलू नये. "

असे त्यांचे बोलणे चालले आहे तों वेणुबाईच्या म्हणण्याप्रमाणे समर्थ खरोखरीच एक दीर्घ उच्छवास टाकून डोळे उघडून सभोवार पाहू लागले आणि एकदम उठून बाहेर आले. अर्थातच सर्व मंडळींनी त्यांच्या पायाचे वंदन केले, तेव्हा त्या ठेंगण्या गृहस्थाच्या डोक्यावर समर्थांनी हात ठेवून त्यास आशीर्वाद दिल्याप्रमाणे केले. जवळच्या झरीवर आचमनं करून आल्यावर समर्थांनी सर्व मंडळीस बोलावले आणि धीरगंभीर वाणीने म्हटले, " काळजी करू नको. काळजी करण्यासारखे दिवस आले आहेत, परंतु त्यातून राम निभावून नेणार अशी श्रध्दा बाळगा. सूर्यग्रहणाचा योग आला आहे. खग्रास ग्रहण होऊन सूर्य अगदी तेजहीन झाला असाही अनिष्ट प्रकार दिसला, परंतु तो प्रकार फार वेळ टिकला नाही. थोड्या वेळात ग्रासातून मोक्ष होऊन सूर्य पुन्हा तेजस्वी होऊन आपला प्रताप दाखवू लागला.

असा हा चमत्कार या एकवीस दिवसांच्या पुरश्चरणात तीन वेळा पाहिला. तेव्हा आता काय आहे ते पाहण्यासाठी पुनः समाधी लावून तू कोठे आहेस, याचा तपास लावला, तों वाटेने येतानाच दिसलास. तू त्या आर्तीला सोडविण्यासाठी आडवाटेला गेलास तेथेच तुला पाहिला. चांगलं केलंस— फार चांगलं केलंस. आपल्याबरोबर मंडळी आली आहेत, त्यांचा मोक्ष-कार्यात तुम्हाला उपयोग होणार आहे आणि म्हणूनच हा योगायोग आला आहे. चला. ''

इतके म्हणून समर्थ खबदडी उतरून जाळीच्या बाहेर आले. बाकी मंडळी पुढे झाली व तो ठेंगणा गृहस्थ व समर्थ दोघेच थोडे मागे राहिले. मठाकडे परत येताना त्या दोघांचे भाषण चालले ते असे होते :—

**प्रवासी** :– रामसिंगाकडून आजच गुप्त पत्र आलं आहे. तिकडील हकीकत त्यानं लिहिली आहे, ती कानी घालण्यासाठी मुद्दाम आलो. अलमगिरानं निश्चय केला आहे की, आमचा नायनाट करायचा. आता फार जबरदस्त स्वारी पाठविण्याचा बेत झाला आहे.

**स्वामी** :– जबरदस्त स्वारी म्हणजे काय ? एक स्वत: आला तर किंवा रामसिंगाच्या बापाला पाठविला तर ! बाकी तिकडल्या दरबारात तसा जबरदस्त कोण आहे ?

**प्रवासी** :– होय. रामसिंगाचे वडील मिर्झा राजे यांनाच इकडं रवाना करण्याचा निश्चय अलमगिरानं आपल्या वाढदिवसाच्या दिवशी केला. जसवंतसिंगाला इकडं तिकडं करून शहाजाद्यालासुध्दा समजावून घेऊन स्थिर-स्थावर होत आहे तो हा नवा लोंढा आला. तिकडच्या तिकडं जर माझ्या सारखा कोणी धडपड करू लागेल, तर इकडं त्यांना लक्ष्यच देता यायचं नाही. जो तो खुशाल चैनीत ऐषारामात पडलेला. इकडं येऊन आमचं शासन केलं तर आणखी काही तरी जहागिरी मिळावयाचीच ती का गमवा ?

**समर्थ** :– खरं आहे. बादशहाची चाकरी करायची, तुझ्यासारख्याला दाबून टाकायचा, यातच आता खरं शौर्य, खरं कर्तव्य आहे, असं ज्याला त्याला वाटतं. त्यांचं बाळकडूच मुळी ते पडून गेलं. पण काही हरकत नाही. मिर्झा राजा तरी हिंदूच आहे ना ? वैदिक धर्माचा त्याला तरी पक्षाभिमान आहेच की नाही ? पाहावं आपलं बोलणं त्याच्याकडं लावून.

**प्रवासी :–** रामसिंगाची फार इच्छा की, आपल्या बापानं अलमगिराविरुध्द उठावं आणखी जे दक्षिणेत आपण केलं आहे, ते मिर्झाराजांनी तिकडं करावं. त्यानं कित्येक पत्रात मला असं लिहिलं आहे की, आमच्या वडिलांनी जर असा उद्योग केला तर तो सर्वथा सिध्द होईल. माझ्या मनात एक वेळा असंसुध्दा आलं होतं की, इकडून कोणीतरी तिकडं काय हालहवाल आहे ते पाहण्याला पाठवावं. इकडं थोडी स्वस्थता मिळती तर त्याचा उपयोग.

**स्वामी :–** हालहवाल काय असायची! जी विजापुरास हालहवाल आहे, तीच तिकडे असायची. जसं शेणातले किडे शेणातच सौख्य मानतात, तसेच पुष्कळ लोक. त्यांचा नरक त्यात, आणखी त्यांचा स्वर्गही त्यातच. खऱ्या स्वर्गाची कल्पना त्यांना येईल तर ते डोकं वर करतील. बरं ते असो. रामसिंग या स्वारीबरोबर आला तर बरा. पुष्कळ गोष्टी अशा असतात– विशेषतः लढाईच्या वेळी अशा असतात की, त्या आगाऊ कळल्या तर त्यांचं निवारण तेव्हाच करायला येतं. त्या बातम्यांचा फायदा घेता येतो तेव्हा...

**प्रवासी :–** ते खरं. पण इथं आल्यावर त्यानं बातम्या पाठविण्याचं काम चालविलं तर ते उघडकीस येण्याचा संभव फार. तसं उघडकीस आलं तर फायदा काय? पाहू; आपणच मिर्झाराजांची मुलाखत घेऊन काय होतं ते पाहू. रामसिंग आहे तिथंच बरा आहे. त्याचं चित्त आपल्या ठिकाणी पूर्ण आहे.

**समर्थ :–** आपल्या ठिकाणी नुसतं चित्त असून काय उपयोग? त्यानं तिकडं काही उपद्व्याप करावयास पाहिजे होता. मिर्झाराजा नाही अनुकूल झाला म्हणून काय झालं! तुला तुझे वडील कोठे अनुकूल होते? पण त्याला ते उपजतच पाहिजे!

**प्रवासी :–** छे, छे. तसं नाही. तिकडली गोष्ट फार निराळी आहे. कुठं अवरंगजेब आणि कुठं डबघाईला आलेलं विजापूर! तिकडे उपद्व्याप करणारा माणूस पाहिजे मिर्झाराजांसारखाच. तरच काही धामधूम व्हायची. नाही तर रामसिंगासारख्यानं धडपड करून काय उपयोग?

**समर्थ :–** ठीक. तेही ठीकच आहे तुझं म्हणणं. पण ते उपजतच

पाहिजे, एवढी गोष्ट मात्र खरी. अती विचार करून या गोष्टी होत नसतात.

इतके भाषण होते तों मंडळी मठाजवळ आली. विजापुराहून आलेल्या त्या तरुण जोडप्याचा असा निश्चय झालेला होता की, समर्थांचे दर्शन झाल्याखेरीज भोजन करावयाचे नाही की, जलपानसुद्धा करावयाचे नाही. समर्थ येण्याबरोबर त्या दोघांनी त्यांच्या पायावर लोटांगण घातले. तेव्हा समर्थांनी आशीर्वाद देऊन त्यास म्हटले, "बाबानो, असा त्रागा करून बसण्यात काय अर्थ होता! अशा त्राग्यानं दुसऱ्याचा व आपला दोघांचाही व्रतभंग होण्याचा केव्हा केव्हा प्रसंग येतो. मी आणखी एक सप्तक पुरश्चरण चालविलं असतं तर तुम्ही काय केलं असतं? सात दिवस अन्नपाण्यावाचून राहून प्राण दिला असता? तेव्हा मला पुरश्चरण मध्येच ठेवून यावं लागलं. असो. आता आला आहात तर इथेच रहा. तुझ्या मातुःश्रीला इकडे आणण्याची तजवीज कर. पुनः त्या पादशाहीत जाऊ नकोस. देह काही तरी कारणी लाव. जाऊ दे जहागीर गेली तरी. बादशहाच्या सेवेने वडिलांनी मिळविलेल्या जहागिरीपेक्षा स्वकष्टानं मोंगलांच्या जुलुमापासून लोकांना सोडवून मिळालेली जहागीर फार मौल्यवान! तुझ्या मनात हे विचार आतापर्यंत आले नाहीत असे नाही. पण तुझ्या मनात पक्कं बिंबलं नाही. आता बरा आयता निघाला आहेस त्यातून, तो पुनः गुंतू नको."

समर्थांस पाहण्याबरोबर तो तरुण मराठा आपल्या नेत्रांच्या द्वारे जणु काय त्यांचं प्राशनच करीत होता आणि पुढे ते बोलू लागले तेव्हा तर त्यांस इतका हर्ष झाला की, काही विचारूच नये. जणु काय अमृतवृष्टी होत आहे आणि ती आपण यावेळी लाभेल तेवढी घेऊन अमृतपान करावे असे त्याला होऊन गेले होते. समर्थांचे भाषण संपताच त्याने पुनः एकदा समर्थांच्या पुढे लोटांगण घातले, आणि त्यांस म्हटले, "महाराज, मला व माझ्या कुटुंबाला मोठ्या संकटातून सोडवून ज्यांनी मला आपले दर्शन घडविले, त्यांचाच हा जीव आहे; आता याच्यावर माझा हक्क नाही, असे मी केव्हाच यांना सांगितले आहे. तेव्हा आता परत विजापुरास जाण्याची गोष्टसुद्धा माझ्या मनात यायची नाही. मी आता आपली सेवा करीत बसणार, किंवा आपण जी कामगिरी सांगाल ती करणार. याबद्दल आपल्याला मुळीसुद्धा शंका नको. मलाही त्या विजापुरच्या बादशाहीचा अगदी तिटकारा आलेला आहे."

"ठीक. सध्या इथं तू रहा; मग तुला देतो महाराजांच्या दिमतीला म्हणजे समजेल. ते तुझं चांगलं चीज करतील." इतके बोलून समर्थांनी त्याला स्नानपान करावयास लावून दिले आणि आहार झाल्यावर समर्थ, दोघे प्रवासी आणि श्रीधरस्वामी काही विचार करण्यासाठी एका बाजूला बसले.

त्या दोन प्रवाशांपैकी एक गृहस्थ शिवाजी महाराज होते हे वाचकांनी केव्हाच ताडले असेल. त्या मंडळींचा थोडा वेळ विचार झाला नाही तोंच दिल्लीहून महाराजांच्या नावचा एक लखोटा घेऊन पुण्याहून एक सांडणी-स्वार आला आहे असे एका मठवासी शिष्याने येऊन महाराजांना सांगितले. महाराजांनी सांडणीस्वारास बोलावून आणून त्याच्यापासून ती थैली घेऊन आतून लखोटा काढला व स्वामींच्यापुढे टाकला. रामसिंगाकडून आलेला तो लखोटा होता.

* * *

## ४. प्रयाण

त्या पत्रात रामसिंगाने आपल्या बापाच्या प्रयाणाची हकिकत लिहिलेली होती. ते पत्र येणेप्रमाणे :—

"माझे मागले पत्र पोचले असेल नसेल तोंच मी हे पत्र पुनः नवीन हरकाऱ्याबरोबर पाठवीत आहे, याचे कारण आपणास नीट सावध करून ठेवावे हे आहे. बादशहाच्या मनात आपला पुरा फडशा उडवावा असे आहे. आतापर्यंत विजापुरचे व आपले इतके सरदार आपला नाश करण्यासाठी झटले असता आपण त्यापैकी कोणाचेही काही चालू दिले नाही, यामुळे बादशहाच्या अंगाची लाही लाही झाली आहे. त्याच्या कपटी स्वभावाला अनुसरून त्याची अशी समजूत झाली आहे की, जो कोणी येथून पाठवावा तो आपण अनुकूल करून घेता, आणि त्यामुळे आपला पूर्ण पाडाव करण्याचा योग्य उद्योग कोणीच मनापासून करीत नाही. एकवार तर त्याचा स्वतःचाच तिकडे येण्याचा विचार चालला होता. परंतु इकडे अद्याप पक्का

धर बसला असे त्यास खात्रीने वाटत नाही. जोपर्यंत शहाजहान जिवंत आहे तोपर्यंत औरंगजेब आग्रा सोडून कोठे जात नाही. त्याने अत्यंत निंद्य अशा मार्गाचा अवलंब करून गादी बळकावली आहे, तेव्हा ही आपल्या हातून कोण केव्हा हिसकावून घेईल याचा नेम नाही अशी धास्ती त्यास अहोरात्र वाटत असते. आपण दक्षिणेत गेलो, आणि इकडे कोणी बंड करून बापाला कैदेतून सोडवून त्यास पुनः गादीवर बसविले तर ! त्यामुळे तो होता होईतो आग्रा शहराच्या बाहेर जाऊ इच्छित नाही. तसे जर शक्य असते तर तो इतके दिवस थांबताना. यामुळेच तो एकामागून एक कोणी तरी बलाढ्य सरदार आपल्या पारिपत्याकरिता म्हणून पाठवीत असतो. आजपर्यंत येथून जे लोक गेले, त्यापैकी एकाचीही आपण डाळ शिजू दिली नाही. यामुळे त्याच्या अंगाचा अगदी संताप झाला आहे. त्यातही आपण शास्ताखानाची जी स्थिती केली, ती ऐकून बादशहापेक्षा घरातील सर्व मंडळीस – विशेषतः शास्ताखानाच्या बायकोस – म्हणजे औरंगजेबाच्या मामीस फारच वाईट वाटले आहे. त्याबद्दल आपल्यावर चांगला सूड घ्यावा अशी सर्वांची उत्कट इच्छा, परंतु ती सफल होत नाही. याचे कारण आपले शौर्य किंवा चातुर्य असेल असे त्यास मुळीच वाटत नाही. त्याला वाटते आपण जे लोक लढाई करण्यासाठी म्हणून दक्षिणेत पाठवितो ते आपल्याला फितवतात आणि काही न करता परत येतात ! आमचे वडील असे कधी फितावयाचे नाहीत असा त्याचा भरवसा आहे. परंतु तो तरी पक्का कोठे आहे ? हिंदुला हिंदु मिळाला तर काय होईल कोण जाणे ! म्हणून आमच्या वडिलांच्या बरोबर दिलेरखान दिला. आणि दिलेरखानास आतून सांगून ठेवले आहे की, जर काही तुला चलबिचल दिसली, तर मिर्झाराजांचे हुकूम यत्किंचितही मानू नको. ही एक मुख्य गोष्ट आपण बिलकूल मनाआड होऊ देऊ नये. आपल्याबद्दल महाराजा जयसिंगांचे (माझे वडील) मत फार चांगले आहे. आपल्याशी लढाई करण्यासाठी त्यांस येथून रवाना केले आहे, परंतु आपल्याला ज्यायोगे भयंकर त्रास होईल असले कृत्य त्यांच्या हातून कधी होणार नाही. इतरांप्रमाणे त्यांना फसवून घोटाळ्यात आणण्याच्या नादी मात्र पडू नका. का की ते फारच धोरणी आहेत. ते केव्हाही फसले जाणार नाहीत. त्यांची तयारी जय्यत आहे. त्यांचा सगळा बेत ठरलेला आहे. आपण आपल्या

मागल्या पत्रात लिहिले होते की, ज्याप्रमाणे आपण दक्षिणेत राज्यसंस्थापने-साठी धडपड करीत आहा, त्याप्रमाणे उत्तर हिंदुस्तानात का खटपट होत नाही ? या आपल्या प्रश्नाचे उत्तर देणे फार सोपे आहे. याचे कारण इकडे असलेले हिंदुराजे आपापसात फार द्वेष करतात. एक उठल्यास त्याला पालथा घालण्यास दुसरा तयार असतो. बादशहाची मर्जी संपादण्याकरिता कोण कोणाचे काय नुकसान करील याचा नेम सांगवत नाही. आमचे वडील, जोधपुरचे जसवंतसिंग, आणि उदेपुरचे राजसिंग एवढी मंडळी काय ती वर डोके काढण्याला समर्थ; परंतु या परस्परात कोणत्याही प्रकारचे प्रेम किंवा आदर नाही. आमच्या वडिलांस व जसवंतसिंगास बादशहात बुडविणे किंवा तिच्याविरुद्ध खटपट करण्यास उठणे म्हणजे एखाद्या डोंगराच्या गुहेत जाऊन बसून त्या गुहेचा वरचा भाग फोडून काढण्याचा प्रयत्न करण्या-सारखे मूर्खपणाचे काम वाटते. डोंगर कोसळून आपण मात्र त्याच्याखाली चिरडून जाऊ, आणखी तर काही होणे नाही असा त्यांचा समज आहे. जे लहानसहान राजे आहेत, ते आपणास अधिक दर्जाच्या नोकऱ्या व अधिकार केव्हा मिळतील या भानगडीत असतात. अर्थातच आपण औरंगजेबाच्या जुलमाचे निराकरण करावे असे त्यांच्या स्वप्नातही कधी येत नसेल !

आमचे वडील येथून निघाले की मजल दरमजल करीत तेथे येऊन दाखल होतील. चैत्री पौर्णिमेच्या आत पुण्यास जाऊन बसावे अशी त्यांची फार उत्कट इच्छा दिसते. ती पूर्ण करण्यासाठी ते कोणच्याही अडचणींना भीक घालणार नाहीत, किंवा कोणी काही सांगितले, तरी ते माघारी घेणार नाहीत, असा त्यांचा मोठा निश्चयी स्वभाव आहे. यामुळे शहाजहानच्या कारकिर्दीत व याही कारकिर्दीत यांना मोठमोठाल्या कामगिऱ्या देण्यात आल्या, व त्या त्यांनी उत्तम रीतीने बजावल्या. भाषणात सौजन्य व मार्दव फार, त्यांचे सर्वांशी वर्तन फार अदबीचे, यामुळे कोणीही त्यांजवर नाखूष नसतो. ज्यांस त्यांचा फार तिरस्कार, ते सुद्धा त्यांच्यापुढे अगदी अबोल होतात ! त्यांस मनुष्याची परिक्षा फार विलक्षण आहे. कोण कोणत्या धोरणाने वागतो, ते जाणण्याची तर त्यांची शिताफी फार विलक्षण आहे. मनात एक धरीन आणि भासवीन निराळेच असा बेत करून त्यांच्यापुढे

गेलेला माणूस तेव्हाच आपला खरा हेतू ओळखून टाकतो, अशी उदाहरणे आजपर्यंत कितीक तरी झाली.

आपल्याच तीर्थरूपांचे मी आपणच इतके वर्णन करून लिहितो याबद्दल आपण हसाल, दोष द्याल; पण कोणच्या दर्जाच्या मनुष्याशी आता आपला संबंध येणार आहे, हे आपणास पुर्वी पूर्णपणे समजलेले असावे असे वाटून हा स्वतःच्या पित्याची स्तुती स्वतःच केल्याचा दोष मी आपल्या अंगावर घेतला आहे. आपण त्यांच्या धोरणाने वागाल, तर ते आपल्याला साहाय्यच करतील, त्रास देणार नाहीत आणि सोयीच्या गोष्टी कोणच्या, गैरसोयीच्या गोष्टी कोणच्या याबद्दल आपल्याला फार चांगली सल्लामसलत देतील. इकडून व विजापुरहून मोठमोठ्या प्रतिज्ञा करून गेलेल्या शूर शिपायांस आपण खडे चारले व खाली पाहावयास लावले, त्याच आपणावर बादशहाने त्यांना पाठविले आहे; तेव्हा आपण इतरांप्रमाणे पराभूत होऊन किंवा नष्ट होऊन परत जाणे हे सर्वथैव लज्जास्पद आहे ! त्याने आपल्या इतक्या दिवसांच्या यशाला काळिमा लागेल असे त्यांस वाटत आहे. त्यांचे वय साठीला आले आहे, परंतु त्यांची लढाईची उमेद आहे तशी आहे, असे म्हटले तर, यत्किंचितही अतिशयोक्ती होणार नाही. आपण दंडनीतीचा किंवा भेदाचा उपयोग करू लागाल, तर आपल्याला ते हार जाणार नाहीत. आजपर्यंत आपण रचीत आणलेली सुंदर इमारत केव्हाच पाडून टाकतील. आपल्या संबंधाने त्यांचे मन फार चांगले आहे; आपला हेतू फार उत्तम, परंतु तो मान्य होण्याचा हा काळ नव्हे. आपण सध्याच्या काळी पडतेच घेतले पाहिजे अशी त्यांची समजूत झाली आहे.

वडिलांचे बरोबर आपण यावे असा माझा कालपर्यंत बेत होता. परंतु येथे राहून जे काय मला साहाय्य करावयाचे ते सहज करता येईल. परंतु तेथे आल्यावर वडिलांच्या बरोबर वावरत असताना गुप्तपणे आपल्याशी पत्रव्यवहार ठेवणे फारच दुष्कर व अनिष्ट. म्हणून माझा एक फार मोठा मित्र राजा रायसिंग शिसोदिया याचा पुत्र कीर्तिसिंग याला सांगून ठेवले असून तो मार्गातून आपणास गुप्तपणे पत्रे पाठवून जरूर त्या गोष्टी कळवील व पुढेही आपणास हरएक बाबतीत साहाय्य करील; परंतु अशा साहाय्याचा तादृश उपयोग होईल असे मला वाटत नाही.”

रामसिंगाचे ते खुलासेवार व अगदी अंतःकरणपूर्वक लिहिलेले पत्र वाचून त्या चारही मंडळीस फार समाधान झाले. पत्र लिहिणाराचे अंतःकरण ज्यास ते पत्र लिहिले होते, त्याच्याबद्दल किती प्रेमपूर्ण व आदरयुक्त होते, हे शब्दाशब्दात स्पष्ट दिसत होते. पत्राच्या वाचनाने चौघेही विस्मय पावले. पत्र वाचल्यानंतर समर्थ म्हणाले, " वा ! असा पुत्र व्हावा हे तरी त्या जयसिंगाच्या थोर भाग्यापैकीच एक भाग्य होय. आपल्यासाठी याचे अंतःकरण खरोखरी तिळतिळ तुटत असावे असे स्पष्ट दिसते. तो बापाबरोबर येता, तर आपल्यावर कदाचित युद्ध करण्याचा प्रसंग येईल, तो प्रसंग अर्थातच त्यास नको म्हणून त्याने आपला बेत रहित केला असावा ! वा ! किती दूरवर विचार करणारा हा मुलगा ! मोठा धोरणी दिसतो ! ठीक आहे. त्याच्या लिहिण्याचा खचित उपयोग होईल. "

" उपयोग झालाच पाहिजे " तानाजी मध्येच म्हणाला, " कीर्तिसिंग या पत्रात लिहिल्याप्रमाणे जर दर मुक्कामाहून पत्र पाठवील तर काय बहार होईल ? मला आपण आज्ञा कराल, तर वाटेल तो बहाणा करून शत्रूच्या गोटात शिरून बातम्या काढीन आणखी आपल्याला कळवीन. "

मागील प्रकरणात वर्णिलेल्या दोन प्रवाशापैकी एक शिवाजी महाराज व दुसरा तानाजी होता हे सांगावयास नकोच.

यांचे हे बोलणे चालले असता समर्थ आपल्यापाशीच काही विचार करीत होते. बराच वेळ स्तब्ध बसल्यानंतर समर्थ एकदम म्हणाले, " रघुवीर जे काही घडवून आणतो ते आपल्या बऱ्यासाठीच आणतो. काही काळपर्यंत जरी त्रास झाला व निराशा उत्पन्न झाली, तरी ती अगदी तात्पुरती. पुरश्चरण चालू असता जो तीन वेळा दृष्टांत झाला तो काही निरर्थक नव्हे. संकट येणार म्हणून हतवीर्य होऊ नये असेही त्याच्याच-बरोबर सुचविले याचा विचार करावा. "

यावर शिवाजीमहाराज म्हणाले, " आपल्यासारख्यांनी असलं आश्वासन दिल्यावर हतवीर्य आणखी हतधैर्य हे शब्दसुद्धा आम्हाला आठवायचे नाहीत; मग आणखी तर काय ? "

" ठीक. ठीक. वृत्ती पाहिजे ती अशीच पाहिजे. आमचा तुला उपयोग केवळ आशीर्वादापुरता. आम्ही काही मुत्सद्दी नाही, किंवा योद्धेही

नाही. पण तुझ्या कृतीला यश यावं याकरिता तपश्चर्या करणारे एक प्राणी आहो. वास्तविक कृती करण्याची वेळ आली की, तुझा तुलाच साऱ्या गोष्टींचा विचार करावा लागतो ... "

" परंतु विचार आपल्याच कृपेने होतो " शिवाजी महाराज मध्येच स्मित करून म्हणाले.

वर सांगितल्याप्रमाणे भाषणे होता होता रात्र केव्हाच निघून गेली हे सुद्धा कोणाच्या मनात आले नाही. अरुणोदय होऊन पूर्व दिशेला तांबडे फुटलेले दिसू लागले. स्नानाची वेळ झाली हे पाहताच श्रीधरस्वामी म्हणाले, " बोलता बोलता काय जलद वेळ गेला ! इतका वेळ मी आपल्या गोष्टी तटस्थपणे ऐकत होतो. परंतु आता एकच विनंती करितो की, आपल्या सर्वांची अनुमती असली, तर मी जयसिंगाच्या गोटात शिरून काय प्रसंग केव्हा होतात याचा तलास लावून आपणास कळविण्याची तजवीज करीन. पण आपली सर्वांची व समर्थांची अनुज्ञा पाहिजे. जयसिंग कितीही जरा तातडीने आला असला, तरी मी त्याला बऱ्हाणपुराजवळ किंवा औरंगाबादच्या रस्त्यावर गाठीन. " श्रीधरस्वामींची ही विनंती समर्थ आणि शिवाजी महाराजांनी मान्य केली.

सर्व मंडळी एकांताच्या जागेतून उठली. सर्वांची स्नाने झाल्यावर नित्यकर्मे उरकली गेली. नंतर भोजनरूपाने प्रसादग्रहण झाले. आणि नंतर थोडे बोलणे झाल्यावर श्रीधरस्वामी व शिवाजीमहाराज आपल्या बरोबरीच्या मंडळींसह तेथून निघाले.

* * *

## ५. जोशी

मोंगल सैन्याचा तळ म्हणजे ऐषारामाचे एक आगरच होय. या सैन्याचे अधिपती किंवा दुय्यम तिय्यम अधिकारी जेव्हा आग्रा किंवा दिल्लीस आपल्या ठाण्यावर असतील तेव्हा त्यांचा ऐषाराम व्यक्तिशः

आपल्या बरोबर होत असेल तेवढाच. परंतु ते सैन्य बरोबर घेऊन कोठे तरी स्वारीला निघाले म्हणजे त्यांच्या चैनबाजीला व ऐषारामीला ताळतंत्रच नाहीसा होत असे. मार्गाने जाताना जे लुटावयास सापडेल ते लुटावे, जे जे नासावेसे वाटेल ते नासावे, कोणत्याही बाबतीत कोणी आळा घालायाला नाही, कोणी विचारताना–पुसताना. मालकाने फिर्याद द्यावी कोणाकडे, आणि फिर्याद लावणाराची दाद तरी कशाला कोण लागू देतो आहे ? एकपट सैन्य तर दसपट बाजारबुणगे ! या बाजारबुणग्यात अमुक एक प्रकारची माणसे नाहीत असेही नसावयाचे. जेथे तळ पडेल तेथे गाणे, बजावणे, नाचबैठक, तमाशे, कोल्हाटयांचे खेळ–सर्व काही जय्यत तयारी ! चैनबाजीच्या परमावधीस गेलेले हे एक फिरते शहरच आहे असे कोणाही पाहणारास वाटावयाचे, असे सर्वांचे वर्तन. शहरात असताना मंडळींच्या मनावर काही तरी लोक-मताचा आळा असण्याचा संभव; परंतु 'धारातीर्थी पतन पावण्याच्या' दृढ निश्चयाने घराबाहेर पडलेल्या या वीरांच्या वर्तनावर कसलाच आळा असण्याचा संभव नाहीसा होतो ! आहे तोपर्यंत भोगून घ्यावे हा काय तो ज्याच्या त्याच्या मनातला विचार असे.

जी स्थिती सामान्यतः सर्व मोगल सैन्याची, तीच बहुतांशी जयसिंगाने आपल्याबरोबर आणलेल्या या लष्कराची होती. तारीख ९ जानेवारी १६६५ उलटली नाही तों जयसिंग नर्मदा उतरून खाली आला. पुढे सुमारे वीस एकवीस दिवसांनी स्वारांचा तळ बऱ्हाणपुरानजिक झाला. इतका वेळ जे कूच चालले होते ते जरा झपाट्याने चालले असल्यामुळे आणि बऱ्हाणपुरासारख्या भरभराटलेल्या शहराजवळ आता तळ आल्या-कारणाने सैन्याची अशी इच्छा दिसली की, येथे थोडा मोठा मुक्काम व्हावा. सैन्याच्या सरबराईची थोडीबहुत व्यवस्थाही करावयाची असल्यामुळे जयसिंगासही असे वाटले की बऱ्हाणपुरास आठ दहा दिवस मुक्काम करावा. आपल्या इच्छेप्रमाणे काही दिवस येथे मुक्काम होतो आहे, असे एकवार लष्करास कळताच मग काय विचारता ! जिकडे तिकडे आनंदी-आनंद झाला आणि चैन करण्याच्या सर्व प्रकारांचा जणु काय धुमाकूळ उडाला.

कोणालाही नादी लावण्याच्या ज्या काय थोड्याशा विद्या जगात कुटिल लोकांजवळ असतात, त्यापैकी फार मोहक अशी ज्योतिषविद्या आहे. या विद्येने युक्त असणारे इसम चांगले हुशार, व्यवहारचतुर, चाणाक्ष असले, तर ते आपल्या नादी लाखो लोकांना तेव्हाच लावू शकतात. एकदा त्यांची ख्याति मात्र व्हायला पाहिजे की, 'या जोशीबुवांनी सांगितलेले ठोकताळे तेव्हाच पटतात, यांचे प्रश्न कधी चुकत नाहीत.' मग पृच्छकांना काहीच तोटा नसतो. अशा जोशांपैकी एक जोशी बऱ्हाणपूरच्या बाजारात एका चव्हाट्याच्या जागी बसून येणाऱ्या-जाणाऱ्यास आपले नशीब पाहण्यास आव्हान करीत होता. पहिल्या एकदोघांच्या प्रश्नांची त्याने उत्तरे देताक्षणीच हां हां म्हणता त्याच्याभोवती लोक जमू लागले आणि आपले हात पाहण्यासाठी त्याच्यापुढे हात करणारांत मारामारी होते की काय इतकी गर्दी झाली. त्यानेही पाहिले की येथे आता भराभर तोंडाला येईल ते बकल्याखेरीज काहीच दुसरा मार्ग नाही. पण जो तो म्हणे, जोशीबुवांनी सांगितलेले मला पटले. मग काय विचारता! जोशीबुवांच्या पुढे पैशाचा ढीग पडला. शेवटी एका गृहस्थाने त्यास म्हटले:— "जोशीबुवा, या बाजारात काही घरबंद बसावयाचा नाही. आपली हरकत नसली तर आपल्याला मी बरोबर घेऊन जातो. आपण माझ्या तंबूत येऊन बसा. मी जातीचा रजपूत आहे, तेव्हा आपल्याला संकोच वाटायला नको. तेथे अशी गर्दी होणार नाही. जी मंडळी येतील ती चांगली येतील. आपले प्रश्न बरोबर उतरले तर आपल्यालाही प्राप्ती होईल. आपल्याजवळ काही तरी विद्या आहे यात बिलकुल शंका नाही. मी तुमची चांगली व्यवस्था ठेवीन."

जोशीबुवांनी त्या बोलणाऱ्या गृहस्थाकडे नीट न्याहाळून पाहिले. जणु काय आपण याच्याबरोबर गेलो तर आपला कार्यभाग होईल की नाही, या प्रश्नाचे उत्तरच जोशीबुवा त्याच्या तोंडाकडे पाहून काढीत होते. शेवटी त्यांना अनुकूल उत्तर आले असावे असे दिसले. कारण त्यांनी लगेच त्या रजपूत गृहस्थाच्या विनंतीस होकार दिला आणि जमले होते तेवढे पैसे घेऊन त्या रजपुताबरोबर त्याच्या छावणीत गेले.

त्या रजपुतास जोशीबुवांनी सांगितलेल्या काही गोष्टी फारच उत्तम प्रकाराने पटल्या असाव्या. त्याची त्यांच्या ठिकाणी पूर्ण भक्ती बसली असे

दिसले. त्या रजपुताच्या छावणीतही पुष्कळ लोक जोशीबुवांच्याकडे येत आणि त्यांचे सांगणे पटले असे म्हणत जात. जोशीबुवांना काही तरी कर्ण-पिशाच्च वश आहे; केवळ ज्योतिषाच्या जोरावर हे इतके सांगू शकतील, असे संभवनीयच नाही, असे जो तो म्हणू लागला. अशा तऱ्हेने जोशीबुवांचे स्तोम माजत जाताच त्याची वर्दी सर्व सैन्याचे अधिपती जयसिंग व त्यांचे दुय्यम दिलेरखान यांच्यापर्यंत गेली. कित्येक मुसलमान व रजपूत मनसबदारांनी जयसिंगाजवळ जोशीबुवांच्या ज्योतिषज्ञानाबद्दल शिफारस केली, तेव्हा त्यांनी, " सध्या मला वेळ नाही " असे म्हणून जोशीबुवांची भेट घेण्याचे नाकारले.

याप्रमाणे बऱ्हाणपुरास जयसिंगाच्या फौजेचा तळ झाल्या दिवसापासून चार सहा दिवसांच्या आत जोशीबुवांचे बस्तान चांगले बसले. गाणेबजावणे, चित्रे काढणे, नाटक करणे या सगळ्या कला मोठ्या मोहक खऱ्या. आणि या कलांचा नाद लागून पुष्कळ लोकांच्या पैशाचा चुराडा होतो व ते दुर्मार्गाला लागतात, हा अनुभव पुष्कळांना आहे. परंतु खरे जर पाहिले तर जितकी माणसे जोशांच्या नादी लागतात, तितकी वर सांगितलेल्या मोहक कलांच्या नादी लागत नसावीत. प्रत्येक मनुष्य आपल्या भावी आयुष्यातील भाग्योदयाचा काळ समजावून घेण्यास फार उत्सुक असतो. तो काळ सांगेल असा कोणी जोशी त्याच्या मार्गात आला, की तो त्याच्याकडे हेलपाटे घालावयास लागलाच म्हणून समजावे; असा मनुष्यस्वभाव असल्यामुळेच भविष्य सांगणाऱ्या जोशांचा धंदा बऱ्या तऱ्हेने चालतो.

बऱ्हाणपुराहून तळ उठविण्याचा हुकूम झाला तेव्हा जोशीबुवांनी आपल्या आश्रयदात्यापाशी रजा मागितली, तेव्हा त्यांच्या आश्रयदात्याने व इतर मंडळींनी त्यास स्वारीबरोबर दक्षिणेत येण्याचा आग्रह केला, आणि जोशीबुवा छावणीबरोबरच गेले.

★ ★ ★

# ६. जयसिंग

बऱ्हाणपूर सोडून सैन्य दक्षिणेकडे येऊ लागल्यानंतर त्या सैन्यास विश्रांती म्हणून जयसिंगाने दिलीच नाही. आणि मजल दरमजल करीत जयसिंगाचे सैन्य औरंगाबादपासून चार दिवसांच्या वाटेवर येऊन ठेपले, तेव्हा तेथे दोन दिवस विश्रांती घेण्याचा हुकूम सुटला. त्यामुळे लोकांस थोडासा आनंद झाला.

सूर्यास्त झाल्यानंतर थोड्याच वेळात दोन माणसे त्या तळाच्या एका बाजूने पायीच बाहेर पडली. छावणीपासून खूप अंतरावर आल्यावर त्यांच्यापैकी एक दुसऱ्यास म्हणतो :– "एकंदर जो प्रकार पाहिला, आणखी अनुभवला त्यावरून पक्की खात्री झाली की, जयसिंगमहाराज काही कच्च्या गुरुचे चेले नाहीत. अहाहा! असा पुरुष आम्हाला अनुकूल झाला तर आणखी काय पाहिजे? पण यांच्या मनात कोठली अशी सद्बुद्धी व्हायला? ते आपला सारा पराक्रम, सारा मुत्सद्दीपणा, सारा चतुरपणा महाराजांना रसातळास पोचविण्याकरिता योजणार! त्यांनी दुर्लक्ष केले, तर महाराजांची इच्छा हां हां म्हणता परिपूर्ण होणार. आजपर्यंत त्यांनी किती संकटे, किती त्रास भोगला! त्यांना स्वार्थ साधायचा असता, तर विजापुरची बादशहात त्यांनी आपल्या मुठीत केव्हाच आणली असती. परंतु धर्माचा छळ होतो, गोब्राह्मणांचा घात होतो, पतिव्रता भ्रष्ट होतात आणि एकंदरीत वैदिक धर्माची विटंबना होते ती बंद करावी एवढाच त्यांचा हेतू. त्याना साहाय्य कोणाचे! थोरामोठ्याचे नाही; तर गरीबगुरीब मावळे आणि आमच्यासारखे गोसावी हे त्यांचे मदतनीस. जसवंतसिंग, जयसिंग यांच्यासारखे एकदोघे मिळाले, तर काम फत्ते होईल. इकडील कार्यभाग महाराज उरकतील. तिकडचा भाग तिकडे कोणी तरी या दोघांसारख्यांनी उचलला तर होणार आहे. पण ते असो. आपल्यासारखी काही माणसे तरी मदत करावयाला मिळतात हे काय थोडे आहे? हे पत्र तुम्ही कबूल केल्याप्रमाणे नेऊन द्या."

हे बोलणे ऐकून दुसरा गृहस्थ एकदम मोठ्याने हसू लागला. त्याचे कारण पहिल्या गृहस्थाने विचारल्यावर तो दुसरा गृहस्थ म्हणाला, "आपल्या भोळेपणाकडे–अर्धवटपणा म्हणा पाहिजे तर–पाहून हसू येणार

नाही तर काय होईल ? तुम्ही छावणीत शिरून आमच्याशी तुमची ओळख झाल्याला किती दिवस झाले ? तुम्ही आपल्या सोंगाने आम्हाला फसवू पाहिले, पण आम्ही आपल्या बनावट बावळटपणाने तुम्हाला फसवलं याची आपल्याला कल्पना आहे का ? तुम्हाला आम्ही आपल्यावर विश्वास ठेवायला लावून तुमच्यापासून पत्र घेतले की नाही ? ”

एखाद्याने दुःखावर डागण्या द्याव्या, त्याप्रमाणेच हे या गृहस्थाचे भाषण त्या पहिल्या गृहस्थास वाटले. हा दुसरा गृहस्थ पुढे त्यास म्हणतो :– जयसिंगराजांना आपल्या ज्योतिषाची कीर्ती कळली, तेव्हापासून त्यांना संशय आला. त्यांना ज्योतिषाचा फार नाद आहे. आपली प्रत्यक्ष भेट घ्यायला वेळ नाही असं जरी त्यांनी कळवलं, तरी तुमची विद्या पाहण्यासाठी त्यांनी वेष पालटून तुमच्या सभोवताली जमणाऱ्या लोकांत मिसळून तुमचं चरित्र पाहिलं. आपण काही खरे ज्योतिषी नव्हे; आपण कोणाकडून तरी आमच्या छावणीत बातमी काढण्याकरिता आला आहा अशी त्यांची खात्री झाली. त्यांनीच मला तुमच्या पोटात शिरून तुमची माहिती काढण्याची आज्ञा दिली. “ हा जोशीपणाचा बहाणा करून बातमी फोडायला आलेला हा छातीचा पुरुष शेवटपर्यंत काय करतो ते पहा. त्यानं तुला पत्र घेऊन जायला सांगितलं तर होय म्हण. जायला नीघ, पत्र हाती घे, आणि मग त्याला आपलं खरं स्वरूप दाखव – अगर त्याचं खरं स्वरूप आपण त्याला दाखवू. आपण आता दिलेलं पत्र महाराजांच्या हाती खचित जाणार. पण ते तुमच्या महाराजांच्या हाती जाणार की आमच्या महाराजांच्या हाती जाणार एवढीच काय ती शंका ! ”

वाचकांनी आता ताडलेच असेल की, वरील दोन गृहस्थांच्यापैकी एक जोशीबुवा होत. आपले बस्तान चांगले बसले असे वाटल्यावर जोशीबुवांनी आपल्या कार्यास उपयोगी पडेल असा मनुष्य हेरण्यास सुरुवात केली. त्यात एक माणूस त्यांना होस हो देऊन यांच्या बरोबरीने कळकळ दाखविणारा निघाला. तो मिळताच त्याच्यापाशी हे रहस्य करू लागले. तो माणूसही त्यांना बातम्या देऊ लागला. या सर्व बातम्यांचे पत्र तयार करून शिवाजीमहाराजांच्याकडे पाठविण्याच्या कामी त्यांनी मदत मागितली, तेव्हा आपण स्वतःच ते पत्र घेऊन जाण्याचे त्याने कबूल केले. यामुळे

जोशीबुवास फार आनंद झाला. त्यांनी ठरविल्याप्रमाणे तो वेळेवर पोशाख करून त्यांजकडे आला. दोघेही छावणीतून बाहेर पडले. पुढे त्यांचे भाषण काय झाले हे वरील संवादावरून वाचकांस कळलेच आहे.

या रजपुताने आपणास ठकविले; आपल्या सोंगाची बतावणी उत्तम झाली, या भरात आपण आंधळे झालो, याबद्दल जोशीबुवांना फारच वाईट वाटले. याचे पारिपत्य करावे, याच्याजवळचे पत्र घ्यावे आणि आपण निघून जावे असा त्यांच्या मनात विचार येऊन, त्यांनी एकदम त्याच्या अंगावर लगट करून आपल्या कुबडीतील शस्त्र उपसले.

तेव्हा तो रजपूतत शांतपणे त्यांचे निवारण करून म्हणतो :–"तुम्हाला अशी बुद्धी होईल अशी कल्पना आमच्या मनात आली नसेल, असं समजू नका. मनुष्यस्वभावाची आम्हालाही ओळख आहेच. शिवाय तुम्ही असा विचार करा, की मी अगदी निःशस्त्र असेन का? माझ्यावर काही प्रसंग ओढविल्यास मी का स्वस्थ बसेन? तुम्ही फार फार कच्चे दिसता. परंतु तुमचे हेतू मात्र फार चांगले आहेत. तुम्हास पाहिजे असेल तर घ्या हे पत्र. त्या पत्रात जे आहे ते जयसिंगराजास कळलंच आहे! त्यांनीच तर तुम्हाला माझ्यासारख्या माणसाकडून सुरेख फसविलं."

आमच्या तोतया जोशीबुवास फारच लाजल्यासारखे झाले. या गृहस्थास आता आपली लाचारी पूर्णपणे दिसून आली, याला आपण जास्त हिणविणे चांगले नाही, असे त्या दुसऱ्या गृहस्थाच्या मनात आले व तो त्यास म्हणाला, "आपण खिन्न होऊ नये. ज्या इसमानं आपल्याला अशा तऱ्हेनं फसविलं तो काही आपला शत्रू नाही; तो आपला मित्रच आहे. रामसिंगाने महाराजांना ज्याच्याबद्दल लिहिलं आहे, तोच मी कीर्तिसिंग. जयसिंगराजापर्यंत गोष्टी गेल्या आहेत खऱ्या, परंतु आपले हे पत्र त्यांच्यापर्यंत जाणार नाही. बाकी त्यांना तुमचा संशय आला आहे आणि त्यांनी मला तुमच्यावर डोळा ठेवायला सांगितलं हीही गोष्ट खरी. इथून निघून जाण्याचा तुमचा विचार असावा, असे तुमच्या चर्येवरून दिसते, पण आताच जाऊ नका. औरंगाबादेस गेल्यानंतर तेथून वेलाशक जा. आपल्या महाराजांच्या गोष्टी आपणापासून ऐकाव्या, त्यांची माहिती करून घ्यावी असं मला फार वाटतं आहे या कारणाकरिता रहा आणखी मला जे ऐकायची इच्छा आहे; ते

ऐकू द्या. तुमच्या केसालाही धक्का लागणार नाही याबद्दल मी हमी देतो."

"आता इथं राहण्याला काही कारण राहिले नाही म्हणून मी आपला जाण्याची इच्छा करीत होतो. परंतु शेराला सव्वाशेर असे तुम्ही भेटला खरे! आपल्यासारखे चतुर मुत्सद्दी मोगलांच्या सेवेत आहेत, त्यामुळेच त्यांचं राज्य चाललंसं वाटतं आहे. कीर्तिसिंग--पण आपण खरोखरीच कीर्तिसिंग आहा की तेही मला फसवून सांगितलंत?"

**कीर्तिसिंग :—** नाही. आता फसवायचा नाही. मीच कीर्तिसिंग–रामसिंगाचा स्नेही. औरंगाबादला गेल्यावर जयसिंगराजांना विचारून आपण पुढे चला. तोपर्यंत आपल्याला जाऊ देऊ नये असाच आम्हाला हुकूम आहे. आपल्याला जी काय बातमी कळली असेल, त्याच्यापेक्षा चार नव्या गोष्टी सांगतो. त्या ऐका. शिवाजीमहाराजांच्याविरुद्ध ज्यांच्या मनात काहीतरी आहे, त्यांना काहीतरी आमिषे दाखवून मोगल सैन्याच्या मदतीस बोलावलं आहे. ज्या घोरपड्यांची पाळंमुळं खणून टाकण्याचं तुमच्या महाराजांनी कंकण बांधलं होतं, त्यांना पत्रं गेली आहेत. जावळीकराकडे खलिता गेलाच आहे. अफजुलखानाच्या मुलाला एक पथक देऊन त्याला स्वतंत्र स्वारी करायलाच सांगणार आहेत. त्याच्या बापाला मारल्याचा सूड उगवण्याची त्याला संधी देण्याचा त्यांचा विचार होऊनच हे पत्र त्याला गेलं आहे. कर्नाटकाकडे काही माणसं गेलीच आहेत. आपल्या ताब्यात जितके गड आहेत, त्यांच्यावरल्या बहुतेक ठाणेदाराकडे पत्रे जाऊन त्यांनी फितूर व्हावं म्हणून त्यांना जहागिरी, इनामे, सरदाऱ्या व दरकदाऱ्या देण्यात येतील, म्हणून लालूच दाखविण्यात आली आहे! बोला, आपल्याला याची काही खबर लागली आहे का? नाही ना लागली? या सगळ्या हकिकती महाराजांना लिहा. बादशहाकडे पत्रं गेली आहेत की, मी जी इनामे व जहागिरी देईन ती आपण मान्य करून सनदा पाठवाव्या. त्यांनी औरंगजेबापासून पैशाच्या बाबतीत पूर्ण मुभा मागून घेतली आहे. अशा जय्यत तयारीने या लढाईला सुरुवात होणार आहे, तीत आपल्याला काय यश येणार आहे? या सगळ्या गोष्टी आमच्या छावणीत जोशाचे सोंग घेऊनच का तुम्हाला कळणार आहेत? तेव्हा तुम्ही स्वतः जाण्यापेक्षा चांगलं लांबलचक पत्र लिहिलं तर काही तरी उपयोग होईल."

असे बराच वेळ त्या दोघांचे बोलणे झाले. शेवटी जोशीबुवांनी सविस्तर पत्र लिहून तयार करावे आणखी कीर्तिसिंगाने ते पत्र गुप्तपणे महाराजांच्याकडे रवाना करावे, इतके ठरल्यानंतर कीर्तिसिंग व जोशीबुवा आपल्या छावणीत परत आले.

वरील गोष्ट घडल्यानंतर चार दिवसांनी छावणीचा तळ औरंगाबादेस पडला. औरंगाबादेस शहाजादा होता म्हणूनच केवळ जयसिंगाने तेथे तीन दिवस मुक्काम केला. आग्रा सोडल्यानंतर जयसिंगाने औरंगजेबास मार्गातून एक पत्र लिहिले, त्यावरून तो किती धूर्त व मुत्सद्दी होता हे समजण्यासारखे आहे. त्याच्या पत्राचा सारांश पुढीलप्रमाणे :—

" खाविंद, ज्याने स्वारी करून जय मिळवावयाचा, त्या सेनाधिपतीच्या हातात सैन्याला आशा दाखविणे किंवा भय दाखविणे या दोन्ही गोष्टींचा अधिकार पाहिजे. ज्याने मर्दुमकी केली त्यास बक्षिस द्यावे, ज्याने नामर्दी केली त्यास सडकून शासन करावे, याबद्दलचे पूर्ण अधिकार सेनापतीला नसले, कोणाचा मुशाहिरा वाढविणे अगर कोणाचा कमी करणे जर त्याच्या हाती नसले, त्या बाबतीत जर त्याला दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची पाळी आली, तर उपयोग काय ? एखाद्या शिपायाने मर्दुमकी केली तर त्याला तत्काळ बक्षिस आम्हाला देता येत नाही. आम्ही नुसती शहामुआझीम याकडे शिफारस करावयाची. बरे वाटले तर त्यांनी ऐकावयाची, नाही तर नाही. ही स्थिती बरी नव्हे. सेनाधिपतीचे हुकूम सैन्याने ऐकावयास पाहिजेत, तर त्या सेनाधिपतीच्या हातात आपले बरेवाईट पूर्णपणाने आहे, असे शिपायांस कळले पाहिजे. तशी व्यवस्था जर अमलात आणली तर ठीक होईल; नाहीपेक्षा जे आपल्याला घडवून आणावयाचे ते घडेलच असे खात्रीने म्हणता येणार नाही. कोण कोणत्या प्रसंगी कसा वागतो हे प्रत्यक्ष समजण्याला मला जशी संधी आहे, तशी इतरांना कशी असणार ? शहाजादे तरी स्वतःच थोड्याच गोष्टी पाहणार ! औरंगाबादच्या कचेरीतील कारकून हे सर्व पाहणार आणि ठराव करणार. म्हणजे आमचा दरारा त्या कारकुनाच्या ताब्यात ! लढाईच्या दिवसात अशी स्थिती बिलकुल उपयोगी नाही; तर या गोष्टीचा विचार करून खाविंदांनी या बाबतीतील सर्व अधिकार व खजिना माझ्या ताब्यात द्यावा. लढाई संपून आम्ही तिकडे परतलो, म्हणजे मग पुनः

हे अधिकार जिकडचे तिकडे द्यावे. या माझ्या विज्ञापनेचा अनुकूळ विचार न झाला, तर या गोष्टीचा बभ्रा होऊ नये. तसा बभ्रा झाल्यास माझी दुप्पट नाचक्की होईल. या सर्व गोष्टींचा विचार करून जे ठरविणे ते ठरविण्यास खाविंद समर्थ आहेतच. ”

औरंगजेब अति संशयी व मत्सरी; परंतु वरील पत्रातील मागणी किती न्याय्य आहे हे तेव्हाच त्याच्या लक्षात आले; आणि त्याने त्याप्रमाणे औरंगाबादेस हुकूम पाठविला, की यापुढे जयसिंग जितक्या रकमेची वरात पाठवितील, तितकी रक्कम ताबडतोब त्यास दिली जावी. जयसिंगास जशी पाहिजे तशी व्यवस्था झाल्याने दक्षिणची स्वारी फत्ते करून दाखविण्यास त्यास विशेष उल्हास आला हे सांगावयास नकोच. बरोबर एक लाख रुपये घेऊन स्वारी पुण्यास येऊन पोचली. शत्रूच्या मुलखातील कोणकोणती नाकी दाबली असता आपला कार्यभाग सिद्धीस जाण्यास सुलभ होईल, याचे निरीक्षण करून ठिकठिकाणच्या मोक्याच्या जागी त्याने आपले सैन्य ठेवले. शिवाजी महाराजांच्यावर चढून जाण्याचा कोठे प्रारंभ करावा याबद्दलचा विचार करून, जयसिंगाने पुरंदर व कोंडाणा किल्ल्यावर हल्ला करण्याचे ठरविले.

★ ★ ★

## ७. कोंगाडी

वर सांगितल्याप्रमाणे जयसिंगाने नाकेबंदीची तजवीज केली आणि मग कोंडाण्यास गराडा घालून तो बसला व दिलेरखानास पुरंदर किल्ल्याशी झगडण्यास पाठविले. प्रथमतःच दिलेरखानास एके बाजूस नेऊन जयसिंगाने सांगितले, “ मराठ्यांशी लढणे, त्यातून त्यांच्या ताब्यातून किल्ले घेणे, म्हणजे साधं काम नव्हे. विलक्षण संहार झाल्याखेरीज कधीही राहणार नाही. तेच आपण काही केवळ दबदब्याने, काही सामोपचाराने व काही कर्तृत्व दाखवून साधू म्हणजे सैन्याचा नाश होणार नाही आणि आपलं कार्य होणार आहे. परंतु केवळ रगीनं किल्ले घ्यावयाला जाणं म्हणजे

सिंहाच्या जाभाडात शिरून त्याची दाढ उपटण्यासारखं आहे. दाढ उपटली जाते, की आपला चेंदामेंदा होतो याचा नेम नाही."

परंतु दिलेरखानास जयसिंगाचे हे बोलणे बिलकुल पसंत पडले नाही. त्यास राग फार. शिवाजीने आजपर्यंत जितक्या मुसलमान सरदारांचा पराभव केला, तितक्या सर्वांबद्दल सूड उगवून आपण आपली मर्दुमकी गाजवू, हा त्याचा अभिमान होता. जयसिंगाचे राजनीतिकौशल्याचे हें बोलणे एक भ्याडपणाचे तरी असावे, किंवा फितुरीचे तरी असावे असे त्यास वाटले, आणि तसे त्याने स्पष्टपणे उच्चारूनही दाखविले. जयसिंगास त्याच्या बोलण्याचा संताप आला; परंतु मुसलमान सरदारांनी—मग ते रजपूत सरदारांच्या हाताखाली दिलेले अमले तरी—रजपूत सरदारांशी वाटेल तसे उद्दामपणे वागावे, त्यांस वाटेल ती दुरुत्तरे करावी, आणि ते सर्व रजपूत सरदारांनी मुकाट्याने सोसून घ्यावे—किंवा हसून गोड करूनही घ्यावे--हे त्या काळी रजपूत सरदारांच्या अंगवळणी पडलेले होते; त्यामुळे जयसिंगाने दिलेरखानास काही प्रत्युत्तर न देता, त्याने केलेली अपमानकारक उत्तरे मुकाट्याने ऐकून घेतली.

थोड्या वेळाने दिलेरखान निघून गेला. जयसिंग अगदी खिन्न होऊन बसला होता. इतक्यात दरवानाने आत येऊन सांगितले की, कोंडाण्यावरून कोंगाड्याचे सोंग घेऊन आपल्या लष्करात शिरलेल्या एका माणसास हेर म्हणून किरातसिंगाने पकडून आणले आहे. त्यास घेऊन किरातसिंग आत येतो तों जयसिंगाची चर्या नेहमीप्रमाणे झाली. काही वेळापूर्वी याला काही त्रास झाला असावा असे पाहणाराच्या मनात येण्यास मुळींसुद्धा काही चिन्ह दिसले नाही. आत येण्याबरोबर किरातसिंगाने जयसिंगास हात जोडून नमस्कार करून आपण कोंगाड्यास कोठे, कसे पकडले, त्याने मुक्याचे सोंग कसे आणले आहे, वगैरे सांगितले. त्या कोंगाड्यास जयसिंगापुढे उभे केल्यावर त्याने त्याच्याकडे सूक्ष्म दृष्टीने पाहिले. त्या इसमाचा पोशाख काही चमत्कारिक होता. एक नेसता पंचा आणि एक अंगावरले तसेच फडक्यासारखे. शेंडी मोठी थोरली आणि पांढऱ्या मातीच्या दोन उभ्या रेषा व मध्ये एक तांबडी रेघ. आणखी एक सुताचा धागासुद्धा त्याच्या अंगावर नव्हता. जयसिंगाच्या पुढे नेल्यावर त्याने

वेड्यासारखे इकडेतिकडे पाहिले सूक्ष्म निरीक्षण झाल्यानंतर जयसिंगाने त्यास हाका मारून काही हिंदुस्तानीत विचारले. परंतु तो त्याच्या तोंडाकडे पाहून नुसता वेड्यासारखा हसू लागला; व मला ऐकू येत नाही आणि बोलता येत नाही अशा खुणा करू लागला. जयसिंग त्याच्याकडे पाहून हसला आणि म्हणाला, "तुझं सोंग तर फार उत्तम जमलं बोआ! पण एवढंच की या सोंगाला कोणी फसत नाही. तू काही कोंगाडी नाहीस आणखी मुकाही पण नाहीस; चांगला बोलका आहेस. आणखी लबाडीने आमच्या गोटात शिरून हेरपणा करायला आला आहेस. तेव्हा खरा प्रकार काय आहे तो कबूल कर म्हणजे झाले. तुला क्षमा करू."

जयसिंग मोठा धूर्त. आपल्या बोलण्याचा कोंगाड्याच्या चर्येवर काय परिणाम होतो, हे तो बारकाईने पाहत होता. त्याच्या मुकेपणाबद्दल त्याला संशय आला. त्याने किरातसिंगाकडे पाहून मोठ्याने म्हटले, "शिवाजीचे लोक फितूर करणे काही कठीण नाही. हे शिवाजीचे लोक अगदी कट्टे स्वामिभक्त आणि स्वराज्यभक्त असतील असे वाटले, परंतु इथं पाहतो तो सारंच निराळं. त्याचे लोक आपल्याकडे जितके फिततील, तितके भराभर फितवीन. नेताजी पालकरासारखा, किंवा प्रतापराव गुजरासारखा माणूस आपल्याकडे आल्यावर आणखी काय पाहिजे! आणखी हे दोघे येणार. मला त्यांचे निरोप आले आहेत. "अगदी खोटं. अगदी खोटं." असे एकदम त्या कोंगाड्याच्या तोंडून उद्गार निघाले. हे पाहताच जयसिंग मोठ्याने हसून म्हणाला, "ओ हो हो! एकूण या जयसिंगाजवळ बहिऱ्या-मुक्यांना खडखडित ऐकायला आणि बोलायला लावणारी जडीबुट्टी आहे तर! अरे बाबानो, आज इतकी वर्षे शत्रूशी झगडण्यात घालविली आहेत, तेव्हा तुमच्यासारख्या वस्ताद लोकांचा मला थोडा तरी अनुभव असेल! का आमचे केस पिकले, शरीर पिकले, त्याबरोबर आमची बुद्धीही पिकली असेलच, असं तुम्हाला वाटलं नाही? अरे गृहस्था, तुला पाहिल्याबरोबर माझी खात्री झाली की, तू कोणीतरी शिवाजीराजांच्या अगदी जिव्हाळ्याच्या धाडसी दोस्तांपैकी एक आहेस. तुम्ही वेड्यांनो कच्चे! जे तुमच्यासारखेच कच्चे होते, त्यांच्यावर तुमची कर्तबगारी चालली. एक आला मोठा ज्योतिषाचे सोंग घेऊन आणि दुसरा आला कोंगाडी होऊन. हे सर्व तुम्ही

काही स्वार्थाकरिता करीत नाही, तर गोब्राह्मणांच्याकरिता, आणखी आपल्या वैदिक धर्माच्या रक्षणाकरिता करीत आहा, हे काय मी जाणून नाही! पण आता एवढेच की आता मी तुला येथून जाऊ देणार नाही. आता लढाई संपेपर्यंत तुला माझ्याच ताब्यात राहावे लागेल."

वरील भाषण जयसिंगाने काही कुत्सितपणाने, काही हसत हसत, काही आढ्यतेने केले. त्यावर किरातसिंग जयसिंगास म्हणतो, "छे. छे. अशा माणसांना एकदम सुळीच दिलं पाहिजे. म्हणजे दुसऱ्या लोकांना दरारा बसेल. आपण त्या जोशीबुवांना अशीच दया दाखविलीत, परंतु मला ते अद्यापि पटत नाही. मी स्पष्ट बोलतो याबद्दल माफी असावी."

"अरे किरातसिंग, तू अजून बच्चा आहेस. उद्या आमच्या प्रेमळ वागणुकीमुळे आणखी काही इनाम देऊ केल्यानं जर ही माणसं आम्हाला वश झाली, तर शिवाजीचा हा सगळा प्रांत हाताखाली घालायला चार दिवससुद्धा लागावयाचे नाहीत, समजलास! आम्ही म्हातारे जे करतो, ते योग्य करतो, असे समजून चालत जा."

यावर किरातसिंग काही न बोलता तेथून चालता झाला. कोंगाड्यास चार दिवसानी बोलण्याचे आश्वासन देऊन जयसिंगाने आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्याच्या ताब्यात त्यास देताना सांगितले की, "या गृहस्थाचा डेरा निराळा करून मोठ्या मनसबदाराच्या दर्जाची सर्व व्यवस्था तेथे करून ठेवावी. मात्र डेऱ्याच्या बाहेर त्यास केव्हाही जाता येऊ नये अशाबद्दल फार काळजी घेऊन बंदोबस्ती ठेवली पाहिजे."

कोंगाडी त्या अधिकाऱ्याबरोबर आपल्या डेऱ्यात गेल्यावर तेथे अगदी अस्वस्थ चित्ताने तो विचार करीत बसला असल्यास नवल नाही. "आपण जयसिंगास चकविणार, तों त्याने आधीच आपल्याला चकविले. त्याच्या वस्तादपणाची आपण नुसती ख्याति ऐकत होतो, पण आज त्याचा अनुभव आला. पूर्वी आमची म्हणजे बेमालूम सोंगे असत; कोणाला उमगत नसत. पण हा माणूस निराळा. बरे बच्चमजी अजून काय झाले आहे? आता माझा हा शेवटचा उपाय तरी कसा काय फसतो तो पाहू." अशा प्रकारचे काही विचार त्याच्या मनात येऊन त्याचा चेहरा बराच प्रफुल्लित झाला. त्याचा पहिला तो क्रुद्धपणा व खिन्नपणा नाहीसा झाला आणि त्याने जयसिंगास

आपली त्यास भेटण्याची इच्छा असल्याचा निरोप पाठविला. पण त्याने मुद्दामच एकदोन दिवस त्या निरोपाची दखलच घेतली नाही. नंतर तो आला, आणि कोंगाड्यास म्हणाला, " तुमच्यामार्फत पहिल्यानेच जर काही सामोपचाराच्या गोष्टी होऊन तह झाला, तर पाहायचं; लढाई झाली तर आम्हाला जय हा मिळणारच आहे. आपण जर पडतं घ्याल, तर बादशहाच्या मनात नीट भरवून तुमच्या शिवाजीराजाला इकडलं सरसुभ्याचं काम देता येईल. तेव्हा तुम्ही यात काही खटपट करीत असाल तर पहा. पुष्कळ दगदग व प्राणहानी वाचेल. आमची तयारी चांगली नाही, म्हणून या तडजोडीच्या गोष्टी बोलताहेत असं तुमची मंडळीं म्हणू लागतील. मी इकडे आलो आहे, तो काही झालं तरी हात हालवीत परत जाणार नाही. तह करून जाईन, नाही तर तुम्हाला गिरफदार करून बरोबर घेऊन जाईन. "

हे जयसिंगाचे बढाईचे भाषण ऐकून कोंगाडी गृहस्थास फार संताप आला, पण त्याने आपली जीभ आवरून म्हटले, " आपण म्हणता तेच योग्य. महाराजांनी आता तोच विचार करावा. परंतु ते ऐकायचे नाहीत. कित्येक वेळा आपण आपली स्वामिभक्ती उगीच व्यर्थ घालवितो आहोत, असे आम्हालासुद्धा वाटते. आता आपल्या येथील ही व्यवस्था पाहून आमच्या मनानं असे घेतले की दिल्लीच्या बादशहाशी तुटून वागण्यानं काही लाभ होणार नाही; उलट आमचा नायनाट होईल. "

त्याचे वरील बोलणे जयसिंग चकित मुद्रेने ऐकत होता. हा गृहस्थ शिवाजीच्या अंतस्थ गट्टीतला असला पाहिजे; असा त्याचा तर्क असल्याने, त्याचे हे बोलणे आपल्याला फसविण्याच्या उद्देशाने चालले असावे असे त्यास वाटल्यावाचून राहिले नाही. पण तोही वस्तादच होता. तो पुढे काय म्हणतो हे ऐकण्याच्या निश्चयाने त्याने म्हटले, " एकूण तुम्हालाही आमच्यासारखं वाटतं तर. शिवाजीची सारी मदार तुमच्यावर. तेव्हा तुम्ही त्याला आपलं मत सांगितल्यावर त्याला तुमच्या म्हणण्याप्रमाणं केलंच पाहिजे. " त्यावर सोंगाड्या कोंगाडी म्हणतो, " बराबर, बराबर. आपण म्हणता ती गोष्ट खरी. परंतु शिवाजीमहाराज आमचं म्हणणं सगळ्याच बाबतीत ऐकतात असं नाही. आपण तर त्यांच्या नौकरीला आता कंटाळलो

आहो; आणखी आपल्या मनात असाही विचार आला आहे, की त्यांची नौकरी सोडून आपल्या नौकरीत यावं. आपल्याकडे काही मर्दुमकी केली तर नौकरीचे चीज तरी होईल. पण धर्मासाठी म्हणून चिकटून राहायचं; पण बादशहाची नौकरी करून धर्माचा उद्धार करायला यायचा नाही असे काही नाही. आपण धर्माच्या रक्षणाकरिता काही कमी उद्योग करीत असाल असं नाही. आपण आम्हाला पदरात घेत असाल तर आपली नौकरी करावी अशी इच्छा आहे. आपण जरी माझा अंगिकार केला, तरी मी दोन तीन अटी मात्र घालणार आहे. आपण हूं म्हणत असाल तरी मी आपल्या अटी सांगतो."

जयसिंगाने त्याच्याकडे अगदी बारीक दृष्टी करून त्याच्या चेहऱ्याकडे पाहिले. त्याची दृष्टी यावेळीं इतकी सूक्ष्म होती, की तो ज्याच्याकडे पाहत होता त्यास तिचा सूक्ष्मपणा चांगलाच जाणवत असावा. ती अंतर्भेदी दृष्टी होती. शेवटी तो कोंगाड्यास म्हणाला, "तुमच्या अटी तर कळू द्यात. त्या कळल्या म्हणजे पुढे काय ते बोलू. बाकी आपण आज आमचे कैदी आहा. तेव्हा आपल्या अटी ऐकल्या काय आणि नाही काय, सारखेच!"

या शेवटल्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून त्या कोंगाड्याने त्यास म्हटले, "आमची पहिली अट ही की, सध्याच्या लढाईत उपयोगी पडणारी माहिती आपण विचारू नये, आणखी आम्ही ती देणार नाही. शिवाजीमहाराजांची नौकरी सोडणार, परंतु त्यांचा विश्वासघात करणार नाही. पुरंदर व कोंडाण्याच्या चोरवाटा विचारल्या, तर त्या दाखविणार नाही. दुसरी अट, लढाईत आमच्या माणसांविरुद्ध शस्त्र चालविणार नाही. तिसरी अट ही की, आपल्या शरीराचे संरक्षण करण्याची सेवा करू. इतर कोणाची सेवा करणार नाही. आपण म्हणाल, जा दिलेरखानाच्या तैनातीला, तर ती गोष्ट होणार नाही. आता आणखी आम्हाला आपल्याला काही सांगायचं नाही."

हेही बोलणे होत असता जयसिंग त्याच्याकडे मोठ्या मर्मभेदक दृष्टीनेच पाहत होता. शेवटी म्हणतो, "आमच्या शरीराचे संरक्षण करायला आमचे आम्ही समर्थ आहो; आणखी आमचे जुने रजपूत नौकर आहेत, तेव्हा आपल्याला आणखी काय सेवा सांगावी? तथापि आपल्याला आम्ही आमच्याजवळ ठेवतो; आपणास जी वाटेल ती नौकरी करा. आताच

आपल्याला पोशाख आणून देतो. आपल्यावर इतका विश्वास ठेवला आहे, की आपले नाव सुद्धा विचारले नाही. आपल्या मर्जीला येईल तेव्हा सांगा. सध्या आम्ही आपल्याला ' सुजनसिंग ' म्हणायला लागू. " असे म्हणून तो तेथून उठला. त्याची पाठ वळताच आमच्या या गृहस्थाची चर्या एकदम फिरली. त्याचे डोळे आनंदित झाल्यासारखे दिसले. आपण अखेरी साधली असा त्या चर्येचा अर्थ होता.

* * *

# ८. पुरंदरकडे

दिलेरखान पुरंदरास वेढा देऊन बसला होता. त्याची पहिली उमेद ही, की आपण चुटक्यांचे मांडव वाजवून सर्व किल्ला तेव्हाच हस्तगत करू; परंतु वेढा बसल्यापासून दोन दिवसांच्या आत जेव्हा का वेढा देणारांची रसद बंद झाली, तेव्हा आपण समजत होतो तितके हे काम सोपे नाही, असे त्यास वाटले. किल्ला प्रचंड आणि अतिशय बिकट; त्याच्या सभोवतालच्या प्रदेशातील वाटांची आपल्या लोकांस मुळीच माहिती नाही. अशा स्थितीत आपण येऊन पडलो, याबद्दल त्यास थोडेसे वाईट वाटू लागले. हा किल्ला आपण घेतला नाही तर आपल्या इभ्रतीला कमीपणा आहे असे त्याला वाटत होते. रसद जर अशीच बंद झाली, तर आपल्याला वेढा उठवून दुसरी काही तरी युक्ती करावी लागल हे त्याला स्पष्ट दिसत होते. हा जयसिंग जर काही गडबड करील, तर तेही आपण कधी ऐकणार नाही. जो कोणी हिंदु येतो, तो आपल्या जातभाईला मिळतो. तसाच प्रकार जर हा जयसिंग करील, तर त्याच्यावर आपल्याला डोळा ठेवला पाहिजे. जसवंतसिंगाने जे केले, तेच हा जयसिंग करील, यात तर शंका नाही. आपण बादशहाला याप्रमाणे सांगितले, परंतु त्याचा जयसिंगावर विलक्षण विश्वास, त्यामुळे त्याने आपले ऐकले नाही. त्याला मुख्य आणखी आम्हाला त्याच्या हाताखाली म्हणून दिले. बादशहाचा तरी पूर्ण विश्वास कधी कोणावर असतो आहे ! त्याला तर सर्व जग आपल्या स्वतःप्रमाणेच लबाड, अप्रामाणिक,

विश्वासघातकी, कपटी दिसते आहे. त्याने माझी आणि जयसिंगाची जोडी घालून दिली म्हणजे काय ? आम्ही दोघांनी एकमेकांच्या विरुद्ध चुगल्या कराव्या म्हणून. एकमेकांवर एकमेकांना हेर म्हणूनच नेमले आहे म्हणाना ! पण रजपुताच्या हाताखाली मोगल सरदार असो किंवा मोगल सरदाराच्या हाताखाली रजपूत सरदार असो, वरचष्मा नेहमी मोगलाचाच असावयाचा ! रजपुतांना, हिंदूना–बादशहाच्या तक्ताची काय काळजी ? अशा लोकांना जुमानून जर आम्ही वागावयाला लागलो, तर मोगल बादशाही केव्हाच नाहीशी होईल. त्यांना मोठेपणा द्यावयाचा म्हणजे काय ? त्यांना अगदीच नायनाट झाला, तर लोकांत विलक्षण काहूर माजेल ते नको, आपल्याला राज्य चालविण्याला फार त्रास पडेल, तसे न व्हावे इतकेच. दिलेरखानाच्या या विचारांप्रमाणे त्या वेळच्या बहुतेक मोगलांचे विचार होते असे म्हटले तरी चालेल.

मनुष्याला रिकामपण असले, म्हणजे त्याचे मनही नाना प्रकारचे विचार करू लागते, तशीच स्थिती सध्या दिलेरखानाची झाली होती. त्याला जयसिंगाच्या हाताखाली दिल्याचे मोठे वैषम्य लागले होते. त्यामुळे जयसिंगाचे उणे कोठे सापडेल आणि आपण ते बादशहास कळवून त्याच्यावरला विश्वास अगात्री आहे असे त्याच्या मनास केव्हा भासवू असे त्याला होऊन गेले होते. यामुळे त्याने जयसिंगावर आपले हेर गुतपणे ठेवले होते. जयसिंग अति धूर्त. अशा प्रकारे आपल्यावर दिलेरखानाने हेर ठेवले असतील याबद्दल त्याला संशय होताच. बादशहा आपल्यावर विश्वास दाखवितो, आपल्यावर मोठमोठी कामे सोपवितो, परंतु आपल्यावर नजर ठेवण्याकरता की काय, आपल्या मागे एखादा मुसलमान सरदार–नावाला दुय्यम–परंतु खरोखरच हेर व शिरजोर म्हणून देतो ही गोष्ट त्यास दिसत नव्हती असे नाही. त्यामुळे आपल्या हाताखाली दिलेल्या मोगल सरदारास तो फार नाराज करू इच्छित नसे. असो

वर सांगितल्याप्रमाणे विचार करीत दिलेरखान हुक्का ओढीत बसला होता, तों कितासिंग त्याला भेटावयास आला. त्याला पाहताच दिलेरखान जागचा उठला, त्याच्याकडे पाहून त्याचे स्वागत केले आणि त्याला आपल्याजवळ बसवून घेऊन त्याने त्यास म्हटले, " आज इकडे कोणीकडे आपल्या पायाची धूळ झाडली ? मिर्झाराजाना विचारून आला की त्यांचा डोळा

चुकवून ? आपल्या चेहऱ्यावरून काही तरी नवीन हालहवाल दिसते आहे ! बोला. तुमचं आमचं आग्रा येथे ठरल्याप्रमाणे काही जर सापडलं, तर बहार होणार आहे ! ”

“ तसं बहार होण्याजोगं काही घडलं नाही, पण मिर्झाराजे काहीतरी तऱ्हाचा घोटाळा घालणारसं दिसतं. परवा ज्या त्या दोन हेरांना पकडले, त्यांना शिक्षा करण्याऐवजी आपल्याजवळ मोठ्या मेहमानाप्रमाणे त्यांनी राहून घेतलं. या म्हाताऱ्याचा असा खटाटोप आहे, की काही तरी थातुरमातुर करून शिवाजीला अंकित केल्याचं मिष करावं आणखी मोहीम फत्ते केली म्हणून आल्या वाटेनं परत जावं ! त्यांना फितवून घेण्याचा खटाटोप चालला आहे. या म्हाताऱ्याला असं वाटतं, की इनाम, जहागीर अशी आमिषं दाखविली म्हणजे वाटेल ती व्यक्ती अनुकूल होईल ? ”

“ जो तो आपल्यावरून जगाच्या स्वभावाची परीक्षा करतो नाही, किरातसिंग ? ”

“ अलबत ! अलबत ! या लेकाने मोठमोठे मानमरातब, वगैरेंच्या आशेने तर कित्येक स्वतंत्र संस्थानांना बादशहातीत आणून घातलं ? ” इतके किरातसिंग बोलला आणि आपण काय बोललो, असे वाटून त्याने जीभ चावली.

“ नको, नको. तू जीभ चावण्याचं काही कारण नाही. बादशाही अंमल वाढला, याबद्दल आम्हाला जरी आनंद झाला, तरी हा अंमल वाढवायला तुमचेच लोक आम्हास साहाय्य करतात, ही गोष्ट खऱ्या दृष्टीने आम्हाला काय बरी वाटते ? खरं पुसशील तर यांची फाटक्या जोड्याइतकी-सुद्धा आम्हाला किंमत वाटत नाही. तेव्हा तुला जीभ चावायचं काही सुद्धा कारण नाही. आम्हाला जे फार वाईट आणखी नीचपणाचं काम वाटतं, ते तुम्हाला तसं वाटलं नाही तर त्याबद्दल आम्हाला राग का यावा ? या म्हाताऱ्याची जी मर्दुमकी म्हणून नाणावली आहे, ती असली फितवाफितवी करण्यावरच. मला तर वाटतं, जयसिंगराजे शिवाजी—जो आमचा कट्टा दुश्मन्—त्याला सुद्धा ‘ तुला तुझं हे सारं राज्य बहाल करतो. तू बादशहाचा अंकित म्हणून कबूल कर. ’ असे म्हणायला चुकायचे नाहीत ! ”

“ मग मी आपल्याला बातमी सांगायला आलो आहे ती काय ? तुम्ही म्हणता असा निरोप नव्हे, तर अससं पत्र शिवाजीकडे गेलं आहे. ‘ तू

मुकाट्याने बादशहाला शरण ये. बादशहाची ताकद फार ज़बर. तुझा त्याच्यापुढे काही टिकाव लागणार नाही. तू शरण येऊन बादशहाचा अंकित म्हणून राहिलास, तर तू जितके मिळवलं आहेस तितकेच नव्हे, तर सगळया दक्षिणेचा सुभा तुझ्या स्वाधीन होईल. मात्र हे सगळे किल्ले आणि प्रांत मी केवळ बादशहाचे म्हणून वहिवाटतो आहे असं तू म्हण आणि आमच्याकडे ये म्हणजे आपण तह करू.' असं काही तरी लिहून त्याला भेटीला बोलावलं आहे किंवा त्याचा वकील यावा म्हणून सूचना केली आहे. त्याचा उपयोग आता काय होईल ते काही सांगता येत नाही."

वरील मजकूर ऐकत असतां दिलरखानाच्या अंगाचा अगदी संताप झाला आणि "अशा तऱ्हेने मी तह घडवून देणार नाही; व शिवाजीची हड्डी नरम करून त्याला गिरफदार करून मी बादशहाच्या पुढे त्याला नेऊन उभा करीन" असे दिलेरखान किरातासिंगास म्हणत होता, तों बाहेर काही तरी हाहा:कार उडाला असे वाटून दोघे उठून डेऱ्याच्या बाहेर आले. पेटलेले हिलाल हातात घेऊन मराठ्यानी छापा घातला असे वाटून दिलेर-खानाने शिंग फुंकून समोरून येणाऱ्या लोकांशी झुंजण्याचा इषारा दिला. त्याप्रमाणे लोक निघाले तों त्यास आढळले की, समोरून येणारी मंडळी डाव्या बाजूस वळली. अर्थात दिलेरखानाची मंडळी त्या बाजूस वळली आणि खुद्द छावणीत फारच थोडी माणसे राहिली. पुरंदराच्या पायथ्याशी हिलाल दिसत होते. तेव्हा त्या ठिकाणी जाऊन शत्रूंचा धुव्वा उडवावा असा विचार करून दिलेरखान आपले सैन्य घेऊन तिकडे जाण्यास निघाला, पण मराठ्यांच्या सैन्यात काहीच हालचाल नाही असे पाहून तो चपापला त्याने पुढे पाठविलेल्या हेरानी येऊन त्यास सांगितले की, 'हिलाल जमिनीत पुरून ठेवले आहेत. औषधास सुद्धा माणूस नाही.' हे ऐकताच दिलेरखान म्हणतो, "हे लोक रोज एक नवीन शक्कल काढून मला फसवितात. किल्ला तर असा प्रचंड की, आम्ही असे कितीही दिवस राहिलो, तरी तो सुखाने किंवा कष्टानेही आमच्या ताब्यात येणार नाही. काही तरी निराळीच शक्कल काढून जेव्हा आता किल्ल्यावर मारा करावा तेव्हा खरा. आज किल्ला घेईन, उद्या घेईन अशी घमेंड मनात बाळगतो. परंतु हातून काही घडत नाही याला काय करावं ?"

दिलेरखानाचे असे बोलणे ऐकून किरातसिंग त्याच्याकडे आश्चर्यचकित होऊन पाहू लागला. घमेंडखोर माणसासही दुसऱ्याने फसविले असे दिसले म्हणजे मोठे चमत्कारिक होते व त्याची घमेंड थोडीशी उतरून तो आपला निर्बलपणा कबूल करण्याच्या तारेत येतो; तशीच स्थिती यावेळीं दिलेरखानाची झाली होती. परंतु किरातसिंगाजवळ आपण हे काय बोललो असे वाटून तो त्यास म्हणतो, "परंतु आता यांची पुरी बारा वर्षे भरली. त्यांना आता मला फसविण्याला संधीच ठेवीत नाही. चार दिवसात निकाल करतो. पण हे नुसते हिलाल येथे पुरून जळत ठेवण्यात या लबाडांचा हेतू तरी काय असावा ! आम्ही या हिलालांनी फसून येथे यावं आणि दुसरीकडे कोठे तरी नासधूस करण्याचा तर त्यांचा कावा नव्हता ?" असा विचार मनात येऊन तो चपापला आणि आपल्या लोकांना छावणीकडे परतण्याचा हुकूम दिला. लोकांची पाठ फिरताच, त्यांच्यावर पाठीमागून मारा झाला ! तेव्हा हे आहे तरी काय असे वाटून ते आपल्या शत्रूशी तोंड देण्यासाठी मागे वळतात, तों त्यांचे शत्रू पार नाहिसे झाले. दिलेरखानाने हल्ला करणाऱ्यांचा शोध घेऊन आणि त्यांची कत्तल करण्यासाठी एक तुकडी तेथे ठेवली आणि बाकीचे लोक घेऊन तो छावणीकडे तातडीने परतला. छावणीजवळ येतात तों एकच हलकल्लोळ उडालेला दिसून आला. दिलेरखानाबरोबर सैन्य गेल्यावर छावणीत बाजारबुणगे आणि जनाना यांखेरीज काही उरले नव्हते. तेव्हा छावणीची चांगलीच लुटालुट करून मराठे नुकतेच पळून गेले होते. त्यांच्या मागोमाग दिलेरखानाने आपले लोक पाठविले. परंतु उपयोग काय ? डोंगरावर नेहमी स्वच्छन्दाने राहणाऱ्या हरिणाप्रमाणे उड्या मारीत ते लोक केव्हाच नाहीसे झाले होते.

हा झालेला एकंदर प्रकार पाहून दिलेरखान अत्यंत संतप्त झाला होता. इतक्यात त्याच्या जनान्यावरील मुख्य खोजा अब्दुल्ला याने त्याच्या पायावर लोटांगण घालून त्याची मुलगी नूर एल हुदा हिला मराठ्यांनी घोड्यावर घालून नेल्याची हकिकत सांगितली, त्याबरोबर त्याला संताप आला आणि त्यास मारण्यासाठी दिलेरखानाने आपली तलवार त्याच्यावर उगारली, पण किरातसिंगाने त्याचा हात पकडला आणि अबदुल्याला लाथ मारून तेथून घालवून दिले.

या बातमीने तर दिलेरखान संतापाने अंध झाला. छावणीतील दुसऱ्या कोणाचे काय नुकसान झाले असेल, याचा शोध करण्याचेही त्याच्या मनातही आले नाही. तो तडक आपल्या डेऱ्यावर गेला. तेथे त्याने शोध करता त्यास एवढे दिसले, की आपला खजिना लुटला, गवताच्या साठ्यास आग लावली, आणि धान्याच्या कोठ्या पार लुटल्या. बायकांच्या वाटेस कोणी गेले नाही; जो जोरावर आला, त्याच्यावर शस्त्र उगारले जाऊन त्यास लंबे करण्यात आले; जनान्यात जी माणसे शिरली, त्यांनी तर नूर एल हुदा हीस घोड्यावर घालून नेण्यापलीकडे काही केले नाही. तिच्या-खेरीज कोणास स्पर्श केला नाही. या त्यांच्या करण्यात त्यांचा हेतू तरी काय? नूर एल हुदा हिचे सौंदर्य असे होते की, तिच्यावरून जग ओवाळून टाकावे. ती सतरा वर्षांची कन्या आपल्या पित्याची जीव की प्राण होती. त्याची इच्छा अशी की, बादशहा आपला ब्याही व्हावा आणि नूर एल हुदा हिच्या सौंदर्यामुळे तसा योग जुळून येईल असा रंग दिसत होता. परंतु मध्येच हे विलक्षण विघ्न उपस्थित झाले. तेव्हा त्याच्या अंगाची लाही लाही होऊन मराठ्यांचा समूळ नाश करून टाकण्याची त्याने प्रतिज्ञा करावी यात नवल काय! त्याने आपल्या मुलीच्या शोधाकरता जिकडे तिकडे माणसे पाठविली, तेव्हा किरातसिंगाने त्यास "मराठ्यांनी तिला आपल्या किल्ल्यावर नेले असेल. सगळ्या देशभर माणसांची दौड करण्यात अर्थ नाही" असे म्हणताच, दिलेरखान त्याच्या अंगावर ओरडून म्हणाला, "तुझं कोरडे पांडित्य मला नको. माझ्या गोष्टी जयसिंगाला सांगाव्या, त्याच्या पलीकडे तुझ्या अंगात काही कर्तबगारी दिसत नाही. जिवावर उदार होऊन त्या मराठ्यांच्या हातून तिला सोडवून आणायला तयार असशील तर पुनः तोंड उघड; नाहीपेक्षा आपलं तोंड काळं कर."

आपल्याला दिलेरखान असे काही उपमर्दकारक बोलेल असे किरात-सिंगास कधी वाटले नव्हते. त्याला फार संताप आला. त्याचा हात तलवारी-कडे गेला, परंतु विचार लागलीच आड आला आणि तो विशेष काही न बोलता तेथून निघून गेला. किरातसिंग दिलेरखानापासून निघाला तो आपल्या-बरोबर आणलेल्या आपल्या अनुचरांसह आपल्या छावणीकडे जाण्यास निघाला. थोडे अंतर गेल्यावर त्याने एक शीळ घालताच अबदुल्ला एका

झाडामागून येऊन त्याच्यापुढे उभा राहिला व दोन्ही हात जोडून म्हणाला :
" खाविंद, आज आपण वाचविलेला हा जीव आता आपलीच सेवा करणार. केली ही सेवा काहीच नाही. आपण सांगितलेल्या संकेताप्रमाणे सारं काम बेमालूम झालं. इतके दिवसांची दोघांची इच्छा एकदाची सफल झाली; आता ती शेवटपर्यंत कशी सिद्धीस जाईल, हे आपल्यावर आहे. ही मराठ्यांची हूल यावेळी फारच वेळेला आपल्याला मदत करायला आली. ती जर न येती, तर सगळी छपवाछपवी व्यर्थच झाली असती. कारण दुसऱ्यावर घालायला ही संधी चांगली सापडली."

" अरे अबदल्या, केवढ्यानं बोलतोस ? दुसऱ्या कोणाला काही समजलं तर !"

" काय ? आपल्याला या आपल्या लोकांचं भय वाटतं ? ही तुमच्या जीवाला जीव देणारी ना ?"

" अरे मूर्खा, या दिवसात कोणी कोणाच्याकरता जीव देत नाही. माझ्याशी तू इमान राखलंस, पण धन्याशी तू बेईमान झालास की नाही ? तेव्हा इमानाच्या गोष्टी बोलू नकोस. पकडून आणलेली मैना तिच्या पिंजऱ्यात जाऊन पडली म्हणजे आपण मिळविली. पुढचं पुढे काय ते पाहून घेणारे घेतील... .."

नंतर किरातसिंगाने आपल्या दोन अनुयायांस बोलावून त्यांच्या कानात काही सांगितले. नंतर त्याने आपल्या कमरेचे शिंग फुंकल्यावर सुमारे पाव घटकेने एक मेणा घेऊन पन्नास घोडेस्वार आले. त्यांच्या मुख्यास किरातसिंगाने काही सांगितल्यावर ते घोडेस्वार व अबदुल्ला तो मेणा घेऊन तेथून निघून गेले.

ते गेल्यावर किरातसिंगही आपल्या मार्गाला लागला आणि योग्य वेळाने तो आपल्या छावणीत येऊन दाखल झाला. आपल्या पश्चात काही अधिकउणे घडले की काय, त्याची चौकशी त्याने केली. नंतर थोड्या वेळाने तो आपल्या छावणीतून निघून जयसिंगाला भेटावयास गेला. तो आलेला कळताच जयसिंगाच्या कपाळास आठ्या पडल्या. त्याला त्याने चमकावण्याचा विचार केला, पण किरातसिंग त्याच्या डेऱ्यात आल्याबरोबर जयसिंग त्यास काही बोलणार, तों तो स्वतः मोठ्याने आणि कपाळाला

आठ्या घालून म्हणतो :— " महाराज, आपली आज्ञा ऐकायची, की खानसाहेबांची, याचा एकदा निकाल लावून दिला, तर आमची गरिबांची त्रेधा तरी उडणार नाही. परवा आपली आज्ञा घेऊन माझ्या छावणीत जातो, तों त्यांचे बोलावणे आले. त्यावेळी असा संताप आला की, साफ येत नाही म्हणून सांगून पाठवावं; पण मातीच्या भांड्यानं तांब्याच्या भांड्याशी कुठं कधी टक्कर मारली आहे ? चुंबित उठलो आणि रखडत गेलो. माझ्यावर नजर पडण्याबरोबर पहिली सलामी ही : " काही फितुरीचा मामला सुरू झाला आहे की नाही ? पण सांगा तुमच्या जयसिंगाना की मी असा फसणार नाही. " हे मी आपल्याजवळ येऊन सांगण्यात काही चुगल्या करतो असे नाही; कारण त्यांचं भाषण चार चौघांसमक्षच झालं म्हटलं तरी चालेल. पुढे मला त्यांनी सांगितले, ' मी देतो हा लखोटा घेऊन औरंगाबादेस जा. ' मी सांगितलं, ' मिर्झाराजांच्या आज्ञेप्रमाणे वागेन. ' हे माझ्या तोंडून शब्द निघाले मात्र, त्यांच्या बडबडीला जी सुरुवात झाली, ती विचारूच नका. खानसाहेबांच्या हुकुमाप्रमाणे मी औरंगाबादला जाऊ काय हे विचारण्यासाठी आलो आहे.

" त्यांनी तुला बोलावणं पाठविलं, तेव्हाच तू माझ्याकडे येऊन विचारायचं होतंस. ते तू केलं नाहीस. आता त्यांनी तुझ्या हाती लखोटा दिला तो पोचविण्याचे कबूल केल्यासारखे करून इकडे आलास. आता तो लखोटा तू पोचविलाच पाहिजेस. "

लखोटा कोणाजवळ द्यावयास सांगितले, त्याचे नाव किरातसिंगाने जयसिंगाच्या कानात सांगितले. त्यावर जयसिंग एकदम म्हणाले, " जा. ज्याला ती थैली ( लखोटा असलेली ) द्यायला सांगितली आहे, ती नेऊन दे. परंतु या लखोट्यात काय आहे हे मात्र मला सांगितल्याखेरीज राहू नकोस. तुझ्या ठिकाणी माझा विश्वास किती आहे, हे तुला माहीत आहेच. जा. "

" ठीक आहे " असे म्हणत किरातसिंग उठला आणि हसत हसत मराठ्यांनी दिलेरखानाची कशी फसवणूक केली, आणि दाणागोटा कसा लुटला ते सांगून किरातसिंग शेवटी म्हणाला, " आणखी सगळ्यात विलक्षण गोष्ट ही, की खानसाहेबांची रूपवान कन्या नूर एल हुदा नाहीशी झाली आहे. जनान्यावरील खोजा अबदुल्लाने सांगितले की, तिला मराठ्यांनी नेली. "

जयसिंग एकदम म्हणाला, " अशक्य. अशक्य. मराठे लोक कोणाच्या स्त्रीच्या अंगाला कधीही स्पर्श करणार नाहीत. त्यांच्या राजाची–शिवाजीची-त्यांना तशी सक्त ताकीद आहे. काही तरी त्यात लबाडी आहे. शिवाजीचे लोक असं कधी करणार नाहीत. त्यांना त्यांच्या कामात नेहमी यश येते ते यामुळेच. "

" ते काय असेल ते खरे. पण अबदल्याने असं येऊन सांगितलं, आणखी दिलेरखानाला ते खरं वाटून त्यानं त्यांचा तीन दिवसात अगदी विध्वंस करून टाकण्याची प्रतिज्ञा केली आहे. "

* * *

## ९. औरंगाबादेकडे

मराठे लोक आपल्या शत्रूशी कितीही लबाड, ठक, महाठक असले, तरी आजपर्यंत त्यांनी कधी कोणाच्या स्त्रियांचा अपहार केला नाही. धन लुटण्याच्या कामात त्यांनी कधी कसुरी केली नाही. शत्रू म्हटला म्हणजे त्याचा विश्वासघात करण्यात त्यांस कधी काही वाटले नाही. भलतीच हूल दाखवून भलत्याच बाजूला शत्रूला नेऊन आपण एकदम तिसऱ्याच ठिकाणी उठून ते शत्रूचा नाश करतील, याबद्दल कधी कोणास शंका नव्हती. आणि जोपर्यंत सत्ययुगातले धर्मयुद्ध कोणीच करीत नव्हते, तोपर्यंत धर्मयुद्ध केले नाही म्हणून शिवाजीराजांस कोणी नावेही ठेवण्याचे कारण नव्हते. या सगळ्या गोष्टी खऱ्या, परंतु स्त्रियांच्या पातिव्रत्याला त्यांनी कधी स्पर्श करण्याचे मनात आणल्याचे सुद्धा उदाहरण शिवाजीमहाराजांच्या आरंभीच्या किंवा नंतरच्या कारकिर्दीत कधी घडले नाही. या गुणाबद्दल त्यांचे व त्यांच्या लोकांचे जो तो वर्णनच करीत असे. कधी कोणी तसला अत्याचार केल्याची गुणगुण जर शिवाजीमहाराजांच्या कानी आली, तर त्या व्यक्तीवर त्यांचा विलक्षण राग होऊन ते त्यास आपल्या सेवेतून दूर

करीत असत. ते म्हणत, 'आपल्यास द्रव्याचे व मुलखाचे कारण. ती दोन्ही हस्तगत झाली म्हणजे तिसरीकडे पाहण्याचे पाप कधीही कोणी करता कामा नये.' या गोष्टी जयसिंगराजांच्या कानी गेल्या होत्या, त्यामुळे मराठ्यांनी दिलेरखानाची सुस्वरूप मुलगी पळवून नेली हे शब्द ऐकण्यास जयसिंगाचे मन मुळीच तयार होईना. या बाबतीत त्याने किरातसिंगाचा वारंवार निषेध केला आणि म्हटले की, "तू म्हणतोस ही गोष्ट सर्वथा खोटी. यात काही तरी आतल्या आत लबाडी आहे."

ते ऐकून किरातसिंग पुनः अजाण माणसासारखा चेहेरा करून म्हणतो : "कोण जाणे! तिकडे छावणीत जे ऐकलं, ते मी आपल्याला सांगितलं. त्या अबदल्याचीही लबाडी असेल. त्यालाच कोणी फूस लावून हा प्रकार केला असेल." असा आपल्या भाषणाचा निरवा करून आणि औरंगाबादला थैली पोचवायला जातो म्हणून सांगून किरातसिंग औरंगाबादेच्या वाटेस लागला. त्याने आपल्याबरोबर त्याच्या विश्वासातले पंचवीस निवडक जवान घेतले होते. त्याने आपल्या लोकांस एकदम हुकूम सोडला की, अबदुल्ला व त्याची मंडळी पुढे गेली आहेत. ती औरंगाबादेजवळ जाण्यापूर्वी आपण त्यांस गाठले पाहिजे. शहाजाद्यास जी शिकार नेऊन द्यावयाची, तिची पहिली बातमी आपणच जाऊन त्यांस दिली पाहिजे, अबदल्याला तो मान मिळता कामा नये. सुलतान मुआझिम याची मर्जी संपादन केली असता आपल्याला अनेक तऱ्हेचे फायदे आहेत, असे किरातसिंगाच्या मनाने घेतले होते. त्याची मर्जी संपादन करण्याकरिता म्हणून त्याने वरील डाव टाकला होता. एकसारखी घोडेपीट करून त्याने अबदल्यास गाठले, तेव्हा त्यास फार आनंद झाला, व आता आपला सगळा डाव साधणार याबद्दल त्यास काही शंका राहिली नाही.

अबदुल्यास त्याने विचारले, "तुझी यजमानीण कशी काय आहे? काही रडारड करीत नाहीना?"

"तिला रडावयाचे कारण काय? दिलेरखानाच्या मनातून शहाजाद्याशी संबंध व्हावा असं होतं की नाही? तो शहाजादा नाही, तर हा. त्यात काय मोठंसं? कोणीकडून शहाजाद्याशी शहाजादा असला म्हणजे झालं!"

" ते खरं. आपल्याला कोण कोणीकडे नेत आहे याचा काही पत्ता तिला लागला आहे का ? तिनं तुला विचारलं नाही ? "

" हो विचारलं, नाही कसं होईल ? पण मी तिची समजूत अशी घालून दिली, की मराठे लोकांनीच आपल्याला पकडलं आहे आणि तेच कोणीकडे नेत आहेत. थोडासा अवकाश गेला म्हणजे तिला सांगेन की मराठ्यांच्या शिवाजीराजाने तिला शहाजादा मुआझिमकडे पोचविण्याचा हुकूम केला आहे. शहाजादा तुला तुझ्या बापाकडे पाठवील अगर काय वाटेल ते करील. "

मराठ्यांनीच आपणास कोठे तरी चालविले आहे अशी अद्यापि नूर एल हुदाची समजूत असेल हे किरातसिंगास संभवनीय वाटेना. तिला जरी पडदापोशीत राहावे लागत असले, तरी तिला बाहेरचे अगदी काही दिसत नव्हते किंवा ऐकू येत नव्हते असे थोडेच होते ! आपल्याला नेणारे लोक मराठे नसून रजपूत आहेत, एवढे समजण्यास काहीच अडचण नव्हती. त्यांची भाषणे चालत. व ती कानी पडूनही आपण अद्यापि मराठ्यांच्याच तावडीत आहोत अशी समजूत ती धरून बसली असेल हे संभवनीय नव्हते. परंतु अबदुल्ला तर तशी खात्री देत होता. काही वेळाने किरातसिंगाने नूर एल हुदाला पाहण्याची इच्छा प्रदर्शित केल्याबरोबर अबदुल्ला त्याला म्हणतो :— " किरातसिंग, ती परी डोळ्यानं पाहण्याची तू मनात बिलकुल आशा बाळगू नकोस. ही तुझी आशा तुझ्या नाशाला कारण होईल. राजाच्या ताटाकडे जर दृष्टी गेली, तर ते अन्न शापल्याखेरीज कधी सोडायचं नाही, हा अगदी पक्का नियम. दिव्याची ज्योत तेजस्वी दिसते म्हणून तिच्यावर झाप टाकणारे किती पतंग आजपर्यंत प्राणास मुकले याचा विचार कर. माझ्यासारख्या खोजाने तुला असा उपदेश करावा हे बिलकुल बरं नव्हे, पण तुझ्याबद्दल माझ्या मनात एक प्रकारची भक्ती आहे म्हणून हे सारं सांगतो. तू नुसतं दृष्टिसुख क्षणभर घेशील; पण जर हे बाहेर कळलं तर तापलेल्या सळ्यांनी तुझे डोळे काढायलासुद्धा हे लोक कमी करणार नाहीत, हा आपला विचार कर...... "

वर सांगितल्याप्रमाणे दोघांचे भाषण झाल्यानंतर किरातसिंग अगदी स्तब्ध राहिला, व दोघेही एकमेकांच्याजवळून मुकाट्याने चालू लागले. ही

मंडळी अशी चालली असता, त्यांच्यामागून एक घोडेस्वार व त्याचा एक नोकर आले आणि पुढे निघून गेले. त्या घोडेस्वाराने त्या मंडळींच्या पुढे जाताना आपल्या तीक्ष्ण दृष्टीने पाहून घेतले. किरातसिंगाचीही त्या गृहस्थाकडे सारखीच दृष्टी होती. त्याने त्याच्याकडे नीट पाहिले. आपल्याजवळून गेला हा पुरुष असामान्य असावा, कोणी तरी सामान्य वाटसरू नव्हे, असे त्याच्या मनाने घेतले. त्याला असे वाटले की, हा मराठ्यांच्या मुख्यापैकी एक असावा. आपण याला अटकाव करून परत फिरविले, तर आपल्याला मोठा फायदा होईल, असा विचार त्याच्या मनात येऊ लागला. किरातसिंगाने आपल्या मनाशी काही विचार केला आणि आपल्या अत्यंत विश्वासू नोकरास बोलावून पुढे जाणाऱ्या घोडेस्वाराच्या नोकरास गाठून ते कोण, कोठे जाताहेत, याची चौकशी करण्यास सांगितले.

त्या विश्वासू नोकराने आपल्या घोड्यास टांग मारून त्या मराठा घोडेस्वाराच्या नोकरास गाठले आणि त्याच्याशी गप्पागोष्टी काढून त्याने त्यांची माहिती विचारून घेतली आणि किरातसिंगापाशी परत येऊन त्याला जी माहिती मिळाली, ती त्याने सांगितली. आपल्या नोकराने आणलेल्या माहितीने किरातसिंगाचे काही समाधान झाले नाही. पण आपला मार्ग सोडून आपण गेल्यास आपल्यावर दुसरेच काही संकट मात्र ओढवू नये म्हणजे झाले, असे त्याच्या मनात येऊन किरातसिंग जास्त चौकशी करण्याच्या भरीस पडला नाही.

इकडे आमचा मराठा शिपाई आपल्या यजमानाजवळ गेला आणि त्यास म्हणतो : "या मंडळींच्या नाईकाला आपला काही तरी संशय खचित आला आहे. मी त्याला उडवून दिला, पण त्याचा काही नेम नाही. ज्या त्याच्या मालकाला शंका आली, तो कदाचित त्याच्या सांगण्याने संतुष्ट व्हावयाचा नाही."

ते ऐकून तो गृहस्थ किंचित चकित झाला व हसून म्हणतो : "तू आताशा फार संशयखोर झाला आहेस. मी त्या माणसाकडे पाहिले, पण मला काही शंका आली नाही. बरं, तू काही त्याला विचारून काढलंस का ते कोण?"

"हो. शहाजादा मुआझिमचा जनाना घेऊन चाललो आहो असे तो म्हणाला. त्यावर मी विचारले की 'मुआझिमचा जनाना इकडे कोणीकडे

गेला असणार ?' तेव्हा आपल्याला त्या भानगडीत पडून काय करायचं असे तो म्हणाला. पण मला यात काही तरी लटपट दिसते आहे. कोणाची तरी स्त्री पकडून तिला हे बळेच मुआझिमच्या जनान्यात नेत असावेत. मेण्या-भोवती केवढा कडक पहारा आहे !"

कोणाची तरी मुलगी अगर बायको पळवून नेण्याच्या त्याच्या संशयाच्या उद्गारावरून तो त्याचा मुख्य एकदम स्तब्ध झाल्याप्रमाणे झाला. व जरा विस्तारित अशा नेत्रांनी त्याच्याकडे पाहून म्हणतो, "काय तुला असा संशय आला ? आणि तुला जर संशय आला असेल, तर आपल्या ब्रीदाला जागलं पाहिजे. त्या बिचाऱ्या स्त्रीला सोडविले पाहिजे, आणि तिला जेथल्या तेथे पोचविले पाहिजे."

"काय ? आपण म्हणता तरी काय ? आपण दोघे, आणखी ते किती याचा काही विचार ? आपल्याजवळ मी आधी आपली शंका बोलून दाखवायला नको होती. परंतु माझ्याने राहवेना म्हणून बोललो. आजवर मनात आलेली गोष्ट आपल्याजवळ बोलल्याखेरीज कधीच राहिलो नाही, आणखी आताच कसा राहणार ? माझा विचार असा की, त्यांना आपल्या-बद्दल संशय आला आहे तर आपण इथून लौकर चालतं व्हावं..."

"हा वेड्या, गरीब बिचारी एखादी स्त्री अशा संकटात पडलेली आपल्या नजरेला आली असता, तिला तशीच सोडून आपण आपला जीव बचावण्यासाठी पळून जावे हेच का आपण आजपर्यंत शिकलो ! ते काही नाही. अजून एक मुक्काम करून ही मंडळी जातील तोंवर त्यांचा पक्का शोध करून आणखी तू म्हणतोस तसंच जर असलं, तर ताबडतोब त्या बिचारीला सोडवू..."

"पण आपण दोघे, ते कितीजण याचा काही विचार ? त्याचा विचार केला नाही तर काय परिणाम होणार याचा विचार ?"

"त्याचा विचार परमेश्वर पाहून घेईल. आपल्या ब्रीदाला आपण जागलं पाहिजे. वेडा कुठला ! आपल्या स्वतःच्या बचावासाठी एका पतिव्रतेला खुशाल भ्रष्ट होऊ द्या म्हणून सुचवितोस ? वेड्या, पतिव्रता ती पतिव्रताच, मग ती मुसलमान असो की हिंदु असो. पतिव्रतेचे रक्षण केलंच पाहिजे. चल. आपण एखाद्या आडवळणाला जाऊन काही वेळ स्तब्ध राहू.

बाल वाङ्मय विभाग
क्र. १.२२ दिनांक ......

आणखी मग सावकाश चालून यांचा मुक्काम होईल तेथे तुला आलेल्या संशयाचा पक्का छडा लावू."

असे बोलून त्याने व त्याच्या नोकराने आडरानात आपले घोडे घातले. स्वारी बरीच लांब गेल्यावर थबकली आणि त्याने आपल्या नोकरास म्हटले, "मी या मोठ्या वडाच्या झाडाखाली बसतो. तू पुनः परत जा. आणखी त्यांचा रोख कोणीकडे आहे ते पाहून ये."

आज्ञा म्हणजे आज्ञाच. ही आज्ञा आपल्या हिताची नाही, हिच्या योगाने नुकसान होणार आहे, तेव्हा आपण ही मानू नये, असला प्रकार नोकरांच्याकडून होताच कामा नये, असे या मराठा शिपायास पूर्णपणे ठाऊक असल्यामुळे त्याने अधिक काही एक न बोलता तो तेथून निघाला आणि काही वेळाने पुढे गेलेल्या किरातसिंगाच्या मंडळींजवळ येऊन दाखल झाला. त्याने आपल्या बोलण्याने आपल्या पहिल्या रजपूत शिपायाचा विश्वास संपादन तर केलाच, इतकेच नव्हे, तर त्यांच्या तळातच शिरकाव करून घेतला आणि तेथेच आपली पथारी पसरली. इतर रजपूत शिपाईही मग त्याच्याशी गप्पागोष्टी करू लागले. किरातसिंगानेही त्यास बोलावून त्याच्याशी भाषण केले. त्या मराठा शिपायाने ज्या गोष्टी सांगितल्या, आणि शिवाजीच्या कृत्याबद्दल त्याने जी नापसंती दर्शविली, ती ऐकून किरातसिंगाच्या मनात एक नवीनच विचार आला व तो त्यास म्हणतो, "तू औरंगाबादला काय कामाला चालला आहेस ?"

"खरं जर पुसाल महाराज, तर मी नौकरी पाहायला चाललो आहे. शहाजादा मुआझिम आता लौकरच उत्तर हिंदुस्थानात जाणार, तर आपण त्याच्याकडे नौकरी मागून, तशी मिळाली तर देशत्याग करावा असा माझा हेतू आहे. शिवाजीच्या पदरी नोकरी मिळेल, पण काय उपयोग ? अहो त्याचा पुंडावा आता किती दिवस टिकणार ! आजपर्यंत आमचे लोक मोंगलाना शिवाजीविरुद्ध मदत द्यायला खुषी नसत. पण याची ही पुंडाई आता जयसिंगराजापुढे आणि दिलेरखानापुढे चालत नाही असे लोकांना दिसू लागले आहे. आमच्यासारखे दोन माहितगार शिपाई आपण जवळ करून त्यांचा उपयोग करून घ्यायला सुरुवात केली की, शिवाजीचा पाडाव व्हायला आठ दिवस सुद्धा लागावयाचे नाहीत ! हे किल्ले इतके भयंकर वाटतात, पण

माझ्यासारखा त्यात हिंडलेला एक किडा आपल्यासारख्याला वश झाला की, एकेका किल्ल्याला एक दिवससुद्धा लागायचा नाही. नाक दाबले की तोंड उघडलेच पाहिजे; पण नाक कोठे आहे, ते मात्र सापडले पाहिजे! का मी म्हणतो ते खरे की खोटे ..."

हे त्या मराठ्याचे बोलणे चालले असता, किरातसिंगाच्या डोक्यात काही विचार सुरू झाले होते. हा मराठा शिपाई किल्ल्यातून हिंडणारा जर असला, तर याला आपल्या हाताशी का घेऊ नये? आपल्याला याच्याकडून माहिती मिळून जर पुरंदर किल्ला घेण्याच्या कामात दिलेरखानाला मदत करता आली, तर केवढी कामगिरी बजावलीशी होणार आहे! पुढे त्यांच्या बोलण्यात मराठा शिपायाने सांगितले की, शहाजादा मुआझिम व शिवाजी यांच्या मुलाखतीच्या वेळी त्यांचे मालक मध्यस्थ होते आणि जुन्या ओळखीने शहाजादा आपल्याला पदरी घेईल असे वाटून ते औरंगाबादेस चालले होते.

शिवाजी आणि शहाजाद्याच्या मेतकुटातील ही माणसे होती असे ऐकल्यापासून किरातसिंग काही निराळाच विचार करू लागला. ही माणसे जर शहाजाद्याच्या ओळखीची आहेत, तर आपली मंडळी अशीच यांच्या हाती देऊन त्या पोरीला शहाजाद्याकडे का पाठवून देऊ नये? बरोबर एक पत्र दिले म्हणजे सर्व खुलासा होतोच आहे. हे सर्व करण्याकरता त्या माणसावर थोडा विश्वास टाकावा. त्या खोजाने उठविलेंच आहे की, मराठ्यांनी त्या पोरीला नेले आहे. ते खरे भासविण्याला परमेश्वराने एक मोठेच साधन आपल्या वाटेत आणून टाकले आहे, त्याचा आपण फायदा करून घेतला पाहिजे. असा एकंदर विचार करून तो त्या मराठा शिपायास म्हणतो, "तुला व तुझ्या धन्याला आमच्याकडे नोकरी करावयाची असली, तर एक फार विश्वासाची कामगिरी सांगतो. ती पार पाडलीस तर तुला किती बढतीवर नेईन याची सीमाच नाही असे समज."

"आमची कर्तबगारी आणि इमानीपणा कोणी कसोटीला लावील तर आम्हाला किती तरी आनंद होईल. आपलं विश्वासाचं काय काम असेल, ते बेलाशक आपण सांगा...."

किरातसिंग विचार करीत स्तब्ध राहिला.

★ ★ ★

# १०. ठकास महाठक

किरातसिंग विचार करीत स्तब्ध बसलेला पाहून त्या मराठा शिपायास फार संतोष झालासे दिसले. मुआझिमला हवे आहे ते आपण केले आहे, मराठ्यांनी नूर एल हुदाला आपणाकडे आणून घातले असे बाहेर जाहीर कर म्हटले, तर तो काही नाही म्हणायचा नाही. माझे नाव जाहीर करण्यात त्याचा फायदा काहीच नाही. मराठे आणि मुआझिम शहाजादा यांचा काही तरी बोटचेपा संबंध आहे, त्यांना लुटालुटीला वगैरे शहाजाद्याने खुशाल मुभा दिली, तो बादशहाला उलट फितूर झाला होता, याबद्दल काहीच शंका नाही. तेव्हा मराठ्यांनी दिलेरखानाच्या नूर एल हुदाला त्याच्याकडे पोचविले असे कळल्यास त्यात आश्चर्य काहीच नाही. मग शहाजाद्याने तिला ठेवून का घेतली म्हणून दिलेरखानाची आणखी त्याची काय मारामारी होईल ती होईल. आपल्याला काय ? आपण नामानिराळे !

किरातसिंगाच्या मनात हे विचार आले आणि ते त्याला इतके आवडले, की आपल्या मुत्सद्देगिरीबद्दल आपण आपल्यास शाबासकी द्यावी असे त्यास वाटू लागले. आपण स्वतः त्या पोरीला घेऊन गेलो असतो, तर आपल्याला मग कोणी पाहिले असते आणि मग आपल्याला यात आपला काही संबंध नाही असे दाखविण्याला फार अडचणी पडल्या असत्या. परंतु आता हा मराठा आपल्याला सापडल्याने आपण कामगिरी करूनच्या करून पुनः नामानिराळे ! बराच वेळ विचार केल्यावर स्वारी भानावर आली आणि त्या मराठ्याला अगदी आपल्याजवळ घेऊन किरातसिंगाने त्यास म्हटले : "या मेण्यात दिलेरखानाची मुलगी नूर एल हुदा आहे. तिला शहाजाद्यांकडे पाठवावयाची आहे. या पोरीबरोबर मी एक पत्र देईन, तेही शहाजाद्याला अर्पण करायचं; तोंडानं मात्र असं सांगायचं की, आम्ही मराठ्यांनी दिलेरखानाला हूल दाखवून एका बाजूला नेला आणखी मग त्याच्या छावणीवर हल्ला करून त्याच्या पोरीला पळवून आणली, ती आपण आमचे साहाय्यकर्ते म्हणून आपल्याला अर्पण करायला आणली आहे. एवढे तुम्ही बोलला म्हणजे माझे काम झाले. माझे नाव आपल्या भाषणात सुद्धा आणू नका. बोल बाबा, आता जे असेल तुझ्या मनात ते !"

मराठा शिपाई हसून म्हणतो : “ कामगिरी तर आपण फार नाजूक सांगितली. इतक्या थोड्या अवकाशात आपला आमच्यावर इतका विश्वास बसला हे पाहून समाधान मानावं की भय मानावं, काही समजत नाही. पण आता आलं लक्षात. आपल्याला स्वतःला हे यश उघडपणाने नको आहे. पत्रात आपण खरी हकिकत लिहिणार. बाहेर आमच्या तोंडानं दुसरीच जाहीर करणार. दिलेरखान आम्हा मराठ्यावर संतापणार. शहाजादा आपल्यावर खूष होणार. शहाजाद्याची आणि दिलेरखानाची जुते पैजार होणार! तरी काही हरकत नाही. आपण ही कामगिरी करायला तयार आहो. आता मी पुढे दौडतो आणि आमच्या यजमानाला ही सर्व हकिकत सांगतो. त्यांची अनुमती मिळणारच, ” असे म्हणून तो मराठा शिपाई तेथून निघाला. जाता जाता त्या आपल्या रजपूत शिपायास परत भेटून त्याने दिलेरखानाला फसवून त्याची मुलगी कशी पळविली याबद्दलची सविस्तर हकिकत विचारून घेतली. नंतर त्याने आपल्या यजमानास भेटून सर्व हकिकत सांगितली. त्याबरोबर तो संतप्त झाला आणि म्हणाला, “ मूर्खा, ही असली अधमपणाची कामगिरी तू पत्करून आलास ? त्या पतिव्रतेला सोडविण्याची जी काय कामगिरी करायला पाहिजे, ती टाकून तू हे भलतंच मनात आणलंस ? ”

मालक संतापून बोलू लागला म्हणजे नोकराने तोंडास तोंड न देता काही वेळ शांतपणा धरावा. संतापाचा भर निघून गेला म्हणजे मग आपल्याला काय सांगायचे ते नोकराने सांगितले तर ते मालक ऐकून घेतो. आणि आपला संताप अस्थानी झाला असे वाटल्यास त्यांस वाईटही वाटते. हे तत्त्व आमच्या मराठा शिपायास फार चांगले ठाऊक होते. आपल्या मालकाचे बोलणे संपल्यावर तो हात जोडून नम्रपणाने हळूच म्हणतो : “ सरकार, मी आपल्या शिकवणीनं पढलेला. मी अमूक गोष्ट करू म्हटलं, तर त्याला काही तरी कारण असल्याखेरीज कसा म्हणेन ? हे प्रकरण काय आहे ते पाहून येण्याची आपण आज्ञा केली, म्हणून त्यांच्या पोटात शिरलो. त्यांचा विश्वास संपादन करावयाचा, तर ते काय म्हणतील त्याला ‘ होस हो ’ केल्याखेरीज दुसरा मार्ग काय ? आपण दोघांनीच एकदम त्यांच्यावर हल्ला करण्यात तात्पर्य काय आहे ? परंतु तेच जर आपण

युक्तीप्रयुक्तीने काही केलं, तर त्यातही आपला हेतू साधेल. पण सरकार, आपण या मुलीला सोडवून जर तिला तिच्या बापाकडे पोचविली असं जर शहाजाद्याला कळलं, तर तो काय म्हणेल ? "

"हा मूर्खा, पतिव्रतेचा नाश करून का शहाजाद्याची मर्जी संपादन करावयाची आहे ? शहाजाद्याचा आपल्याशी असलेला बरेपणा अशा अधम कृत्यात मदत करून काही मिळविलेला नाही. तो गेला तरी बेहेत्तर, समजलास ? तू माघारी त्यांच्याबरोबर जा आणखी औरंगाबादेला पोचण्याला कसा तरी उशीर कर. औरंगाबादच्या अलीकडे बोरगाव आहे; तेथे तुम्ही याल तों दिवस मावळून जाईल असे कर. मी आपल्या तेथल्या लोकांना इशारत देऊन दबा धरून बसतो. तुम्ही येताच हल्ला करून तुमची दाणादाण करतो आणि आपल्या लोकांकडून मेणा उचलून नेऊन बोरगावात रात्र काढू. "

तो मराठा शिपाई ताबडतोब निघाला. त्याच्या मालकानेही घोड्यावर आरूढ होऊन बोरगावचा रस्ता धरला. गावच्या वेशीवरच बोरगावचा शिरकोजी पाटील दिसल्याबरोबर, त्याला जवळ बोलावून काही सांकेतिक शब्दांनी त्याला आज्ञा केली. ती ऐकताच व त्या गृहस्थास पाहताच शिरकोजी आश्चर्यचकित होऊन त्याच्या तोंडाकडे पाहू लागला. त्या गृहस्थाची आज्ञा अंमलात आणण्याकरिता शिरकोजी तेथून गेला, आणि पाव घटकेच्या आत, तेथेच उभे असलेल्या गृहस्थापुढे पंचवीस जवान उभे राहिले. त्याने शिरकोजीस एके बाजूस नेऊन कामगिरी कशी करावयाची ते सांगितले आणि ती जवान मंडळी तेथून निघून सर्व शिताफळीच्या घनदाट राईत दबा धरून बसली.

इकडे आमचे दुसरे गृहस्थ पुनश्च आपला घोडा फेकीत किरातसिंगाकडे गेले आणि त्यांनी त्यास म्हटले, " महाराज, माझ्या मालकानं आपली कामगिरी करण्याचं पतकरलं; परंतु ते मात्र बोरगावला येऊन मिळणार आहेत. पण आपल्या मंडळीला काय हुकूम द्यायचा तो देऊन आपण परतला, तरी खरोखर हरकत नाही. "

किरातसिंगाने आपल्या विश्वासातल्या दोन माणसास सर्व काही योजना सांगितली, त्याचप्रमाणे अबदल्ल्यास बोलावून त्याला आपला विचार

सांगितला. अबदल्याच्या मनात ही गोष्ट केव्हाच भरली. तो एकदम म्हणाला, "आपण युक्ती काढली, तशी काढून माझीही या कचाटीतून जर सुटका होईल, तर फार उत्तम होईल. कारण दिलेरखानास जर माझा सगळा कावा समजला, तर तो हरतऱ्हा करून माझा प्राण घेतल्याखेरीज राहणार नाही."

"तुला रे काय भीती?" किरातसिंग त्यास म्हणाला, "तुझ्या जीवाचं रक्षण करणार खुद्द शहाजादा. त्याच्या जनान्यावर तू मुख्य खोजा होणार. दिलेरखान तर काय, परंतु त्याचे सगळे पितर जरी खाली आले, तरी त्यांच्यानं तुझं काय होणार आहे! तू आता राजासारखा बिनधोक स्त्री राज्यात राहणार. शहाजाद्यानं ज्याला आपल्या पंखाखाली घेतला, त्याच्या नखालासुद्धा कोणाला धक्का लावणं शक्य नाही."

"किरातसिंग, जनानखान्यात माझ्यासारख्याला जितकी भीती तितकी कोणालाच नाही. जनान्यात काय दुःखं असतात, ती जे त्यात असतील, त्यांनाच माहीत. कोण्यावेळीं कोण कोणाचा जीव घेईल याचा कोणास अदमास लागावयाचा नाही. त्यातून माझ्यासारखा नवा माणूस नवीन यजमानीण घेऊन गेला तर माझ्या जीवाला केव्हा धोका बसेल याचा नेमच नाही. असो. चला, आता त्याचे काय! आता काही मला परत जाणं शक्य नाही. परत गेलो तरी तेच, इथे राहिलो तरी तेच. तेव्हा त्यात काही अर्थ नाही."

किरातसिंग त्यावर विशेष काही बोलला नाही. त्या मराठा शिपायाजवळ एका थैलीत घालून शहाजाद्याला देण्यासाठी एक लखोटा दिला. त्या लखोट्यात त्याने आपली कामगिरी केवढी मोठी होती ते नमूद केले होते हे सांगणेच नको. इतके झाल्यानंतर किरातसिंगाने तेथून आपले चंबूगबाळे हालविले.

तो लखोटा हाती घेताना त्या मराठा शिपायास हसू आले. मोठमोठे कारस्थानी लढवय्ये पुरुष यःकश्चित माणसाकडून कसे फसले जातात असे त्याच्या मनात आले. अगदी अनोळखी अशा माणसाकडे असली जबाबदारीची कामगिरी सोपविणे हे मुत्सद्दीपणाचे काम नव्हे असे त्यास वाटले आणि त्यामुळे त्यास हसू आले. नंतर तो आपल्या रजपूत अनुयायास म्हणतो, "चला बोआ, आता आपण उशीर करू नये. बोरगावला फार

वाईट लोक आहेत. ते गाव टाकून एकदा पुढे निघालो म्हणजे मग काही सुद्धा पंचाईत नाही.'' ते त्याचे बोलणे ऐकून सर्व मंडळी त्याची थट्टा करू लागली. 'आम्ही सैन्यातले लोक आहो, आम्ही जर चोराचिलटांना भ्यायला लागलो तर कसे होणार ? ते काही नाही. आपण उशीराच निघू आणि बोरगावास उशीरा पोचून तेथील लोकांना त्या चोरांच्या छळापासून तरी सोडवू' असे म्हणून ते रजपूत सैनिक सावकाशीनेच मार्गक्रमण करू लागले. बोरगावाजवळच्या शिताफळीच्या गर्द राईजवळ आपली सैनिक मंडळी आल्याबरोबर 'हरहर महादेव'चा गजर करून मराठ्यांनी त्यांच्यावर हल्ला चढविला. त्यांच्यात तुंबळ युद्ध झाले आणि या लढाईत मेण्याच्या भोवतीची लढणारांची गर्दी कमी होताच मराठ्यांनी तेव्हाच मेणा उठविला. हल्ला करणाऱ्या मराठ्यांचा डाव साधल्याबरोबर त्यांनी पळावयास सुरुवात करताच रजपुतांनी त्यांचा पाठलाग सुरु केला; पण ती हल्ला करणाऱ्या मराठ्यांची टोळी तेथील गर्द राईत कोणीकडच्या कोणीकडे नाहीशी झाली. यामुळे उल्हसित होऊन मराठ्यांच्या मर्दुमकीची चेष्टा करण्याच्या उद्देशाने ती रजपूत मंडळी परत येतात तों मेणा उडालेला दिसलेला पाहताच रजपूत लोकांची जी त्रेधातिरपीट झाली आहे ती तर काही विचारूच नये. त्यांनी नूर एल हुदाचा खूप तपास केला, पण तिचा मागमूससुद्धा लागेना. तिच्या खोजाच्या अगर मराठा शिपायाचाही पत्ता लागेना. त्यांनी चुडी पेटवून सर्व रान शोधून काढले, पण कोणाचाच पत्ता लागला नाही. आता पुढे काय करावे ते त्यांस सुचेना. आता औरंगाबादला जाण्याचे प्रयोजन उरले नाही, परत जावे तर किरातसिंगाला काय सांगावे ? असा त्यांस पेंच पडला. ती रात्र व दुसरा दिवस त्या मंडळींनी तेथेच काढण्याचे ठरविले.

* * *

# ११. नूर एल हुदा

जसा एखादा चेंडू मुलांच्या हातात सापडला म्हणजे ती मुले त्याला इकडून तिकडे फेकून आपली करमणूक करून घेत असतात, तशीच या वेळी बिचाऱ्या नूर एल हुदाची अवस्था झाली. तिच्या संरक्षणासाठी ठेवलेल्या अब्दल्ल्याने आपल्या यजमानाशी व यजमानणीशी बेईमान होऊन तिला शहाजाद्याच्या स्वाधीन करण्यासाठी पळविले तेव्हापासून तिच्या मनाची स्थिती काय झाली असेल, ते तिलाच ठाऊक. तिच्या तैनातीसाठी तिच्या खासगीतील दासीसुद्धा त्याने ठेवली नाही. तोंड बांधून बुक्क्यांचा मार अशी तिची स्थिती झाली. ती फार सहनशील म्हणून म्हणा, अगर तिला अब्दल्ल्याने काय गोष्टी सांगितल्या असतील त्यावर तिचा भरवसा बसला म्हणून म्हणा, ती आपल्या दुर्दैवाला नावे ठेऊन आपले दिवस लोटीत होती. अशा प्रसंगी पुनः तिजवर हा हल्ला झाला, तेव्हा तिच्या मनाची काय अवस्था झाली असेल, हे काय सांगता येईल? तिला नेणारांनी बोरगावातील एक मोठ्या वाड्याच्या एका महालात तिचा मेणा नेऊन ठेवल्यानंतर एक मराठा स्त्री मेण्याच्या दाराशी येऊन फार सौम्य उर्दू भाषेत म्हणाली, " बेगमसाहेब, आपल्याला मोठ्या संकटातून सोडवून येथे सुरक्षित आणलं आहे. आपण बिलकुल भिऊ नका. लवकरच आपल्याला आपल्या वडिलांकडे सुरक्षित रवाना केले जाईल. इथली मंडळी शिवाजी-महाराजांच्या आज्ञेत वागणारी आहेत; आणि त्यांनी कोणत्याही स्त्रीचा —मग ती शत्रूपक्षाकडील असो किंवा कोणाकडील असो—कधी अपमान किंवा छळ होऊ दिला नाही. आपल्याला आज त्यांच्याच माणसांनी फार मोठ्या संकटातून सोडविलं आहे. आपण अगदी निःशंकपणे बाहेर या. आपल्याला विश्रांती घेण्यासाठी या वाड्यात आणून ठेवले आहे." त्या स्त्रीची इतकी आग्रहपूर्वक आणि आश्वासनपूर्ण विनंती ऐकल्यावर नूर एल हुदा आपल्या मेण्याबाहेर आली आणि तिने आपल्या सभोवार पाहिले, तों त्या महालात खरोखरीच फार श्रेष्ठ अशा कुटुंबातील स्त्रीला राहण्याला सर्वथैव उपयोगी अशी सर्व व्यवस्था होती. इतकी ही जनान्या-तील व्यवस्था केवळ एकदम कोणी तरी करून झालेली नाही; कोणा तरी

थोर सरदाराच्याच वाड्यातील जनान्यात आपणास आणून ठेवले आहे अशी तिची खात्री झाली. तिच्या स्वतःच्या महालात जशा प्रकारची व्यवस्था असावयाची तशा प्रकारची व्यवस्था येथे कोणी तरी अगदी मुद्दाम केली आहे अशी तिच्या मनाची खात्री झाली. तिच्या दिमतीस असलेल्या मराठा स्त्रीने तिच्या सुरक्षिततेबद्दल पाच पंचवीस वेळा आश्वासन दिल्यामुळे तिला बराच भरवसा आला. आतापर्यंतच्या आपल्या स्थितीत आणि आताच्या स्थितीत काही तरी अंतर आहे असे तिचें तिला वाटले आणि ती स्तब्धपणे बसली. मात्र तिला आपण कोठे आहोत ते कळेना; ते जर आपण विचारले, तर आपल्याला कोणी सांगणार नाही, तेव्हा आपण मुकाट्याने एखादा दिवस काढून हलके हलके या बाईच्या पोटात शिरून काय ते काढू, असा तिने पोक्त विचार केला. तिच्या सभोवतालची स्थिती अशा प्रकारची होती, की तिच्या मनाला एका क्षणी जरी भीती वाटली, तरी दुसऱ्या क्षणी ती खरी नव्हे असेच तिला वाटे. तर आपण तिला तशीच सोडून त्या मराठा सरदाराकडे जाऊ.

बोरगावास रजपुतांवर हल्ला झाला, त्यात तो मराठा सरदार नव्हता. त्या हल्ल्यात रजपुतांचा पराभव करून नूर एल हुदा हिला पकडून आणून तिची वाडयात व्यवस्थित व्यवस्था लागेपर्यंत तो तेथून हलला नाही. तिची आपल्या मनाप्रमाणे व्यवस्था लागल्यानंतर तो व त्याचा मराठा शिपाई तेथून औरंगाबादेस जाण्यास निघाले. वाटेत त्यांचे झाल्या घटनेबद्दल बरेच बोलणे झाले. औरंगाबादेस गेल्यानंतर ते एका भव्य वाडयापाशी गेले. तेथे जाताच त्यांना उतरून घेण्यासाठी दहापाच नौकर धावले. त्या दिवशी तेथली काय करावयाची ती कामे केल्यानंतर दुसरे दिवशी तो मराठा सरदार शहाजाद्यास भेटण्यासाठी गेला. त्यास पाहून शहाजादा म्हणतो : "आपल्याला का पाठविले आहे, त्याचा मला तर्क झाला आहे. माझी अशी समजूत आहे, की आपण यावेळी पडती घेतल्याखेरीज दुसरा उपाय नाही. मी तर आता जातोच. आमच्या वडिलांचा आधी माझ्यावर बेताबेताचाच विश्वास होता. त्यात मी आपल्या मंडळींच्या मोहात पडून थोडंबहुत तसंच वर्तन केलं. तेव्हा त्यांनी तसा संशय घेऊन दुसरी मंडळी पाठविली, तर त्यात नवल काय ? आता माझा आपल्याला असा सल्ला

आहे की, आपण काही फार त्रास करून घेण्याच्या भानगडीत पडू नये. जी जोडी वडिलांनी पाठविली आहे, ती आपले काम केल्याखेरीज येथून जाणार नाही. नमून वागून जर काही जमले, तर जमेल; नहून सगळा कारभार भलताच होईल. मी इथं राहू नये म्हणून बादशहाचा हुकूम. तो मान्य केला नाही, तर याच लोकांना आम्हाला अटकेत ठेवण्याबद्दलसुद्धा हुकूम व्हायला कमी होणार नाही. मीसुद्धा पडत्या फळाची आज्ञा म्हणून आग्र्याचा रस्ता धरणार. मी इतकं तुम्हाला सांगतो, ते एवढ्याचकरिता की, आता आमच्यापासून किंवा तहनामा होण्याच्या संबंधाने काही खटपट केवळ अशक्य आहेत!"

"आम्ही नमून घ्यायचं म्हणजे आजपर्यंत काबीज केलेला सगळा मुलूख यांच्या स्वाधीन करून आपण स्वस्थ बसायचं एवढंच की नाही? दुसरा काही उपायच नाही. आपली मदत असती, तर या लोकांनासुद्धा खडे चारायला मागेपुढे पाहिलं नसतं. पण आपणच जाणार म्हणता, तेव्हा काय करायचं?"

"जयसिंगराजांना आजपर्यंत कोणी खडे चारणारा भेटला नाही, आणखी पुढे कोणी भेटेल ही कल्पनाही व्यर्थ आहे. त्यात आणखी दिलेरखान आहेत. या दोघांवर आमच्या वडिलांचा अगदी पुरापुरा विश्वास. इतका काही आम्हा कोणावर नाही. आणखी खरं बोलायचं तर ते दोघे आहेतही तसेच. तेव्हा त्यांच्याशी झुंज करण्याचा विचार आपण करू नये. हा आमचा सल्ला सांगा. काही कावा करून आपले कार्य साधेल अशी समजूत धरली तरी ती व्यर्थच. मी सांगतो हे काही तरी उगीच नाही. माझ्या दृष्टीने योग्य तोच सल्ला मी देत आहे. याउपर आपण आपला विचार पहा!"

मराठा सरदार अगदी स्वस्थ बसला होता!

* * *

# १२. पुरंदरकडे

मागे एका प्रकरणात सांगितल्याप्रमाणे, पुरंदरावरील मराठ्यांनी दिलेरखानास फसवून त्याच्या छावणीचा फार खराबा केला; शिवाय मराठ्यांच्या त्याच्या वरील छाप्याचा फायदा घेऊन अबदल्ल्याने दुसऱ्या तऱ्हेनेही त्याचा जीव की प्राण असलेल्या त्याच्या मुलीचे अपहरण केल्यापासून त्याच्या अंगाचा अगदी तिळपापड उडाला होता. कोणाचे नुकसान झाले, की त्याला ते नुकसान करणाऱ्याचा जो संताप येतो व त्या संतापाच्या भरात ज्या ज्या इच्छा उत्पन्न होतात, त्या त्या जर सत्य करून दाखविता आल्या असत्या, तर आजमितीस जगावर मनुष्याची वस्तीच राहिली नसती. दिलेरखानास मराठ्यांचा संताप आला, पण त्याला किल्ल्यावरील लोकांचे बळी घेणे तर शक्य नाही. तेव्हा याने कोणाचा तरी बळी घ्यावयाचाच अशा निश्चयाने आजुबाजूची खेडीपाडी जाळून फस्त करण्याचाच सपाटा सुरू केला. वड्याचे तेल वांग्यावर हाच त्यावेळी त्याचा न्याय होता. मराठ्यांच्या या भयंकर दुष्कृत्याबद्दल जर आपल्याला सूड उगवावयाचा आहे, तर आपणाबरोबर आणलेल्या सैन्यापैकी बरेचसे सैन्य आपल्या ताब्यात एकवटून घेऊन हल्ला केला तरच ते शक्य होईल. तेव्हा जयसिंगाकडून कुमक मागितली पाहिजे. परंतु कुमकेच्या मागणीबरोबर आतापर्यंत काय स्थिती झाली हेही कळविलेच पाहिजे. असा काही तो मोठ्या पेचात पडला: परंतु तो आपोआपच या पेचातून निघाला. इकडे काय हकिकती झाल्या त्या किरातसिंगाने आपल्या परीने जयसिंगास सांगितल्या होत्या. शिवाय इतर जासुदांकरवी त्याबद्दलच्या बातम्या आल्याच होत्या. तेव्हा काय करावयाचे ते जयसिंगाने ठरवून दिलेरखानाकडे आणखी बरीचशी कुमक पाठविण्याची त्याने तयारी केली होती व स्वतःही तिकडे जाण्यास सिद्ध झाला होता. यामुळे दिलेरखानाकडून जासूद पाठविण्याची आवश्यकता राहिली नव्हती. दिलेरखानाची व जयसिंगाची भेट होताच दिलेरखानाने सर्व हकिकत सांगून मराठ्यांवर शिव्यांचा भडिमार केला आणि आपण या लढाईत प्राण देऊ किंवा त्यांचे घेऊ, असे निकराचे शब्द उच्चारले, तेव्हा जयसिंगाने त्याचे समाधान करून सांगितले की, " आठ दिवसांच्या आत आपण तो किल्ला

घेऊन टाकू. आपण आणखी मी दोघे जेथे अगदी एकजुटीने काम करीत आहोत तेथे आता या लोकांचा पाड काय लागणार ? ”

राजा जयसिंगाने लागलीच आपल्या सैन्याच्या तुकड्या निरनिराळ्या मोक्याच्या ठिकाणी उभ्या करून किल्ल्यावर जाणारी रसद बंद केली. पुरंदरच्या जवळील रुद्रमाळ गडासमोरील टेकडीवर तीन तोफा दिलेरखानाने चढविल्या आणि रुद्रमाळावर तोफांचा भडिमार सुरू केला, तेव्हा रुद्रमाळावरील लोक भेदरून गेले. त्यांनी दहा दिवसपर्यंत चांगला टिकाव धरला. परंतु सभोवताली मोंगलाचा सेनासमूह इतका पसरला होता, की त्यातून रसद येण्याची शक्यता न दिसल्याने गडावरील मंडळी हवालदिल झाली होती. त्यात एके दिवशी दिलेरखानाने रुद्रमाळावर जोराचा चढाव करून हल्ला केला आणि लोकांचा पराभव करून त्यांस सैरावैरा पळण्यास लाविले. रुद्रमाळावर आपली मुलगी नाही, पुरंदरावरील लोकांनी नेलेली आहे इतकी खात्री दिलेरखानास होती. रुद्रमाळ घेतला अशी पुरंदरावरील लोकांची खात्री झाली की, ते शरण येतील असे त्यास वाटले असावे. रुद्रमाळावरील लोक शरण आल्यावरही दिलेरखानाने त्यास छळण्याचा उपक्रम चालविला आहे, हे कळताच जयसिंग तेथे आला आणि पुढे काय करावयाचे या विषयावर त्या दोघांचे बोलणे झाले. तेव्हा राजा जयसिंग दिलेरखानास म्हणतो :– “ आपण शत्रूकडील लोकांना मोठ्या मानमरातबाने वागविले, तरच समोरच्या किल्ल्यातले लोक आपणास लवकर वश होतील, नाही तर कधी होणार नाहीत. आपला हेतू काही त्या लोकांना ठार मारण्याचा किंवा त्यांचे हाल करण्याचा नाही. आपल्या हाती किल्ला आला, त्यांनी हत्यारं खाली ठेवली, आणखी काय पाहिजे ? जर आपण त्यांचा छळ करू, तर लोक आपल्यावर चिडतील आणि मरेपर्यंत शरण येणार नाहीत. उलट, आपण या लोकांना चांगल्या तऱ्हेने वागवून त्यांच्या पोटात आपल्याविषयी विश्वास उत्पन्न होईल असे करू म्हणजे दुसऱ्या ठिकाणच्या लोकांना आपल्याविषयी गैरविश्वास न होता, आपल्याला ते लवकर शरण येतील. रुद्रमाळचा किल्ला हा आपण पहिला किल्ला घेतला आहे, तेव्हा तेथील लोकांना चांगल्या तऱ्हेने वागवू. ”

दिलेरखानाला याप्रमाणे बोलून नंतर किल्ल्यावरील पराभूत लोकांस आपल्यापुढे आणून राजा जयसिंगाने त्यांचा मोठा मान करून सांगितले की, " तुम्ही इतर किल्ल्यावरच्या लोकांना जर आपल्यासारखे लवकर शहाणे कराल, तर फार उत्तम होईल. विनाकारण माणसं मरायला नकोत. आम्ही तुम्हाला मोकळे सोडतो. वाटेल त्या किल्ल्यावर जा. परंतु विनाकारण कोठेही झुंज होईल अशी तजवीज करू नका. झुंज झाली तर आम्ही भितो असे नाही; परंतु झुंज न होता किल्ले जितके आमच्या हाती येतील तितके बरे. " अशी मोठी गोड बोलणी बोलून त्याने लोकांना खूष करून तेथून लावून दिले. हे पाहताच दिलेरखानास वाईट वाटले. त्याच्या मनात असे होते की सर्व मंडळी अडकून ठेवावी म्हणजे त्यांचा जीव वाचविण्यासाठी पुरंदरचे मराठे आपणास लवकर शरण येऊन आपली मुलगी आपणाकडे पाठवून देतील. रुद्रमाळ घेतल्यावर महाराष्ट्र पुनः काबीज करण्यास राजा जयसिंगाने आरंभ केला ! दिलेरखानाने आपला मोर्चा पुरंदरकडे वळविला. पुरंदरच्या सभोवताली पुरेसे सैन्य ठेऊन जयसिंगाने बाकीच्या सैन्याच्या तुकड्या केल्या आणि त्यांस अशी सक्त ताकीद दिली की, शिवाजीने जसा मोंगलांच्या प्रांतात धुमाकूळ घातला, तसा धुमाकूळ प्रत्येक तुकडीने आपापल्या प्रांतात घालावा. आडदांड लोकांस अशा प्रकारची परवानगी मिळाल्यानंतर आणखी काय पाहिजे ? सैतानाचा भूतखाना मोकळा सोडावा, त्याप्रमाणे ते मुसलमान व रजपुतांचे सैन्य मोकळे सुटले आणि त्या सैन्याने लोकांवर नुसता कहर गुदरविला. आपली घरेदारे सोडून लोक आपल्या जीवासाठी धावत सुटले. आपल्या संपत्तीचा अगर कसलाही मोह त्यास राहिला नाही. दीन होऊन पळणाऱ्या लोकांचा पाठलाग करण्याची फार मौज त्या छळकांना वाटू लागली. हाती सापडलेल्यांचा छळ करावा, बायकांचे हाल करावे, यातच त्याना फार आनंद वाटू लागला. शेतवाड्या व घरांचा त्या लोकांनी किती भयंकर नाश केला, ते वर्णनसुद्धा करणे शक्य नाही. पुरंदरच्या सभोवार पाचपंचवीस कोसातली मनुष्यवस्ती पार नाहीशी झाली, असे म्हटले तरी मुळीच अतिशयोक्ति होणार नाही. हे पाहून पुरंदरच्या किल्ल्यावरील लोकांची अंतःकरणे अगदी दुभंगून गेली कारण कोणाचा तरी तेथील वस्तीतील नातेवाईक नष्ट झाला होता. परंतु ते लोक असे विलक्षण वीर की,

त्यांच्यापैकी एकानेही असे मनात आणले नाही की आता किल्ला शत्रूच्या स्वाधीन करावा. किल्ल्यावरील प्रत्येक व्यक्तीचे प्रेत पडेपर्यंत किल्ला शत्रूच्या हाती जाता कामा नये, असे जो तो म्हणू लागला. मोंगलाचा सेनासमुद्र इतका भयंकर होता की, त्याच्या नुसत्या दर्शनाने कोणीही तेव्हाच भयभीत व्हावयाचा. परंतु मराठ्यांचे ते ब्रीद नव्हे. 'मरू तेव्हा हटू' या ब्रीदाची ध्वजा त्यांनी उभारली होती. तेव्हा आपापल्या सामर्थ्यानुरूप व कौशल्यानुरूप मोंगलाच्या छावण्यावर छापे घालून त्यांना क्षुब्ध करण्यास त्यांनी कमी केले नाही.

परंतु एकंदरीत रुद्रमाळ घेतल्या वेळेपासून मोंगलाची उमेद आणि मराठ्यांची नाऊमेद यास, चढती व उतरती कळा लागली होती. मराठ्यांच्या नाऊमेदीला मोठे कारण झाले, ते हे की, त्यास कोठूनही कुमक येण्याचा संभव दिसेना. मोंगल सैन्य सर्वत्र पसरल्यामुळे किल्ल्याच्या चोरवाटांची तोंडेही त्यांना नकळत त्यांच्याकडून बंद झाली. यामुळे बाहेरचे मराठेही कुमक करण्यास जाण्याच्या कामी हताश झाले. इतरही ठिकाणी राजा जयसिंगाने आपले सैन्य पाठवून मराठ्यांना एकत्र जमण्याची संधीच दिली नाही. अशा प्रकारे सर्व बाजूंनी नाडल्यामुळे मराठ्यात एक प्रकारचा हताशपणा आला. या हताशपणानेच आपला फायदा होईल असे जयसिंगाने आपल्या मनात पक्के निश्चित केले. आपल्या हेक्याने गरीबगुरिबांस विनाकारण त्रास होतो आहे, असे एकवार शिवाजीराजांस कळले म्हणजे ते हा सर्व प्रकार लवकर शेवटास नेतील अशी त्याच्या मनाची खात्री होती. का की कोणत्याही कारणाने सर्व महाराष्ट्रभर अशा प्रकारचा त्रास गरीब लोकांस होण्यास आपण कारण होऊ नये ही त्यांची अत्यंत दृढ इच्छा ! त्या इच्छेच्या आड जर सध्याचा एकंदर प्रकार येतो आहे, तर तो किती दिवस चालवावयाचा ? अखेरीस आपली सरशी होत नाही, जयसिंगराजाला जर आपण अंकित करून घेतले नाही, तर आपल्याला आता या झुंजेत यश येणार नाही, असे महाराजांच्या मनाने घेतले. त्यांची झोप नाहीशी झाली, अंगाची तगमग होऊ लागली, आपण बांधलेले मंदिर आपल्या डोळ्यादेखत खाली ओढले जावे, याबद्दल त्यांना अतोनात वाईट वाटू लागले. आमचेच देशबंधू या मुसल्मानांची नोकरी पतकरून आमच्यावर उठून आले. आम्ही जे काय

थोडेसे स्वराज्य उभारले ते पाहून दिल्लीकडे आपण आपले स्वराज्य उभारण्याचा विचार करावयाचा, तो सोडून देऊन आमचे हातपाय तोडण्यासाठी यांनी म्होरकेपणा पतकरून इकडे यावे, याचे त्यांस कितीतरी वाईट वाटले. जयसिंगराजे आपल्याला दाबून टाकून बादशहाजवळ आपला बडेजाव वाढविणार; तेव्हा आपल्याला त्यांच्याकडून मदत म्हणून कधी होणार नाही असे शिवाजीमहाराजांस पक्के दिसून आले. परंतु निराशा व खिन्नता ही शिवाजीमहाराजांना फार वेळपर्यंत आपल्या ताब्यात कधीच ठेवू शकली नाही. प्रसंग जसजसा अधिक बिकट, तसतशी त्यांची निश्चयबुद्धी अधिक उत्तेजित होत असे. त्यांच्या मनाचा एकवार असा निश्चय झाला, की एकवार आपण राजा जयसिंगाची प्रत्यक्ष भेट घ्यावी आणि त्याचे हे कृत्य किती अनिष्ट, आपल्या एकंदर राष्ट्राला किती वाईट आहे हे स्पष्ट त्याच्या डोळ्यापुढे मांडू आणि त्याचे मन आपल्याकडे वळले तर पाहू असे त्यांच्या मनात आले. या आपल्या करण्याचा या खेपेस काही सुद्धा उपयोग होणार नाही, तथापि आपण प्रयत्न केला नाही असे केव्हाही मनात येता कामा नये, असा एकंदर विचार करून महाराजांनी आपला वकील रघुनाथपंत यास जयसिंगाकडे पाठविले. आपण लुटालुटीचा सपाटा सुरू केला तर खात्रीनेच शिवाजी आपल्याला शरण येईल असे जयसिंगाने अनुमान केले होते, व ते खरे ठरले याबद्दल त्यांस फार आनंद झाला.

* * *

## १३. किल्ल्यावर

किरातसिंगाची अशी महत्त्वाकांक्षा होती की, 'येन केन प्रकारेण' आपण जयसिंगाची जागा पटकवावी. बादशहाचा जो काय विश्वास जयसिंगावर आहे, तो आपल्यावर ओढून घ्यावा, आणि त्याला खाली ओढावे, व हे साधण्यासाठी काय केले पाहिजे, या विचाराखेरीज दुसरा विचारच त्याच्या

मनात घोळत नसे. जयसिंगाबद्दल बादशहाच्या मनात वैषम्य कसे उत्पन्न करता येईल, हा एक विचार त्याच्या डोक्यात एकसारखा घोळत असे. आपणास 'संधी' जर मिळाली, तर आपण त्याच्याहीपेक्षा श्रेष्ठ असल्याचे बादशहास भासवू शकू असे त्यास वाटे. नूर एल हुदा इला शहाजाद्याकडे पाठवून दिल्यापासून तर त्याला असे वाटे की, आपण एक मोठे महत्कृत्य केले. या आपल्या कृत्यामुळे शहाजादा संतुष्ट होईल आणि आज नाही उद्या आपणास काही तरी मोठा लाभ होईल. आपल्या रजपूत शिपायांस नूर एल हुदा ईस शहाजाद्याकडे घेऊन जाण्यास व आपले पत्र देण्यास सोडून आल्यानंतर त्यास लागलीच रुद्रमाळ घेण्याच्या कामगिरीत गुंतून बसावे लागल्यामुळे त्यास दोनचार दिवस दुसऱ्या कशाचाच विचार करण्यास सापडलेच नाही. पण त्यानंतर मात्र आपले लोक अजून का परतले नाहीत, किंवा एखाद्या जासुदाबरोबर निरोप का आला नाही, असा विचार त्याच्या मनात येऊन तो आता अस्वस्थ झाला होता. आणखी आठदहा दिवस झाले, तशी त्याच्या जिवाची अधिकच तगमग होऊ लागली. शेवटी स्वतःच वेष बदलून हळूच जाऊन यावे, मात्र आपण येथून कोठे गेल्याचे कोणास अगदी कळू नये अशी तजवीज करून किरातसिंग तेथून निघाला. तो अशा वेषात हिंडत असता, वाटेत त्यास रघुनाथपंताच्या लवाजम्याचा तळ पडलेला आढळला. त्याने काही बहाणा करून रघुनाथपंताच्या छावणीत प्रवेश तर करून घेतलाच व आपण राजे जयसिंग यांच्याकडून आलो असल्याचे सांगून रघुनाथपंतांची भेट सुद्धा त्याने घेतली. या भेटीत रघुनाथपंत जयसिंगाकडे का जात आहेत, याची बातमी त्याने काढून घेतली; आणि आताची बातमी दिलेरखानास सांगून तो आणि राजे जयसिंग या दोघात लठ्ठालठ्ठी लावून देऊन बादशहाकडे राजांचा जितका पाणउतारा होईल, तितका करविण्याचा हा एक उत्तम प्रसंग आहे असे त्यास वाटून, त्याने आपला पहिला विचार मागे टाकला आणि त्वरेने तो दिलेरखानाच्या छावणीत गेला. त्यावेळी बरीच रात्र झाली होती, तरी त्याची गाठ घेऊन 'शिवाजीचा वकील, आपल्याला न कळता, राजे जयसिंगाच्या मुलाखती घेतो' असे त्याने सांगितल्याबरोबर दिलेरखानास फार संताप आला. जयसिंगाबद्दल दिलेरखानाचे मन अगोदरच कलुषित झालेले होते, त्यात या प्रकाराने

आणखी भर पडली. राजा जयसिंगाच्या दरबारात कोणा तरी विश्वासू हेरास पाठवून तेथील बातम्या कळवून घेण्याची आवश्यकता किरातसिंगाने प्रतिपादन केल्यावर, दिलेरखानाने ते काम त्याच्यावरच सोपविले. पण किरातसिंगावर ही कामगिरी सोपविताना दिलेरखान त्यास म्हणतो : " ठीक आहे. तू म्हणतोस तसं कर. या मुलाखतीचा काय काय चमत्कार होतो तो पाहून ये. मला काही कळू न देता, आपल्या दुष्मनाच्या वकिलाशी बोलणी लावायचं, यांना असं कारण तरी कोणतं ? एकंदरीत तुम्ही हिंदु हिंदु एक होऊन केव्हा आमचा गळा कापाल याचा पत्ता नाही, एवढी गोष्ट मात्र खरी. "

किरातसिंग त्यावर एवढेच म्हणाला : " सगळेच हिंदु सारखे असतात असं नाही. तसं असतं तर मी आपल्याकडे ही बातमी द्यायला का आलो असतो ? मुकाट्यानं काय व्हायचं ते होऊ दिलं असतं. "

" आणखी तू करतो आहेस ते तरी त्याच मासल्याचं नाही म्हणून कशावरून ? शिवाय तुझा हेतू केवळ एवढाच असेल असे मला वाटत नाही. "

हे बोलणे ऐकून किरातसिंगास फार संताप आला. परंतु तसाच मूग गिळून तो तेथून निघाला. तो तशा रात्री चढ्या घोड्यानिशी निघून प्रातःकाळच्या सुमारास राजे जयसिंग यांच्या छावणीपासून एक कोसावर येऊन पोचला, तों त्याच्या घोड्याने पुढे जाण्याचे एकदम नाकारले. तो एकसारखा चालणार तरी किती वेळ ? त्याला विश्रांती पाहिजे होती. त्याच्या मालकाने, ' रणछोड, एक कोसभरच जमीन उरली आहे, तरी असं करू नको; तेथे गेलो म्हणजे विश्रांती देईन ' असे प्रेमाने विनविले; परंतु तेथून न हलण्याचा घोड्याचा निश्चय कायम झालासे दिसले.

★ ★ ★

# १४. माता रणदेवीचे चरित्र

ज्या जागी घोडा थांबला, ती जागाही फार रमणीय होती. आंब्याची सुंदर राई; तीत एक लहानसा ओढा; त्या ओढ्याचे पाणी स्वच्छ शंखा-सारखे. तशात आता सूर्यबिंब अर्धवट वर येत असल्याकारणाने त्याचे कोमल किरण त्या पाण्यावर पडून त्याच्या स्वच्छ तेजस्वितेची जोड मिळवून देत होते. त्या प्रवाहाच्या मोहकतेनेच त्या घोड्यास तेथे थांबण्याचा आग्रह धरावेसे वाटले असावे. घोड्याचा तसा आग्रह पाहिला, तेव्हा त्याच्या मालकाचे मनही मवाळले. किरातसिंग घोड्यावरून खाली उतरला आणि एका झाडाखाली गाशा टाकून त्याजवर स्वस्थ पडला आणि थोड्याच वेळात निद्रेने त्याला पूर्ण वश करून घेतले.

त्याचा घोडा ' रणछोड ' मात्र मिळालेल्या विश्रांतीचा पूर्ण उपभोग घ्यावयाचा असा निश्चय करून इकडेतिकडे हिंडू लागला. तो घोडा स्वच्छंदाने आहारविहार करीत नदीतीराच्या जवळ आला. तेथे सहासात गोसावणींचा एक संघ स्नानभजनादि क्रिया करण्यात गुंतला होता. एक गोसावीण चंदन उगाळीत असताना हिंदी भाषेतील एक रामाचे पद गात होती. त्या गाण्याचा स्वर कानी पडताच, घोड्याचे कान आकर्षित झाले. ते कान त्याने लागलीच टौकारले आणि अत्यंत जाणीव दृष्टीने तो त्या गाणाऱ्या मूर्तीकडे पाहू लागला. त्यास काही तरी स्मरल्यासारखे झाले असावे, आणि रणछोड एकेक पाऊल त्या स्त्रीच्या बाजूला टाकीत चालला. हा घोडा आपल्या कोमल स्वरामुळे आपल्याकडे येत असावा असे तिच्या मनातही आले नाही. ती आपल्या गाण्यात तल्लीन होऊन हातांनी चंदनाचा खल करीत होती. होता होता तो घोडा इतका जवळ आला, की त्याचे तोंड तिच्या खांद्याला लागण्याच्या बेतात आले. म्हणून तिने वर पाहिले, तों त्याच्याकडे तिची दृष्टी गेली; त्याबरोबर " कोण रणछोड ! बेटा, तू इकडे कोणीकडे ? तुझा यजमान कोठे आहे ? " असे म्हणून तिने त्याच्या खांद्यावर हात टाकला. त्या स्त्रीस पाहण्याबरोबर त्या घोड्यासही

फार आनंद झालेला त्याच्या चर्येवर अत्यंत स्पष्ट दिसत होता. त्याने आपले नाक त्या स्त्रीच्या गालाला लावले आणि डोके खाली करून तिच्या खांद्याला किंचित घासले. वाचेव्यतिरिक्त जितक्या प्रकारांनी म्हणून आपला आनंद व्यक्त करून दाखविणे शक्य असेल, तितक्या प्रकारांनी त्याने तो दाखविला. त्याच्या डोळ्यातून आनंदाश्रू स्पष्टपणे वाहू लागले. ते पाहून त्या स्त्रीसही फार आनंद झाला. उठून उभे राहून तिने त्याच्या सर्वांगावरून हात फिरविला, आणि "बेटा रणछोड! तू किती तरी वाळलास" असे म्हणून तिने फार प्रेमाने त्याच्या पाठीवर थोपटले. रणछोड तीनतीनदा आपले मस्तक त्या स्त्रीच्या अंगाशी घाशी आणि आपला यजमान जेथे निजला होता तिकडे पाही. त्या घोड्याच्या प्रेमळ व्यापारांनी दाखविलेल्या निद्रित व्यक्तीकडे पाहून तिने एक दीर्घ उसासा टाकला. डोळ्यात आलेले अश्रू तिने पुसले आणि पुनः घोड्याच्या पाठीवर थोपटून ती त्यास म्हणते, "रणछोड, तुला तरी त्याने अजून आपल्याजवळ कायम ठेवलं हे आश्चर्यच आहे. एखादा अरबस्तानातला नाही तर तुर्कस्तानातला घोडा बादशहाने दिला म्हणून तुला एखाद्या भाडोत्री घोडी हाकणाऱ्याला देऊन टाकायचा! ठीक. तू आपला तरी इमानी रहा." रणछोडास त्या स्त्रीचे भाषण जणु काय समजलेच. त्या स्त्रीचा पदर आपल्या दातांनी ओढून आपण तिकडे जाऊ लागला. परंतु ती स्त्री तेथून हलेना. त्या घोड्यास परत थोपटून ती म्हणते: "बाबारे, एकदा निश्चय करून निघाले ते निघाले. जे आमच्या कुळात कोणी केले नाही ते याने करून सगळ्या कुळाला मोठा कलंक लावला. त्याला जयसिंगाचं उदाहरण बरं वाटलं राजसिंहासारख्यांचं उदाहरण— प्रत्यक्ष घरचं ब्रीद त्याला पटलं नाही. त्या कुलांगाराचं मुख पाहण्याला मला कशाला आग्रह करतोस! मुका प्राणी, नाही तर तुला सुद्धा अशा माणसाची सेवा सोडून माझ्या या गोसावर्णीच्या संघाजवळ रहा म्हटलं असतं. तू आता जा. मीही इथून लवकर निघते. नाही तर, न जाणो माझी प्रतिज्ञा मोडण्याचा मला मोह पडेल!" असे म्हणून व पुनः आपले अश्रू पुसून नदीच्या तीरी असलेल्या आपल्या मैत्रिणींच्याकडे तिने आपले तोंड केले. कोणाचा तरी सुंदर उमदा घोडा माता रणदेवीजवळ उभा असून त्याच्या पाठीवर तिने हात ठेविलेला पाहण्याबरोबर तिच्या मैत्रिणींना फार

आश्चर्य वाटले. त्यांच्यापैकी एक तत्काळ बाकीच्यास म्हणाली, "मी म्हटलं नाही, की माता रणदेवी काही आपल्यासारखी भुकेकंगाल नाही. ती कोणा तरी मोठ्या शूराची स्त्री असून आपल्या मुलाबाळासंबंधाने विरक्त होऊन तीर्थयात्रेला आपल्याबरोबर हिंडते आहे! ती एखाद्या वृद्ध मातेप्रमाणे आपली काळजी घेते. जणु काय आपण तिच्या लेकीच आहोत. असा तिचा आपल्या ठिकाणी जीव दिसतो, तो योग्य कुळातल्या माणसाखेरीज दिसावयाचा नाही."

ते ऐकून दुसरी तिला म्हणते, "एक दिवस आपण तिला तिची हकिकत विचारून घेतलीच पाहिजे. पण हा घोड्याचा प्रकार काय आहे बरं?"

सर्वजणी त्या घोड्याकडे व माता रणदेवीकडे पाहू लागल्या.

इकडे माता रणदेवी तीनतीनदा त्या घोड्याच्या पाठीवर थोपटी व दूर झाडाखाली निजलेल्या किरातसिंगाकडे पाही. तिला एकदोन वेळा असेही वाटले, की त्या मुक्या जनावराने सुचविल्याप्रमाणे आपण किरातसिंगाच्या जवळ जावे आणि त्यास एकदा डोळे भरून पाहावे. तिचे पायही तिकडे जाण्यास उतावीळ झाल्याप्रमाणे दिसत होते. परंतु त्या पायास व मनासही ती आवरून धरीत होती हे अगदी उघड होते. माता रणदेवी ही फार वृद्ध नव्हे व फार तरुण नव्हे अशी पोक्त वयाची होती. तिचे स्वरूप फार मोहक, अंगकांती स्वभावतः फार तेजस्वी आणि त्यात पुरश्चरणाने तिच्या मुखावर विशेषच प्रकारचे तेज दिसू लागले होते. ज्या रामाच्या भजनात ती सदासर्वदा निमग्न असे व राममातेच्या शोकाचे पद नेहमी म्हणत असे, त्या कौसल्येची धीरोदात्त मूर्ती जशी असावी अशी आपली कल्पना होते, तशीच ती दिसत असे. इतकेच नव्हे, तर राम वनवासात गेल्यानंतर अत्यंत विरक्त स्थितीत जशी कौसल्या दिसत असेल, तशीच ही दिसे. तिच्या या मोहक व धीरगंभीर चर्येवर वैराग्याचा पूर्ण ठसा उठलेला दिसे व त्यामुळे कोणीही तिजकडे पाहिले तरी तिला वंदन करून तिच्या दृष्टीचा व वाणीचा आपणास प्रसाद मिळेल काय? अशीच आशा करी. तिच्या संघातील सर्व गोसावणी तिला अत्यंत पूज्य मानीत, इतकेच नव्हे तर, ती एक आपल्यावर अधिष्ठान करण्यास सच्चिदघन रामाने

देवताच दिली आहे असे त्यांना वाटे. तिच्या पुण्यप्रतापाने आपणास कोठेही ददात पडत नाही; तिच्याजवळ अन्नपूर्णा आहे असाही त्यांचा समज झालेला असे. सर्वजणी तिला माताजी, किंवा माता रणदेवी म्हणत असत.

आपल्या मैत्रिणींचे लक्ष आपल्याकडे लागले असे पाहताच माता रणदेवीचे चित्त दृढ झाले, आणि घोड्याकडे वळून म्हणाली, " बेटा रणछोड, जा. मी आता त्याचं मुखावलोकन करण्याला पुनः येईन ही आशा मनात धरू नकोस. तुझ्याकडून होईल तसं त्याचं रक्षण कर. तो इकडे दक्षिणेत का आला, तेही आता माझ्या लक्षात आलं. तू जा." असे म्हणून तिने त्याची आयाळ धरून त्यास परत वळविले.

ती आपल्या मैत्रिणीकडे गेली व त्यास म्हणाली, " येथे आपली स्नानं झाली. काही कारणानं माझ्या मनातून येथे आता राहावंसं वाटत नाही. मजवर कृपा करून चलाल तर बरं. आणखी चार कोस पलीकडे जाऊन मग मुक्काम करू. "

त्या संघातील कौसल्यादेवी नामक स्त्री म्हणाली, " माताजी, आम्ही आपल्या आज्ञेबाहेर नाहीच. परंतु जिज्ञासा काही गप्प बसू देत नाही. हा घोडा आपल्याजवळ कसा गेला, जातीचा पशू असून त्याची आपल्या ठिकाणी भक्ती कशी ? पण पाहिलेला हा प्रकार अतिशय चमत्कारिक व अद्भूत वाटून आम्ही आपल्याला विचारतो आहोत. "

कौसल्यादेवी याप्रमाणे बोलत असता, माता रणदेवीला आपला उमाळा आवरेनासा झाला. तिने आपले डोळे पुसले आणि आपली सर्व हकिकत सांगण्याचे तिला आश्वासन दिले. नंतर सर्वजणींनी तेथील सामान आवरले आणि त्या आपल्या पुढील मार्गास लागल्या.

आपला तो गोसावणींचा लहानसा संघ बरोबर घेऊन माता रणदेवी तेथून चालली होती खरी; परंतु तिच्या मनाची स्थिती त्यावेळी फार विलक्षण झाली होती. पुढे जात असतानाही घोड्याकडे व त्याच्या यजमानाकडे वळून वळून ती पाहत होती. ती पुढे इतक्या दूर गेली, की तिला तो घोडा आणि झाडाखाली निजलेला रजपूत वीर दिसेना. तिला मागील आठवणी होऊन तिच्या डोळ्यावाटे अश्रू वाहू लागले. ती आजपर्यंत अशा करुण स्थितीत

आपल्या मैत्रिणींना कधीही दिसली नव्हती. तेव्हा त्यांनाही त्याबद्दल फार आश्चर्य वाटले व करुणा आली. शेवटी कौसल्याच्याने राहवेना. तिने आदराने माता रणदेवीस म्हटले, "माताजी, आपले मन फार उद्विग्न झाले आहे, तर आपण आता पुढे चालू नये. या सुंदर वडाच्या झाडाखाली आता उन्हाची वेळ काढू." माता रणदेवीला आता स्वतःचे विचारबळ राहिले नव्हते. ती कौसल्येच्या मागोमाग जाऊन वडाखाली बसली.

अनुसूयेला माताजींच्याजवळ ठेऊन कौसल्या आपल्या इतर मैत्रिणींसह नजिकच्या गावातून आहारसामुग्री आणण्यास गेली. ते स्थान मोठे रमणीय असल्यामुळे माता रणदेवीच्या चेहऱ्यावरील उद्विग्नता लवकरच नाहीशी झाली. आणि ती अनुसूयेस म्हणाली, "अनुसूये, आज माझी ही सारी चमत्कारिक वागणूक पाहून तुम्हाला फार आश्चर्य वाटलं असेल नव्हे, हे काय आहे हे समजून घेण्याचीही तुम्हाला उत्कंठा झाली असेल. परंतु ती तुमची उत्कंठा तृप्त करण्याला माझा पूर्वीचा इतिहास सांगायला पाहिजे. कौसल्या, द्रौपदी, जानकी या सगळयाजणी आल्यावर सांगेन. मनात साठवून ठेवलेले दुःख एकदा बाहेर पाडून टाकले, की मनाची शांति होते; आणखी तुमच्यासारख्या जिवाला जीव देणाऱ्या मैत्रिणींपेक्षा असे दुःख सांगायला आणखी उत्तम ते कोण असणार ! माझ्या चरित्राची कहाणी ऐकलीत, की माझ्यासारखी दुर्दैवी स्त्री या जगात दुसरी कोणी नाही, हे तुम्हाला समजून येईल. मी आपल्या कुळाच्या ब्रीदाला विसरून जसा वारा येईल तशी पाठ देण्याला कबूल झाले असते तर ......परंतु तो विचार तरी कशाला ? ज्या प्रभू रामचंद्राच्या वंशातल्या एका घराण्याची मी मुख्य होते, त्या घराण्याला कलंक लागलेला पाहण्यापेक्षा आपण संसारपरित्याग करणे बरे असे माझ्या मनाने घेतले आणखी मी या व्याघ्रचर्मानिशी व नेसत्या पातळानिशी बाहेर पडले. स्त्रियांना सगळयात विलक्षण मोह जो असावयाचा तो मोह मोठ्या कष्टाने दूर सारून वनवास पत्करला. गृहानंद सोडून परमानंद पत्करताना मला काय कष्ट झाले असतील ते माझे मलाच माहीत. ही सगळी हकिकत मी तुम्हाला सांगणार आहे."

या भाषणाने आनंदित होऊन अनुसूया माताजीस म्हणाली, "माताजी, आपण थोर कुळातील आहात याबद्दल आम्हाला शंकाच

नव्हती. आपण आमच्या लहानशा संघात आल्यापासून आपल्या पुण्याईने आम्हाला प्रवासात कधी त्रास झाला नाही, की पोटापाण्याची कधी काळजी वाटली नाही. "

थोड्याच वेळात तिच्या मैत्रिणी गावातून आल्यावर तिने आज माताजी आपली सर्व हकिकत सांगणार असल्याचे सांगितले. नंतर सर्वांनी मिळून शुचिर्भूतपणे फलाहार केला आणि माताजींच्या भोवती बसल्या. माताजी रणदेवी धीरगंभीर वाणीने म्हणाली, "मैत्रिणींनो, राजपुतान्यात..." इतक्यात कौसल्यामाई म्हणाली, "माताजी! हा भरधाव सुटलेला घोडा आपल्या अंगावर येतो की काय? उठा, उठा." माताजी उठून पाहतात तों स्वार असलेला एक घोडा अतिशय भरधाव असा आपल्या बाजूला येत आहे असे दिसले. तो घोडा त्या स्वारास अनावर झालेला असला पाहिजे हे उघड दिसले. तो रणछोड होता. हा कितीही भरधाव आला तरी आपल्याला पाहताच थबकेल असे माताजीस वाटले. आपल्यास आपल्या यजमानाजवळ नेण्याचा प्रयत्न केला, परंतु तो साध्य झाला नाही, तेव्हा आपल्या यजमानाला इकडे आणावे अशी मनात योजना करून याने इकडे धाव घेतली असावी असा तिने तर्क केला. घोडा माताजीजवळ येऊन थबकताच्च किरातसिंगाने घोड्यावरून एकदम खाली उडी टाकली आणि या बायांकडे न बघता घोड्याच्या आयाळीस हिसका देऊन त्याला एक चपराक लगावून खूप शिव्या दिल्या आणि नाकावर एक ठोसा लगावला. हा ठोसा वर्मी लागल्याने घोडा खाली पडला. माता रणदेवी त्याच्याजवळ बसली आणि तेवढ्यात तिच्या मैत्रिणींनी आणलेले पाणी तिने रणछोडच्या तोंडावर मारले. घोडा आता उठत नाही, असे किरातसिंगास दिसले; यामुळे तो त्या गोसावणींना म्हणाला, "बायानो, उगीच कशाला धडपड करता? तो आता काही उठायचा नाही. त्याच्या वर्मी ठोसा लागला. माझे कोण घाईचे काम, आणखी हा तर केवळ हट्टाने भडकला. त्याचाही आता वृद्धापकाळ झाला आहे म्हणा, तेव्हा आता तो टाकूनच्च द्यायला पाहिजे होता. त्याच्या नशिबात असा मृत्यू होता!"

त्याचे ते बोलणे ऐकून माता रणदेवी संतापाने लाल झाली आणि तिने क्रुद्ध दृष्टीने एकवार किरातसिंगाकडे पाहिले. परंतु तितक्यात त्या मुक्या

जनावराने मानेला एक हिसडा देऊन तिच्या हातावर मान टाकली आणि प्राण सोडला.

किरातसिंगाने आपली शस्त्रास्त्रे तेवढी घेतली आणि घोड्यास तसाच टाकून तो तेथून चालता झाला.

* * *

## १५. किरातसिंग जातो

आपल्या घोड्यास निष्ठुरपणाने मारून त्याच्या प्रेताची वास्तपुस्त न करता तेथून जाणाऱ्या किरातसिंगाकडे पाहात माता रणदेवी पाव घटका स्वस्थ उभी राहिली. तो पार दृष्टीआड झाल्यावर एक दीर्घ निःश्वास सोडून त्या मृत अश्वाकडे ती पाहू लागली. नंतर आपल्याशीच ती म्हणते, "बेटा रणछोड, तुझ्या नशिबी असे मरण यावेना ! तू माझ्या ठिकाणच्या प्रेमामुळे आपल्या धन्यास घेऊन इकडे आलास. मला पाहिल्याबरोबर जसा तुला विलक्षण आनंद झाला, तसाच तुझ्या धन्यालाही होईल असे तुला वाटले; व त्याबद्दल तुझ्या धन्याच्या हातून तुला अशा प्रकाराने आणखी माझ्या देखत मरण यावे, या दुर्दैवाला म्हणावे तरी काय ! ज्याने मला सुद्धा ओळखले नाही, त्याने तुझी अशा तऱ्हेने विल्हेवाट लावली याबद्दल वाईट वाटण्याचे काय कारण ! पण बाबा, तुला स्वर्ग मिळाल्याखेरीज राहणार नाही. तू आपल्या ब्रीदाला योग्य असे कर्म केलेस. तुझ्या नावाने पुनः एकदा स्नान करून तुला तिलांजलि देते आणखी येथून जाते."

माता रणदेवीने पुनः एकवार नदीत स्नान केले आणि तेथून जाताना त्या अश्वाकडे निरखून प्रेमपूर्ण दृष्टीने पाहिले.

इकडे किरातसिंग आपली शस्त्रास्त्रे घेऊन निघाला, तो थेट राजा जयसिंगाच्या छावणीत गेला. राजांची मुलाखत झाल्याबरोबर दिलेरखानाने

आपणास आपल्या छावणीत राहून हेरगिरीची कामगिरी सांगितल्याबद्दल तक्रार करून म्हटले, "मी हे कधी करणार नाही. एक वेळ आपण अशी कामगिरी सांगितली तर मला कबूल आहे. राजेसाहेब, आपण या कामात वृद्ध झाला. आम्ही तरुण पिढीचे रजपूत जेव्हा आपापसात बोलतो, तेव्हा आपण भोळे आहा असे म्हणतो. आपल्या मर्जीविरुद्ध बादशहाला जाता येत नाही, त्याचे कारण सगळा राजपुताना आपल्या मुठीत आहे. आपण जर एक शब्द उच्चारला, तर आपल्याला बादशहाचे तख्त मिळेल. पण आपण तसा काही प्रयत्न करावयाचे टाकून इकडे या बिचाऱ्या शिवाजीसारख्या, मोंगलांचे राज्य नष्ट करण्यासाठी धडपड करणाऱ्या वीराला दडपून टाकण्यासाठी येता, याबद्दल खरोखर आमच्या वयाची मंडळी आपल्याला नावे ठेवतात. बरं, आपल्यावर तरी बादशहाचा आणखी त्याच्या हस्तकांचा विश्वास आहे का? ज्यांना आम्ही पूज्य मानतो, त्यांच्यावर नजर ठेवून फितुरी करण्याचे काम सांगण्यापर्यंत जेव्हा दिलेरखानाने मजल आणली, तेव्हा आता मर्यादा नाहीशी झाली, आणखी माझ्या तोंडून हे सगळे निघाले!"

किरातसिंगाचे हे सगळे बोलणे इतक्या आवेगाचे व मनःपूर्वक दिसले की राजा जयसिंगास त्याचे फार कौतुक वाटले. याच्या मनात आपल्याविषयी इतके भक्तिमय विचार असतील अशी कल्पनासुद्धा त्यास नव्हती. जयसिंगाने त्याला आपल्या जवळ घेतले आणि म्हटले: "बच्चा किरातसिंग, तू म्हणतोस त्या गोष्टी काही आम्हाला समजत नाहीत? बादशहाने एखादी कामगिरी दिली; तर नाही म्हणता येत नाही. दक्षिणेत मी जात नाही म्हणून म्हटले असते, तर बादशहाने माझ्या हेतूबद्दल संशय घेतला असता; आणखी बादशहाची भयंकर इतराजी होऊन काय वाटेल ते नुकसान करण्याला मग काय अवकाश होता? बरं, मी एक नाही म्हटलं असतं तर माझी जागा घेण्याला हजारो रजपूत राणे-महाराणे टपलेले आहेत. आमच्या सगळ्यात तरी एकी कुठे आहे बाबा? स्वराज्य आणि स्वतंत्रता नको कोणाला? आम्हाला काय मोंगलांना सदोदित डोक्यावर घेऊन नाचावेसे वाटते? मी शिवाजीला सामोपचाराने समजावून सांगून तरी वळवीन. दुसरे आले असते तर त्यांनी रोज कित्येक बळी घेतले असते. असो. तुला येथे छावणीत राहावेसे वाटते ना? ठीक आहे.

रहा, पण विनाकारण उड्या मारू नको. येथे जे पाहशील अगर ऐकशील, ते विसरून जा. जर, त्याचा कोठे उच्चार करशील, तर काय प्रसंग तुझ्यावर ओढवेल याचा नेम नाही. दिलेरखानाच्या मनातून शिवाजीला अगदी चिरडून टाकावयाचे आहे. माझ्या मनात तशी बुद्धी नाही. माझ्या मनात एवढेच आहे, की तो सर्वस्वी बादशहाचा ताबीन झाला असे त्याने कबूल करावे. पुनः त्याने पाठीमागे काय वाटेल ते करावे."

किरातसिंग हे सर्व — विशेषतः शेवटले भाषण फार काळजीपूर्वक ऐकत होता. ज्या हेतूने तो आला, तो साध्य झाला असे त्यास वाटले. तेथे राहिल्यानंतर किरातसिंगाचे बातम्या काढण्याचे गिरमीट सुरू झाले. परंतु मिळालेल्या बातम्या दिलेरखानाकडे पाठविणे मात्र त्याला वाटले तितके सोपे नव्हते. आपल्या बोलण्यावर भरवसा बसल्याचे जयसिंगाने जे दाखविले, ते कृत्रिम असून आपणही काही तरी कारस्थानात आहो अशी त्यास जबरदस्त शंका आली असे त्याच्या भाषणावरून व वर्तनावरून दिसल्या-बरोबर किरातसिंगास फार भय वाटले. जोपर्यंत त्याला आपण यास फसविले, असे त्यास वाटत होते, तोपर्यंत तो निर्धास्त होता. पण आपणच फसलो अशी शंका येण्याबरोबर त्याचा निर्धास्तपणा कोणीकडच्या कोणीकडे गेला.

* * *

## १६. स्वप्न व त्यानंतर

शिवाजीमहाराज एकटेच राजगडावर आपल्या एकांतस्थळी विचार करीत बसले होते. पुरंदरचा किल्ला पडला आणि मुरारबाजीसारखा रणधुरंधर सरदार धारातीर्थी पडल्याची वार्ता नुकतीच आल्याने त्यांच्या निराशेत भर पडली होती. आपण या खेपेस कितीही धडपड केली तरी आपल्याला यश येणार नाही, आपल्याला पड खावी लागणार असा विचार त्यांचे

मनात वारंवार उभा राही. आपण येथवर रचीत आणलेली इमारत एकदम ढासळून पडणार की काय? असा प्रश्न त्यांच्या मनाला एकसारखा त्रास देत होता. शेवटी मोठा थोरला उसासा टाकून ते आपल्याशीच म्हणतात: "जयसिंगाला आपल्याकडे वळवून घेण्याचा यत्न केला, पण त्या कामात सिद्धी येईल असे दिसत नाही. आधी सर्वस्वी शरण या, मग तहाचे बोलणे किंवा दुसऱ्या काही गोष्टींचे बोलणे लावायचे ते लावा. परंतु नुसते तहाचे बोलणे ऐकायला आपल्याला फुरसत नाही असे त्याने निखालस उत्तर दिले." पुढे काय करावयाचे याचा विचार त्यांनी चालविला. अशा स्थितीत त्यांचा नेहमीचा प्रघात असा असे, की आई भवानीला शरण जाऊन तिचे चरण धरावयाचे. तसे केले की, त्यांना बहुतकरून योग्य तो दृष्टांत व्हावयाचाच. आणि त्या दृष्टांताच्या द्वारे जे हितकारक व कल्याणकारक तेच करण्याविषयीची स्फूर्ती व्हावयाची अशी त्यांची श्रद्धा असे. त्याप्रमाणे आता करण्याचा विचार त्यांच्या मनात आल्याबरोबर ते प्रतापगडास जाण्यास लगेच निघाले. त्यांच्याबरोबर नेहमी असणारी त्यांची चार माणसेही ताबडतोब निघाली. वाटेने जाताना त्यांनी आपल्या माणसाशी एक शब्दसुद्धा भाषण केले नाही. राजगडापासून प्रतापगडापर्यंत जाताना त्यांनी जे अनेक प्रकार पाहिले, त्यामुळे त्यांचे मनास फार उद्वेग झाला. सभोवार किती खेडी उध्वस्त झाली होती! किती शेतांचा पार विध्वंस झाला होता! एकंदर सृष्टी किती उदास-झाली होती!

इतका सगळीकडे नाश होतो आहे, हजारो लोकांचे प्राण बळी पडताहेत, हजारो घरे उध्वस्त होताहेत, हजारो कुटुंबे दुःखात बुडताहेत; असल्या प्रकारच्या लढाया मी मारतो आहे; परंतु हे सारे ज्या हेतूने, ज्या आशेने आरंभिले आहे, तो हेतू तर पूर्ण होण्याचा रंग दिसत नाही. त्याला आमचीच माणसे आड येतात. ज्या मोंगलांच्या जुलमातून सोडवायला मी एवढी खटपट करतो आहे, त्याला नेस्तनाबूत करू इच्छिणारे कोण आहेत? तर आमचीच माणसे. हे जसवंतसिंग झाले, हे जयसिंग झाले, यांनी मुसलमानांचे राज्य फैलावण्यासाठी धडपड करून, जे त्याचा फैलाव होऊ नये म्हणून खटपट करताहेत, त्यांना दडपून टाकण्यासाठी त्यांनी प्राण टाकावे! या विचित्र स्थितीला म्हणावे तरी काय? स्वतः आपण बादशहा

होण्याचे मनात आणले तरी यांना अशक्य नाही. पण स्वतः या धर्मछळ करणाऱ्या औरंगजेबापुढे माना वाकवून आमच्या मानेवर पाय देण्यासाठी हे प्रतिज्ञा करून इकडे येतात आणि असा धुमाकूळ घालतात याला काय म्हणावे ? दैवाची गती विचित्र म्हणून स्वस्थ बसावे, दुसरे काय ? आतापर्यंत अनेक विघ्ने आली पण ती सर्व आई भवानीने पार केली, सर्व गोष्टीत यश दिले. पण या खेपेचा रंग बरोबर दिसत नाही.

या प्रकारचे मनाला अत्यंत उद्वेग उत्पन्न करणारे विचार महाराजांच्या मनात या प्रसंगी वावरू लागले. पण प्रतापगडचे भव्य स्वरूप नजरेस येण्याबरोबर त्यांना एक प्रकारे समाधान वाटले. गडावर जाऊन ते जगदंबेच्या समोर गेले. आजच्या प्रसंगी त्यांच्या मातुःश्री जिजाबाईसाहेब गडावरच होत्या. त्यांच्या सन्निध जाऊन आपण आज अंबेच्या चरणी समाधी लावणार असल्याचे त्यांनी सांगितले. नंतर महाराज शुचिर्भूत होऊन एकटेच मंदिरात गेले. भवानी तलवार म्यानातून काढून त्यानी हाताच्या आटोक्यात ठेविली आणि तोंडाने काही बीजमंत्र म्हणत म्हणत ते अंबेच्या चरणी लीन झाले. त्यांना गाढ समाधि फार वेळ लागली. महाराजांची समाधि उतरल्यावर, त्यांना समाधिस्थितीत जे काय नजरेस पडले ते सर्व त्यांनी जिजाबाईसाहेबास निवेदन केले. दृष्टांतात पाहिलेल्या प्रकारामुळे महाराजांना आलेली खिन्नता एकदम नाहीशी झाली.

जिजाबाईसाहेब महाराजांच्या तोंडून दृष्टांत ऐकल्यावर बराच वेळ अगदी स्तब्ध बसल्या आणि मग म्हणतात, "बाळा शिवाजी, प्रसंग तर मोठा दुर्धर आहे. पण या दृष्टांताचा अर्थ काय ? काय तुला हे दोघे—जयसिंग आणि दिलीर—दृष्टांतातल्या सिंहवाघाप्रमाणे तुला ओढीत नेणार ! हे तुझा जिकडेतिकडे पराभव करणार. सगळ्या लोकांना छळणार. सगळा देश उजाड करणार आणखी हे सगळे तुझ्यादेखत घडून तुला शेवटी कैद करणार. हा या दृष्टांताचा मला अर्थ दिसतो. याहून दुसरा अर्थ नाही."

जिजाबाईसाहेबांचे हे बोलणे चालले असता महाराज संचितपणे नुसते त्यांचे भाषण ऐकून घेत होते. जिजाबाईसाहेबांनी जो अर्थ केला, त्याखेरीज दृष्टांताचा दुसरा अर्थच संभवत नव्हता. त्यामुळे त्यांच्या मनास फार

वाईट वाटले आणि ते आपल्या मातुःश्रीस म्हणतात, " मग आजच्या दृष्टांतात आशा करण्याजोगे काही नाही तर ? "

" का बरं नाही ? " जिजाबाईसाहेब म्हणतात, " अरे बाबा, तुला काय असं वाटतं, की सगळ्या गोष्टी अगदी नेहमी आपल्या इच्छेप्रमाणेच झाल्या पाहिजेत ? कधी होतील, कधी नाही होणार. पण शेवटी मात्र आपल्याला पाहिजे तसं होणार. तूच पहा बरं, तुला जो दृष्टांत झाला त्यात तुला काय दिसलं ? वादळे झाली, तुफाने झाली, ढगांनी सूर्य अगदी झाकला गेला, तुला कैद करून नेलं, पण शेवटी काय झालं ? तू कैदेतून सुटलास, ढग वितळून गेले, वादळ शांत झालं, आणखी सूर्य पुनः पहिल्याप्रमाणेच तळपू लागला. आणखी काय पाहिजे ? आई जगदंबेने शेवटी काय होणार हे सांगितलंच आहे. "

" शेवटी म्हणजे केव्हा ? सगळ्या स्वराज्याच्या मंदिराचं वाटोळं झाल्यावर पुनः अशी घडी कशी बसेल बरं ? कधी बसणार नाही. "

" शिवबा आज तू विलक्षणच निराश झालेला दिसतो आहेस, आणखी आईवरली तुझी श्रद्धाही थोडी... "

" छे. छे. छे. आईसाहेब, असं आपण स्वप्नात सुद्धा आणू नका. अंबाबाई आणि समर्थ यांच्या ठिकाणची माझी श्रद्धा अणुभर सुद्धा कधी कमी होणार नाही. यांच्यावरली माझी श्रद्धा हे तर सगळ्या स्वराज्याचे मूळ... "

इतक्यात धीरगंभीर वाणीने उच्चारलेले पुढील वाक्य त्यांच्या कानी पडले.

" आणि म्हणूनच कितीही संकटं आली आणखी कितीही पड खावी लागली तरी शेवटी तुझाच विजय. "

ज्या पवित्र व सुप्रसन्न मुखातून ती धीरगंभीर वाणी बाहेर पडली, त्या स्वामी समर्थांच्या मुखाचे दर्शन होताच त्यांना सर्वांनी दंडवत घातले. अगदी अनपेक्षितपणे असा दर्शनलाभ होईल ही कल्पनाही त्यांना कोणाला नव्हती. शिवाजीमहाराज आपल्या विशाल नेत्रांनी समर्थांच्याकडे एकसारखे पाहत होते. आपण ऐन संकटात असता आपल्याला धीर देण्यासाठी, गुरुमहाराजांची स्वारी धावून आली आणि आपली विचारपूस केली, तेव्हा हाही एक चमत्कारच म्हणावयाचा असे त्यांस पक्के वाटले.

थोडीशी स्वस्थता झाल्यानंतर समर्थ म्हणाले : " शिवबा, तू इतका खिन्न होऊ नको. बाबारे, ज्याला मोठे मंदिर बांधावयाचे, त्याला केव्हा तरी पड खावी लागणारच. शत्रू जोरावर आहे, तर त्याच्या तंत्राने घेण्याला कमी करू नये. जयसिंग ज्या तहाच्या अटी घालतो, त्या कबूल करायलाही हरकत नाही. चाललेला संहार हिताचा होणार नाही. तो संहार बंद होण्यासाठी, त्याचे म्हणणे ऐकून घेऊन कार्य साध. आपण काय करतो आहोत, हे जयसिंगास समजत नाही त्याला समजून घेण्याची इच्छाही नाही. तर त्याच्याप्रमाणे होऊ दे. तो ज्या कार्याकरिता आला आहे, ते कार्य केल्याचे समाधान मिळाल्याखेरीज तो राहणार नाही. सूर्य एवढा तेजस्वी, परंतु त्याला सुद्धा उदयास्त आहे, त्याला ग्रहण आहे, तेजोभंग आहे. तर आपल्यासारख्या पामरांची कथा काय ? तू जयसिंगाची भेट घेऊन त्याचे मन वळविण्याचा कितीही अट्टाहास केलास, तरी तो तुला बधायचा नाही. तुझा नाश व्हावा ही त्याची बुद्धी नाही. त्याची बुद्धी एवढीच की, आपण जी प्रतिज्ञा करून आलो, ती पूर्ण करायची. आपली प्रतिज्ञा पुरी झाली असे एकदा त्याच्या मनाला वाटले म्हणजे मग तो कोणतेही बोलणे ऐकायचे असेल, तर ऐकेल. तोपर्यंत सगळा खटाटोप व्यर्थ आहे. आपल्या विचाराप्रमाणे त्याचे विचार का नाहीत ? असे म्हणून आपले मन खट्टू करून घेण्यात काही तात्पर्य नाही. आई जगदंबेने तुला स्वप्नाच्या द्वाराने जे सुचविले ते अगदी चुकायचे नाही. तेव्हा आता जास्तकमती विचार न करता आपल्या पुढच्या विचाराला लाग. मीही आता तीर्थाटणास जाणार आहे. काही दिवसपर्यंत आता तुझी आमची भेट होणार नाही. रामाची उपासना जितकी विस्तृत होईल तितकी करावयाची हा हेतू धरून तीर्थे आणि क्षेत्रे आम्ही हिंडणार. ... "

" आपण तीर्थयात्रेला जाणार म्हणजे आमच्या सर्व कार्यात आम्हाला यश देणारी देवताच आम्हाला सोडून जाणार म्हणायची. असो. आपण सांगाल त्याच्या बाहेर मी नाही. पंताच्या मार्फत आता असाच उपक्रम करावयाचा म्हणायचा, की ते म्हणतील त्या अटी कबूल करून तह पण आपण तीर्थयात्रेला जाणार याबद्दल मनाला फारच खिन्नता वाटते आहे. दोन दोन महिन्यात जरी दर्शनाचा योग आला नाही, तरी मनाला खात्री असे

की, जेव्हा मनात येईल तेव्हा जाऊन दर्शन घेऊन आपले मन मोकळे करायला हरकत नाही. पण आपणच आता तीर्थयात्रेला जाणार तेव्हा काय करणार ?"

"शिवबा, अरे तुझी माझी भेट व्हायची नाही एवढ्याकरिता का तू मला तीर्थाटनाला जाऊ नको म्हणणार ? ( किंचित हसून ) आणखी तुलाही तीर्थाटनाचा प्रसंग येणार नाही म्हणून कशावरून ? पुढे काय होईल त्याचा विचार करण्याची प्रत्यक्ष जरुरी पडल्याखेरीज विनाकारण चिंता करून मनाला त्रास करून घेऊ नये. दाशरथी रामाची तुजवर कृपादृष्टी आहे. तेव्हा तुला तो सगळ्या कामात पूर्णपणे यशस्वी करील. चार दिवस त्याला जसा वनवास भोगावा लागला तसा तुलाही लागला म्हणून काय हरकत आहे ! तुझ्यासारख्या विभूतींना गृहवास आणि वनवास दोनही सारखीच असली पाहिजेत. वनवासाला भिऊन काय होणार ? आम्ही तीर्थयात्रेला गेलो किंवा आणखी कोठे गेलो, तरी आमचे चित्त सगळे तुझ्याजवळ आणखी तू आरंभलेल्या कार्यात. पुनः आम्ही सांगतो की, किती जरी संकटं आली तरी शेवटी तुला पूर्ण यश येणार हा आमचा पूर्ण आशीर्वाद आहे. येतो आता."

इतके बोलून त्यांनी शिवाजीमहाराजांच्या मस्तकावर हात ठेवला, आणि पाहता पाहता जसे आले तसे गेले. त्यानंतर शिवाजीमहाराज व जिजाबाईसाहेब यांच्यामध्ये काही बोलणे झाल्यावर महाराज तेथून राजगडाकडे गेले.

वास्तविक पाहता मोंगल आता लढण्याला फार उत्सुक होते असे नाही. तेही आता जेरीस आले होते. त्यांनी मराठ्यांच्या मुलुखाचा सत्यानाश चालविला होता, यामुळे शिवाजीमहाराज जसे उद्विग्न झाले होते, तसेच मराठ्यांनी नाना प्रकारांनी छळ चालविला व धुमाकूळ उडविला, यामुळे जयसिंग व दिलेरखान दोघेही अगदी उद्विग्न झाले होते. त्यांनाही असे वाटत होते की, आपला शत्रू जर तह करण्यास उद्युक्त होईल, तर फार चांगले होईल. ते केवळ वाटच पाहत होते असेही म्हटले तरी चालेल.

तह केल्याखेरीज गत्यंतरच नाही म्हणून महाराजांनी तहाची गोष्ट कबूल केली हे उघडच आहे. त्यांनी पंतास जयसिंगाकडे पाठविले. पंत व

जयसिंग यांचे बोलणे झाल्यावर, पंतांनी महाराजांस जे सविस्तर पत्र पाठविले, त्याचा महत्त्वाचा भाग पुढे दिला आहे :

*" आपली आज्ञा घेऊन चरणापासोन येथे आलो. रंग पाहता राजे मोठे करारी. त्यांशी तह केलेविणा गती नाही ऐसाच अजमास दिसतो. परंतु काळावर नजर देवोन हातोन काय होय ते पाहावे म्हणोन गोष्ट केली जे : ' आपण हिंदु वेदवेदांग, स्मृति-पुराणधर्मी, सूर्यवंशी, क्षत्रिय, गुरुतल्पगामी, चंद्रोपासक, अविंधाची पताका घेऊन जिकडे तिकडे संहार करता हे कैसे उचित होय ? येणे अधर्म वाढेल की धर्म ? क्षत्रिय कुलाचे आपण दीपक. अधर्म पसरवू पाहणाऱ्या विधर्म्यांची विजयपताका स्कंधावरी घेवोन, मुलुखगिरी चालविता, कुराणाने पुराणाची जागा घेऊन गोवध बंद व्हावा म्हणून भगवी धर्मपताका घेऊन वेदधर्म वाढवू झटणाऱ्यांशी वैर करता हे काय ? ' ऐसे थोडे खोचोन परंतु मर्यादेने बोलिलो, तेव्हा हसले व मजकडे पाहोन म्हणाले, ' ऐशिया बोलण्याने कार्य-भाग होणार नाही. जे दिवशी अविंधास कुर्णीस केला व मनसबदारी पतकरली, ते दिवशी त्याचा सर्व विचार झाला. अविंधाचे अन्नावरी पिंड वाढविला. आता काय राहिले ? ' ऐसा स्पष्ट जबाब ऐकोन थोडे थक्क झालो. मग पुनः विचारले जे, ' आपला मनसोबा ऐसा आहे तरी रायांनी काय करावे ? ' त्यांनी जबाब दिला जे ' रायांनी दरोबस्त सारा मुलूख आमचे स्वाधीन करावा. ' काय किल्ले व मुलूख आम्ही ठेवू ते आपले समजावे. बादशहा अलमगीर याची नौकरी पतकरावी. ऐसे होत नसल्यास आलिया वाटेने परत जावे. जे चालले आहे ते चालवून धाय धाय करावयास लावून गिरफदार करून दिल्लीस घेऊन जाऊ. मुलुखी बंदोबस्ती जारीनें करू. ' ऐसे निकराचे बोलणे ऐकून चमत्कार वाटला जे. पुढे बोलिलो जे, मुलूख उजाड होत चालला तो बचावण्यासाठी तह करण्यास राजे कबूल आहेत. ते ऐकोन ते म्हणाले जे, बहुत कलमे घालून रायासी छळणेचा मनसुबा नाही.*

कलमे सांगितली ती ऐशी :—

१. बादशहाच्या मुलुखातील दरोबस्त किल्ले व त्या किल्ल्याचे घेऱ्यातील सर्व मुलूख ताबडतोब सोडून देणे. ऐसे सत्तावीस किल्ले.

२. सुमारे बारा किल्ले त्या मुलुखासकट रायांनी 'बादशहाची जहागीर म्हणून उपभोगास ठेवणे; परंतु कागदोपत्री बादशहातीचा शिक्का पाहिजे. ऐसा मुलूख दहा लक्षांचा सोडू.

३. संभाजी राजे यांचे नांवे पाच हजाराची मनसबदारी असेल.

४. विजापुरकरांचे मुलुखातील चौथाई, सरदेशमुखी आजतागाईत जैसी घेतली तशी घ्यावी व त्याबद्दल एक कोटी चाळीस लक्ष नजराणा हप्तियाहप्तियानी बादशहासी द्यावा.

ही कलमें ऐकिली तेव्हा वाटले जे, केवळ छळणूक करून बादशहाचा बडिवार वाढविणेचा मनसुबा नाही. काही तरी भूतदया दिसत आहे.

उपरी सर्व बोलणे लिहितो व जैसे उत्तर येई तैसे कळवितो. ऐसे बोलोन डेरियावरी गेलो व जासुदाहाती हे पत्र चरणसंनिध पाठवित आहे."

* * *

# १७. दिलेरखान

दिलेरखान आपल्या डेऱ्यात बसला असताना किरातसिंग येऊन त्यास कुर्निसात करून म्हणतो, " खाविंद, जसा आपण तर्क केला होता, तसा अगदी बरोबर कारभार झाला. पंतांची भेट राजांनी घेतली. तह करण्याचे ठरून तहाची कलमे ठरली. परंतु आपली कन्या या चोर मराठ्यांनी नेली, त्याबद्दल उल्लेख नाही. फक्त आपल्याला सांगितल्यावर कायम समजावे असे उद्गार काढले."

" तह जरी त्यांनी केला, तरी त्याला माझी अनुमती घेतल्याखेरीज त्यांना तिकडे ( बादशहाकडे ) कागद पाठविता येणार नाहीत. वास्तविक दरोडेखोरांशी तह कसला ? तो काय राजा आहे ? त्याला गिरफदार करून दिल्लीत नेऊन अटकावून टाकला पाहिजे. आणखी इकडे सगळ्या मुलुखाला कोणी सुभेदार नेमून ठेवला पाहिजे."

" बस. बस. बस. खानसाहेब, आपले बोलणे अक्षरशः खरे आहे. चार दिवस दरवडेखोरी करून मुलूख आपल्या ताब्यात आणला म्हणजे काय राजा बनतो कोणी ? काही कारणाने आपल्याकडे आमचा ओढा जास्त आहे. राजे आमचे खरे, पण ते आम्हाला पाण्यात पाहतात. आपले दर्जास कोणी चढू नये अशी त्यांचे मनाची बुद्धी. आपला स्वभाव तसा नाही. आपल्यापुढे कोणीही गुण दाखविले, तर आपण त्याच्या गुणांचे चीज करता."

काही वेळाने दिलेरखान म्हणतो, " बरं, काय म्हणतोस ? माझ्या मुलीसंबंधानं काहीसुद्धा राजांनी चौकशी केली नाही ? माझी समजूत अशी होती की या दरवडेखोरांनी तिला पुरंदरावर ठेवली; परंतु पुरंदर आमच्या हाती देऊन ते चालते झाले, तेव्हा कोपरान् कोपरा शोधून काढला, पण तिचा पत्ता नाही. राजाकडून त्या किल्ल्यावरील लोकांना विचारलं तर त्याचं उत्तर ती मंडळी असं देतात की, मराठ्यांचे हात परस्त्रीच्या स्पर्शाने कधीही विटाळायचे नाहीत. राखेचे तोडरे देऊन त्याची पूसतपास केली पाहिजे असं सुचविलं तर तशी मुळीच जरूर नाही असा जबाब मिळाला.

तेव्हापासून माझ्या मनाला शंका वाटते आहे, पण ते वडील, त्यांच्यापुढे काही बोलता येत नाही......"

"मी तरी तेच सांगतो आहे की आपल्याला त्यांच्यापुढे बोलता येणार नाही. ते वाटेल तसा तह करून टाकतील. बेगमसाहेबांना नाहीसं करण्यात जर मराठ्यांचं अंग नाही, तर आहे कोणाचं? बेगमसाहेबांना आपल्यापैकी कोणी नेणे शक्य नाही आणि आपण होऊन त्या कोठे जातील हे शक्य नाही. पण खानसाहेब, मला फक्त एक शंका आहे. पुरावा माझ्याजवळ काही नाही. मग ती बोलून दाखविण्यात काय तात्पर्य?"

"का? का? शंका मला कळलीच पाहिजे. ती कळल्याखेरीज मी तरी काय करणार?"

"शहाजाद्याचे कधी लक्ष......कधी दिल्लीत किंवा आग्रा येथे असताना."

"काय म्हणतोस? माझी पोरगी शहाजाद्याकडे गेली असेल?"

"होय. हीच माझी शंका. मराठे आणि शहाजादा यांचा मिलाफ आहे हेच मला शंका यायला कारण. शहाजाद्याला या मराठ्यांनी फितूर केला, तेव्हा त्याला खूष करण्यासाठी त्याला हवी असलेली नजर पाठविण्याचा प्रसंग साधला तर त्यात काय नवल?"

किरातसिंगाचे हे बोलणे ऐकून दिलेरखानाच्या अंगाचा संताप झाला. तो किती वेळ तरी स्तब्धच बसला. काही वेळाने झोपेतून जागा झाल्याप्रमाणे दचकून भानावर आल्यासारखे होऊन म्हणतो, "किरातसिंग तहाविहाची गोष्ट असू दे. पण नूर एल हुदाला शहाजाद्याच्या जनान्यात मराठ्यांनी नेऊन घातली याबद्दल तुला काय माहिती असेल, ती मला सांगशील तर ठीक होईल."

"पुरावा तर माझ्याजवळ काही नाही. पण माझा तर्क मात्र आहे. पण ते नाव कसं घ्यायचं? पण आता सांगतोच. सरकार, शहाजाद्याकडे बेगम जाण्याला मराठे केवळ कारण झाले, पण जयसिंगराजांच्या फुशीशिवाय हे झाले नाही. जसा आलमगीर आपल्यावर लोभ करतात, तसाच लोभ पुढल्याही पिढीचा हवाना? तेवढ्याकरता पाहिजे ते करावं."

दिलेरखान थक्क झाला.

जसा एखादा विषारी सर्प एखाद्याला दंश करून आपल्या दंशाचा काय परिणाम झाला हे जाणण्याकरता आपण घेतलेल्या बळीकडे सूक्ष्म दृष्टीने पाहतो व आपल्याला पाहिजे तसा परिणाम झाला नसावा, आपले अर्धवट काम टाकू नये, आपल्या शत्रूस पुरा चीत करून टाकावा, तरच आपले संरक्षण होणार असे मनात आणून पुनः दंशावर दंश करतो, तीच अवस्था किरातसिंगाने चालविली होती. एक एक गोष्ट मोठ्या शिताफीने, मुत्सद्दीपणाने व अचूकपणाने काढून तिचा परिणाम झाला म्हणजे मग दुसरी काढावयाची असा त्याचा क्रम चाललेला होता. दिलेरखानाचे मन जयसिंगाविरुद्ध व शिवाजीविरुद्ध जितके दूषित होईल तितके केले असता आपला डाव साधेल अशी त्याची समजूत. जयसिंगाची जागा आपणास मिळण्यास जयसिंगास खाली ओढण्याखेरीज दुसरा मार्गच नाही असे त्याच्या मनाने घेतले होते. शहाजादा मुआझिमचे लक्ष आपल्या पोरीवर आहे हे दिलेरखानास पूर्वीपासून माहीत. त्यामुळे त्याला किरातसिंगाचे सर्व बोलणे खरे वाटले तर त्यात नवल नाही.

आपण दिलेला शेवटचा घुटका चांगला पचला असे पाहताच किरातसिंगाने त्याला आणखी एक घुटका दिला. तो म्हणतो, " सरकार, जे दोन हेर पकडून ठेवलेले आहेत, त्यांच्याचकडून बेगमसाहेबांची रवानगी केली असावी. कारण, मला ज्याने अर्धवट बातमी सांगितली, तो म्हणाला की, शहाजाद्याकडे गोषातली स्त्री पोचती केली, तिच्याबरोबर दोन मराठे सरदार होते आणि रक्षणार्थ पाचपन्नास रजपूत शिपाई होते."

किरातसिंगाचा हा शेवटचा फटकारा रामबाणच होता. दिलेरखानाचे डोळे वटारल्यासारखे दिसू लागले आणि तो दातओठ खाऊ लागला. काही वेळाने त्यास दिलेरखान म्हणाला, " याचा सूड मी केव्हा तरी खचित उगवीन. तू जा आता. माझ्या अंगाचा भडका झाला आहे. किरातसिंग, मी मागे तुला सांगितलेच की, केवळ माझी मानहानी होते, मला जयसिंग विचारीत नाही, आणखी त्यामुळे तुला फार वाईट वाटून तू मला नाना प्रकारच्या बातम्या सांगतोस हे काही मला खरं वाटत नाही. या तुझ्या करण्यात दुसरा काही तरी हेतू खचित आहे! इतका वेळ मी आपले

मुकाट्याने ऐकून घेतले. माझ्या पोरीबद्दल तुझे तर्क नकोत. खरोखर तिला तेथे पोचवले आहे की काय ते सांग."

दिलेरखानाचे आपल्यावरील विश्वास नसल्याचे बोलणे ऐकून किरातसिंगास वाईट वाटले आणि रागही आला. आपली बातमी खरी असल्याची खातरजमा त्याने दिली. नूर एल हुदा हिला शहाजाद्याच्या जनान्यात पोचविण्याची जी योजना आपण केली, ती पूर्णपणे अंमलात आली असे खात्रीपूर्वक वाटल्याने किरातसिंगाने वर सांगितलेला सर्व व्यूह रचला होता. दोन मराठ्यास दोन मराठे, रजपूत लोकांस रजपूत लोक, आणखी काय पाहिजे? आपली योजना पार पडलेली नाही, हे त्याच्या स्वप्नीही नव्हते. मात्र त्यात जे त्याचे स्वतःचे अंग होते, ते त्याने जयसिंगावर ढकलून दिले.

* * *

## १८. मधले काही प्रसंग

किरातसिंग निघून गेला तरी दिलेरखान कितीवेळ तरी अगदी स्तब्ध व विचारमग्न असा एकांतात बसला होता. आपण जे काय ऐकले, ते सर्व स्वप्नात ऐकले की जागेपणी ऐकले याचाच त्याला बोध होईना. जयसिंगराजे आपल्याशी अशा प्रकारे वागतील ही कल्पनाच त्याच्या मनात अजून कायमची धर धरीना. आपले व राजा जयसिंग यांचे वाकडे यावे या हेतूने किरातसिंगाने आपल्याला काहीतरी सांगितले याचीसुद्धा त्याच्या मनात मोठी वानवा झाली. शेवटी त्याच्या मनाने असा विचार केला की, आपण औरंगाबादेस एखादी दासी व गुलाम पाठवून आपल्या पोरीची माहिती आणवावी. आणि हा विचार त्याने लगेच अंमलातही आणला. आपल्या मुलीबद्दलची शहाजाद्याची आसक्ती असल्याचे त्याला माहीत होते. परंतु

बादशहाच्या ज्या मुलाला तक्त मिळण्याचा संभव, त्याला आपली मुलगी द्यावी हा त्याचा अंतस्थ हेतू. यामुळे औरंगजेबाच्या दुसऱ्या मुलाचे आपल्या मुलीवर लक्ष आहे हे ऐकून जरी त्यास समाधान वाटले, तरी ज्या प्रकाराने त्याने तिला आता नेले, त्या प्रकाराचा तर त्यास सर्वथा राग आला हे साहजिक होय. अशा विचारात तो मग्न असता, त्याला बसल्या जागीच झोप लागली.

दुसरे दिवशी सूर्य किती तरी वर आल्यावर खान जागा झाला. तो आपले नित्यविधी आटोपून बसला असता, जयसिंगाच्या हरकाऱ्याने पुढील आशयाचा मजकूर असलेला लखोटा त्याचेपुढे टाकला : " आपल्या पराक्रमाने घाबरून जाऊन शिवाजी तह करण्याच्या गोष्टी सांगू लागला आहे. सगळे किल्ले व मुलुख आमचे ताब्यात दिल्याखेरीज तहाची नुसती बोलणी-सुद्धा बोलण्यास तयार नाही असे मी त्याला उत्तर दिले आहे. मी जितके शक्य तितके ओढून धरतोच आहे; परंतु आपल्या बेतात व्यत्यय आलासा वाटला म्हणजे आपण सैल सोडावे आणि तह करण्यास कबूल व्हावे असे मला वाटते. पण आपल्या संमतीवाचून काहीही कर्तव्य नाही म्हणून हे आपणास कळवित आहे. आपण दोघे मिळून बादशहास आश्वासन देऊन आलो, की शिवाजीला आपला बंदा बनविल्याखेरीज राहत नाही. त्याप्रमाणे काही तरी होईल असे म्हणण्यास हरकत नाही. "

हे पत्र वाचताच दिलेरखानाने ते ताडकन दूर फेकून दिले. जय-सिंगानेच स्वतः काय ते ठरवून उगाच सर्व गोष्टीवर सारवण घालण्यासाठी हे पत्र पाठविले आहे असे त्यास वाटले. हिंदु हिंदु एक होऊन बादशहाला फसवायला पाहत आहेत; शिवाजीला गिरफदार करून बादशहाचा बंदा गुलाम म्हणून त्याच्यापुढे मुजरा करण्यास नेले पाहिजे तरच खरे; नुसता तह करून सगळे किल्ले आणखी सगळा मुलूख घेतला एवढे ढोंग करून पुनः भराभर तो आपल्या ताब्यात घेण्यासाठी त्याला मोकळा सोडून आपण आग्र्याची वाट धरण्यात काही अर्थ नाही असे त्याच्या मनास पक्के वाटले. आणि त्याने तूर्त काही न करण्याचे ठरविले.

रघुनाथपंतांनी महाराजास सर्व सविस्तर हकिकत कळविल्यानंतर, महाराजांनाही आपल्या काही अटी कळविल्या आणि राजा जयसिंगाने नाही होय म्हणत म्हणत पण त्या मान्य केल्या. राजा जयसिंगाने दिलेरखानास

असे कळविले की आपल्या भेटीस येऊन शिवाजी तह करण्याविषयी विनंती करणार आहे. तेव्हा त्यास घेऊन केव्हा येऊ ते कळविण्याबद्दल त्यांनी दिलेरखानास विचारल्यावर त्यास वाटले की, राजा जयसिंग आपल्याला अगदीच बाजूला ठेवून कामे करतो असे नाही. त्याने जयसिंगास निरोप पाठविला की, तह करावयाचा तो बादशहास सर्व अटी कळवून करावा; त्याच्या अनुमतीवाचून काही करू नये. राजा जयसिंगास अर्थातच या म्हणण्यास ना म्हणता येणे शक्यच नव्हते. परंतु त्याने एवढेच सुचविले की, शिवाजीस बोलावून आपण सर्व अटी ठरवू. त्या अटी ठरल्या म्हणजे चालू लढाई बंद करून विजापूरचा नायनाट करण्याचे जे दुसरे काम ते करावयास मोकळीक झाली. विजापूर जिंकून घेण्याच्या कामी आपण शिवाजीची मदत मागू; ती त्याने मनःपूर्वक दिली नाही तर तह मोडला असे धरू. बादशहाच्याकडून तहाच्या अटीस पसंती आली म्हणजेच तो खरा तह झाला, तोपर्यंत संधी झाला; व यामुळे लढाई मात्र तहकूब ठेवण्यात आली असे धरावयाचे.

☆ ☆ ☆

आपण इतक्या तऱ्हेने कबूल आहो असे राजा जयसिंगाला कळविले असताही तो फार ओढून धरतो आहे, धाकदपटशा करतो आहे हे पाहून शिवाजीमहाराजांस फार वाईट वाटले आणि ते विचार करीत राहिले. विचार करता करता त्यांनी असे ठरविले की, जयसिंगाने फारच ओढून धरले, तर आपण विजापुरकरांशी एकचित्त करण्याच्या उद्योगास लागावे. दोघांनी एकदिलाने दोन्हीकडून त्रास देण्यास सुरुवात केली, तर बादशाही सैन्य काय करणार आहे ? विजापूरकरांनाही आज मदतीची जरूर आहे. आपल्यालाही तशी जरूर आहे. दोघांना चेपून टाकण्याचा मोंगलांचा हा कावा जर मोडावयाचा असेल, तर तो दोघांचे संगनमत झाल्याने होईल — निदान असे संगनमत होण्यासाठी खटपट सुरू झाल्याचे—राजांच्या व दिलेरखानाच्या कानी गेल्यानेच तो आपल्याशी तह घडवून आणण्यास सिद्ध होईल, असे महाराजांचे अनुमान झाले. लागलीच त्यांनी तसा उपक्रम करण्याची योजना केली, आणि तशी योजना होत आहे ही बातमी राजे जयसिंग व दिलेरखानाच्या कानी जाण्याच्या तजविजीस ते लागले, तों एक अगदीच आगांतुक साधन त्यांच्या मार्गात आले.

ते आपल्या विश्वस्त मंडळींशी कांही बोलत असताना, राजे जयसिंगाचा किरातसिंग नावाचा मुलगा त्यांच्या भेटीस आला असल्याची त्यांना वर्दी देण्यात आली; त्याबरोबर त्यांना फार आश्चर्य वाटले. महाराजांनी त्याचे यथोचित स्वागत केल्यावर त्याच्या आगमनाचे कारण विचारले. तेव्हा तो म्हणतो : "आपल्या पंतांचे व माझ्या वडिलांचे झालेले भाषण मला समजले. अहो, ही म्हातारी माणसे बादशहाच्या हुकूमाबाहेर एक रेसभर जायची नाहीत. आम्हाला बादशहाचा तिटकारा, पण त्यांना त्याच्याबद्दल देवासारखी पूज्यबुद्धी. आमच्या वडिलांचे असे काही वजन आहे की, ते जर उलटले, तर सगळ्या मोंगल बादशहातीचे तुकडे तुकडे होतील. सगळ्या हिंदुस्थानभर हिंदुपदपादशाही होईल."

"अरे बाबा, म्हाताऱ्या माणसांच्या नावे विवळत बसून काय उपयोग? तुमच्यासारख्यांनी मनात आणले, तर सैन्य तुमच्या ताब्यात राहील की म्हाताऱ्यांच्या ताब्यात राहील! बरं, ते असो. आपण आपल्या वडिलांच्याकडून काही निरोप आणला आहे काय?"

"छे. छे. छे. त्यांचा निरोप काही नाही. आपल्या हेरांना चकविण्यासाठी वडिलांच्याकडून आलो असा निरोप पाठविला. आपले दर्शन व्हावे, आपल्या तोंडून दोन उपदेशाच्या गोष्टी ऐकाव्या म्हणून खरा आलो आहे."

"किरातसिंग, आपण हे सगळे बोलता ते ठीक आहे. पण खरे पुसाल तर आपल्या येण्याचा खरा हेतू काय हे अद्यापि मला समजले नाही. असो. आम्ही आता निश्चय केला आहे, की आपले वडील जर ऐकत नसतील तर विजापुरकरांशी सख्य करायचे आणि त्यांच्या व आमच्या एकत्र सैन्याने आपल्याशी टक्कर द्यायची."

"काय म्हणता? आपण विजापुरकरांशी एकी करून तुम्ही बादशाही सैन्याशी लढणार? तो तरी मुसलमानच ना?" किरातसिंगाने आश्चर्यचकित झाल्याप्रमाणे होऊन विचारले.

"हो. मुसलमान खरा. आम्ही आजपर्यंत त्याच्याशी वैर केले हेही खरे. परंतु आपला अजिबात नाश करणारा एका बाजूला, आणखी आपल्याला जगू देणारा दुसऱ्या बाजूला अशी स्थिती झाली तर, जो

आपल्याला जगू देईल त्याच्याशी संगनमत करावे दुसरे काय ? तुम्ही आम्हाला जगू देत असला तर तशा तहाच्या अटी आल्या पाहिजेत. आम्ही विजापुरकरांशी एकी करून दोघेही एकदिलाने तुमच्याशी लढू. नाही तरी, तुम्ही दोघांवर तिलांजली देऊन उठलाच आहा. मग धडपड करून तरी पाहावे. आम्ही माणसे पाठविली असून आमची एकी बहुतकरून होईल. आपल्या वडिलांना आमच्या पंतांनी पुष्कळ सांगितले की, आम्हाला यश म्हणजे आपल्या धर्माला यश. आम्हाला पारिपत्य केल्याचे उगीच थातुर-मातुर करून चालते व्हावे. पण त्यांचा कल तसा दिसत नाही. मग आम्ही आपल्या इच्छेप्रमाणे करतो. यात आपल्याला वावगं काय वाटते ? ”

“ वावगं, वावगं काही वाटत नाही. ” किरातसिंग बावरल्यासारखा होऊन म्हणतो. “ बरं, मी ज्या हेतूने आलो, तो माझा हेतू सफल झाला. आपले दर्शन झाले, आपल्याशी भाषण करायला मिळाले, तेव्हा आता मी येतो. ”

तो निघून गेल्यावर एक मराठा सरदार महाराजांच्या जवळ येऊन म्हणतो, “ महाराज, हा जयसिंगराजांचा मुलगा किरातसिंग नव्हे ... ”

हे ऐकून महाराज चकित झाले. परंतु लागलीच म्हणतात, “ ते काही असले, तरी हरकत नाही. आपण विजापुरकरांशी संगनमत करणार, एवढे जयसिंगाच्या कानी गेले, की अर्धा कार्यभाग, नव्हे पंधरा आणे कार्यभाग झाला. ”

महाराजांच्या म्हणण्याप्रमाणे खरोखरीच पुढे तशी स्थिती झाली. किरातसिंगाने, जयसिंगाच्या किरातसिंग नावाच्या मुलाचे नाव घेऊन, महाराजांपर्यंत मजल मारली. त्याचा हेतू फार निराळा होता. दिलेरखानाच्या मुलीची जी व्यवस्था करण्याचा आपण खटाटोप केला, त्याबद्दलची चौकशी मराठ्यांच्या छावणीत जाऊन करावी आणि तहाविषयीची धडपड कोठवर आली आहे याची बातमी मिळवावी. त्याच्या उद्देशापैकी एकाबद्दलही त्याला समाधानकारक वर्तमान मिळाले नाही. जे मिळाले ते विजापुराकडे महाराज बोलणे लावीत आहेत, हे होय. दिलेरखानाचे कान फुंकण्यास आपल्याला हे साधन झाले असे वाटून तो तडक दिलेरखानाकडे गेला व त्याने त्यास वरील बातमी तिखटमीठ लावून सांगितली. पण या माहितीचा जो

परिणाम व्हावा असे किरातसिंगास वाटत होते तसा मात्र झाला नाही. उलट 'तुझ्या मनात आम्हा दोघात वैमनस्य यावं असं आहे. पण त्यात तुझी निराशा होईल. तुझ्या सांगण्यानं माझे मन जयसिंगराजाबद्दल कलुषित होणे शक्य नाही.' असे दिलेरखानाने सांगितल्यामुळे किरातसिंगास चुंबित होऊन परत फिरावे लागले.

परंतु किरातसिंगास स्वस्थ कोठे बसवते? तो जयसिंगराजाच्याकडे गेला आणि त्याने शिवाजीमहाराज विजापुरकरांशी संगनमत करून आपल्याशी लढण्याचा त्यांचा विचार असल्याचे सांगितले. त्याने ही बातमी आणल्या-बद्दल जयसिंगराजांनी त्याचे कौतुक केले नाही. उलट जयसिंगराजा त्यास म्हणाला, "ज्यांच्या शिरावर या मोहिमेचा भार आहे, त्यांना आपले काम करता येत नाही असे धरून चालण्यात शहाणपण काय?" राजा जयसिंगाने अशा प्रकारे बोलून त्यास झिडकारल्याचा त्याला फार राग आला. आणि तो आपल्या मकाणी संतप्त स्थितीतच परतला.

राजा जयसिंगाने किरातसिंगास धिक्कारपूर्वक घालवून दिले खरे, परंतु त्याच्या अंतःकरणात खरोखरीच नवीन उजेड पडल्यासारखे झाले. शिवाजीने विजापुराकडे खरोखरीच जर काही संधान बांधले, तर आपल्याला एकंदरीत जड जाईल. न जाणो हा शिवाजीचा खरोखरीच शह देण्याचा विचार असेल, तर आपण त्याला काटशह दिला पाहिजे. असा विचार करून त्याने रघुनाथपंतास बोलावून आणून त्यांस म्हटले :—

"आमच्याकडे तहाची बोलणी करता आणि त्याचा निकाल होतो न होतो तों विजापुरकराकडेही बोलणीं लावता; पण याचा परिणाम चांगला होणार नाही. आम्हालाही तसे करता येणार नाही काय? औरंगजेबासारखा बादशहा आपल्याशी तह करतो असे पाहण्याबरोबर विजापुरचा बादशहा तुम्हाला धरून बसेल की आमच्याकडे वळेल याचा विचार करा. आम्ही दोघे एक झालो की आपल्याला एक तसुभर जागा तरी उभे राहण्याला सापडेल काय? तेव्हा पुरा विचार करून काय ते करा. मी हिंदु, तुम्ही हिंदु. तुमचे वाईट होऊ नये, माझी नामुष्की होऊ नये, म्हणून तुमच्याशी आधी तह करण्याचे कबूल केले. आजमितीला तुम्हाला माझ्या अटी विलक्षण वाटताहेत, परंतु त्या तशा नाहीत. आपल्याला पाच हजारांची

मनसबदारी जर मिळवून दिली, तरच मी खरा. मला बादशहाला असे लिहून पाठवायला सापडले पाहिजे की, शिवाजी आपला नौकर म्हणून राहावयास तयार आहे. विजापुरकरांना आणखी तुम्हाला--दोघांनाही पालथे घालण्यासाठी आम्ही आलो आहो. विजापुरकरांशी सख्य करून तुम्हाला उडवायचे किंवा तुमच्याशी सख्य करून विजापुरकरांना उडवायचे-आम्हाला दोनही शक्य. तेव्हा काय तो विचार करा, आणखी मला एक दिवसाच्या आत काय ते सांगा. तहाच्या अटी मी सांगितल्याच आहेत."

राजा जयसिंग खरोखर कठोरपणाने बोलत होता. आपले सगळे बोलणे व त्यावेळचे आपले स्वरूप ही शिवाजीस अगदी तंतोतंत कळावी असा त्याचा हेतू, हे अगदी उघड होते.

* * *

## १९. तहाचा दिवस

राजा जयसिंगाच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या भाषणाच्या वेळच्या सर्व आविर्भावाचे वर्णन व प्रत्येक शब्द अन् शब्द शिवाजीमहाराजांच्या कानी गेला. महाराजांना तरी तेच पाहिजे होते. फार दिवस भिजत घोंगडे ठेवण्यात आता तात्पर्यार्थ नव्हता. तेव्हा आपण आता ओढून विनाकारण आपल्या राज्याचे व लोकांचे हाल कशाला करून घ्यावे ? ज्या काय अटी घालतील, त्या मान्य करून आपला कार्यभाग करून घ्यावा, या निश्चयापर्यंत आपले मन आणताना, महाराजांना किती वाईट वाटले असेल हे काय सांगावयास पाहिजे ? प्रत्यक्ष पोटचा मुलगा वारल्यानेसुध्दा त्यास इतके वाईट वाटले नसते. होणाऱ्या गोष्टीपुढे इलाज नाही, अशी आपल्या मनाची समजूत करून घेऊन त्यांनी जयसिंगाकडे पुनः निरोप पाठवून आपण आपल्या म्हणण्याप्रमाणे तह करण्यास अगदी खचित तयार असून आपल्या मुलाखतीस केव्हा येऊ ते कळविण्याबद्दल त्यांनी विचारले.

रघुनाथपंताने जयसिंगास महाराजांचा वरील निरोप कळविताच त्यांस फार संतोष झाला. इतका की आपण जन्माला येऊन असले विलक्षण मुत्सद्दी-पणाचे व शौर्याचे कृत्यच कधी केले नव्हते असे त्याच्या मनास वाटत असावे, असे त्याच्या चर्येवरून दिसू लागले. दिलेरखानास जयसिंगाने सर्व हकिकत कळवून मुलाखतीच्या वेळी येण्याबद्दल त्यास विनंती केली; आणि पुढे दिलेरखानाने चौकशी केल्यावर जयसिंगाने त्यास तहाच्या अटी कळविल्या. या अटीत आपल्या मुलीच्या शोधाबद्दल काहीच कलम नसल्याचे पाहून दिलेरखानास राग आला. याच वेळेस आपल्या मुलीची चौकशी करण्यासाठी औरंगाबादला त्याने पाठविलेला गुलाम परत येऊन, त्याने शहाजादा मुआझिमच्या जनानखान्यात नूर एल हुदा नसल्याचे सांगितले.

शहाजाद्याकडे आपल्या पोरीचा धागा लागत नाही असे कळल्या-पासून दिलेरखानाचे भानच नाहीसे झाले. मराठे व राजा जयसिंग यांनी संगनमताने आपल्या पोरीची काही तरी वाट लावली असली पाहिजे; किरातसिंगाने जे सुचविले ते केवळ काल्पनिक असेल असे का मानावे ? असे आता त्याच्या मनात येऊ लागले. शिवाजी आता तहासाठी येतोच आहे. तिथे हे पाहू. मात्र या किरातसिंगाला तेथे नेले पाहिजे, असा विचार करून त्याने त्यास बोलावणे पाठविले. तो आल्यावर शहाजाद्याकडे आपल्या मुलीचा तपास लागत नसल्याचे दिलेरखानाने सांगताच, किरातसिंगाचे काळीज एकदम चरारले. वाटेत काही तरी घात झाला असावा आणि आपले कारस्थान पार फसले असावे हे त्यास उघड दिसले. या बाबतीत त्या दोघांची काही बोलणी होऊन मग तहाकडे बोलणे वळले. व या तहाच्या शर्तीत मोडता घालण्याबद्दल त्यांच्यात खूप वाटाघाट झाली. किरातसिंगास जे काय दिलेरखानाच्या मनात भरवावयाचे होते, ते सर्व त्याने त्याच्या मनात यथासांग भरविले.

इकडे मुलाखतीच्या दिवशी म्हणजे ता. ११ जून १६६५ रोजी महाराज मोठ्या कष्टी मनाने राजा जयसिंगाच्या छावणीकडे गेले. जयसिंग-राजे दृष्टीस पडताच क्षणमात्र त्यांच्या कपाळास आठ्या पडल्या. एक गुलाम दुसऱ्या स्वतंत्र माणसास आपल्यासारखा गुलाम बनवू पाहात आहे ! असे मनात येऊन त्यांस अत्यंत वाईट वाटले. परंतु क्षणार्धात आपले खिन्नत्व

एका बाजूस सारून ते हास्यमुख करून पुढे झाले. त्यांनी दोनही हात पुढे केले, ते जयसिंगाने धरून मोठ्या आदराने त्यांस आपल्या गादीवर बसविले. आणि त्यांस म्हटले : " या खेपेस आपणास यश आले नसते. मनुष्यहानी विनाकारण झाली असती. आणि शेवटी आम्ही सारा मुलूख ताब्यात घेतलाच असता. तेव्हा आपण तहाचा विचार केला, हा फार शहाणपणाचा झाला. आता मुलूख आपल्याच ताब्यात राहील, पण बादशहाचा म्हणून राहील. " आणि नंतर जयसिंगाने दिलेरखानास तहाबद्दलचे निर्णायक बोलणे करण्यास येण्याविषयी सूचना पाठविली.

* * *

## २०. नजराणा

दुसरे दिवसाची सकाळ उजाडताच पुरंदरहून दिलेरखानाचा निरोप आला, की तह करणे आम्हास मान्य नाही. आतापर्यंत आम्ही फार त्रास भोगला. इतका त्रास न देता प्रथमच तहाची गोष्ट निघती, तर मग एक विचार करण्याची गोष्ट होती. परंतु तशी काही गोष्ट झाली नाही. आता आम्ही सगळा प्रांत काबीज करणार. आमच्या काळजाला जे दुःख झाले आहे, ते एक आम्हाला माहीत की परमेश्वराला माहीत. असा जबर घाव ज्याने आमच्या काळजावर घातला, त्याच्याशी आमचा तह व्हावा कसा ? आपण वाटल्यास करा.

दिलेरखानाच्या दुःखाची जयसिंगास कल्पना होती. दिलेरखानाच्या मुलीवर शहाजाद्याचा डोळा होता, त्याने काही खलबते करून ती मुलगी आपखुशीने गेली असावी अगर शहाजाद्याने नेली असावी असे जयसिंगास वाटत होते. जो शहाजादा आपल्यास जावई पाहिजे तो मिळाला नाही म्हणून काय झाले ? तो शहाजादा तर आहे, हे समाधान शेवटी दिलेरखानास होईल असे जयसिंगास वाटत होते. परंतु वर सांगितल्याप्रमाणे निरोप

आल्याने तहाच्या कामात मोठीच अडचण झाली. काय करावे आणि न करावे असे त्यास झाले. शेवटी त्याने शिवाजीमहाराजास भेटून काही खलबत केले. या खलबताच्या शेवटी दोघांचेही चेहरे फार प्रफुल्लित झालेले दिसले. हे खलबत झाल्यावर राजा जयसिंगाने दिलेरखानास असे पत्र पाठविले की, आपण एकवार येऊन जावे. आपल्या काळजाला जी भयंकर जखम झाली आहे तीत मलम भरून ती साफ बरी करण्याचे काम आमच्या हातून होईल.

असा निरोप दिलेरखानाकडे गेला, व महाराजांनी आपल्यापैकी दोन माणसे आपला काही निरोप देऊन कोणीकडे तरी पाठविली.

वरील निरोपाने दिलेरखानाच्या मनाची चलबिचल झाली. पुढील चार दिवसात जयसिंग व दिलेरखान यांच्यात बरीच निरोपानिरोपी झाली. व याच चार दिवसात जयसिंगाच्या छावणीत एक पडदापोशीतील स्त्री आल्याचे दिसले.

नाही होय करता करता शेवटी दिलेरखान पुरंदराहून जयसिंगाच्या छावणीत आला. राजा जयसिंग व महाराज दोघेही त्यास सामोरे गेले, परंतु महाराजांच्याशी तो धड बोलला नाही. सर्व मंडळी बसल्यानंतर दिलेरखानास जयसिंगाने विनंती केली की, त्यांच्यासाठी शिवाजीमहाराजांनी जो काही नजराणा आणला आहे, तो पलीकडल्या दालनात आहे; तो पाहून यावे. नंतर पुढे बोलणे बोलू.

दिलेरखान ते ऐकून फार गोंधळात पडला. काही विनोद तर नसेल, अशी शंका त्याला आली. जयसिंगराजांनी त्याला दोनचारदा पलीकडील दालनात जाण्यास सुचविले, तरी तो जागचा हलेना. आपल्यासमोर येथे नजराणा हजर करावा असे दिलेरखानाने म्हणताच, राजे जयसिंग म्हणतात: "हा नजराणा चारचौघात आणण्याजोगा नाही. आपण आत जाऊन पाहिल्याबरोबर गार व्हाल. आणखी तो आपल्यासाठी संपादित करण्याला शिवाजीमहाराजांनी किती परिश्रम केले, ते आपण ऐकले तर आपल्याला शिवाजीमहाराजांबद्दल किती तरी आदर वाटेल. आमच्या मोहबतीखातर तरी आपण आत जाच." इतका आग्रह झाल्यावर तो पलीकडील दालनात पडद्याआड गेला, तों त्यास आपल्यापुढे कोण दिसले? जिच्यावर त्याचे

अत्यंत प्रेम, जी त्याचा दुसरा प्राण, जिच्या नाहीसे होण्यामुळे त्याला हृद्रोग लागला होता, ती त्याची नक्षत्रतुल्य कन्या नूर एल हुदा! त्यास पाहताच तिने त्यास 'बाबा' म्हणून एकदम त्याच्यापुढे धावत येऊन त्याच्या गळ्यास मिठी मारली. त्याने तिला पोटाशी धरले, आणि दोघेही किती वेळ तरी अगदी निश्चल अशा संगमरवरी पुतळ्याप्रमाणे स्तब्ध उभी राहिली. काही वेळाने तिला पळवून नेण्याच्या संबंधात मराठ्यांच्यावर दिलेरखानाने आरोप करताच ती म्हणाली, "छे. छे. बाबा, मला आपल्या जनान्यातून नेण्यात मराठ्यांचा काही संबंध नाही. मला नेणाऱ्या चांडाळांचा बेत मध्येच फसून मराठ्यांनी सर्वतोपरी माझे रक्षण केले. ते जर वाटेत भेटतेना, तर माझे हाल काय झाले असते आणखी काय नाही? मराठ्यांचे राजे दुसऱ्यांच्या स्त्रियांना आपल्या मातेप्रमाणे अगर कन्येप्रमाणे मानतात. मला याचा उत्तम अनुभव आहे." नंतर तिने आपल्याला कोठे सोडविले, आपणास किती उत्तम तऱ्हेने वागविले, बोरगावच्या वाड्यातील स्त्रियांनी आपणास कसा धीर दिला वगैरे हकिकत सांगितल्यावर दिलेरखान अगदी चकित झाला. शिवाजीबद्दल आपण केवढा दुर्ग्रह करून बसलो होतो, असे त्याच्या मनात आले. परंतु शिवाजी मोठा धूर्त मुत्सद्दी खरा. त्याने इतके दिवस आपल्या मुलीला सांभाळून ठेवून आज तिला आपल्यापुढे आणून उभी केली.

आपण बाहेरच्या मंडळींस किती वेळ तिष्ठत बसविणार? असे मनात येऊन दिलेरखान आपल्या मुलीचा निरोप घेऊन बाहेर आला आणि महाराजांच्याकडे कृतज्ञतेने पाहून म्हणतो: "शिवाजीराजे, मी आपला फार आभारी आहे. तुमच्या या कृत्याबद्दल उतराई होण्याला उपाय एकच. जयसिंगराजांनी तहाच्या अटी ज्या घातल्या आहेत त्याला माझी पूर्ण संमती आहे. एखादी अट आपल्याला अडचणीची वाटत असली तर तसे सांगा. ती अट काढून टाकू. आम्हास यश आले; तुमचे काही फार नुकसान होणार नाही, अशा जशा वाटतील तशा अटी घालून या प्रकरणाचा निकाल लावू. आपण मला आपल्या उपकाराखाली नुसते दडपून टाकले आहे. माझी आता कोणत्याही प्रकारची हरकत नाही. काय बोलणी व्हायची ती चालू द्या."

दिलेरखानाचे बोलणे इतके बदललेले पाहून सर्व मंडळी अगदी चकित झाली. जयसिंगास हे पाहून फार फार समाधान झाले. दिलेरखानास शिवाजीमहाराजांनी जसा नजराणा दिला, तसाच नजराणा--कोंगाडी व जोशी यांना महाराजांच्या स्वाधीन करून जयसिंगाने दिला. महाराजांना केवढे तरी नजराणे जयसिंगाने दिले !

याप्रमाणे परस्परांचे नजर-नजराणे झाल्यानंतर पुढे तहाची बोलणी पुन: सुरू झाली. महाराजांनी सर्व अटी कबूल केल्या. जे जे किल्ले व प्रांत तहातील कलमाप्रमाणे ठरले, ते त्यांनी जयसिंगाच्या ताब्यात दिले व बादशाही अंमलाखाली मनसबदारी पतकरण्याचेही त्यांनी कबूल केले. मात्र ती मनसबदारी पाच हजारांची आणि आपला मुलगा संभाजी यांचे नावे पतकरली. आपल्या नावास बादशहाच्या नौकरीचा कलंक लागू द्यावयाचा नाही हा त्यांचा विचार कायम.

* * *

## २१. तह झाल्यानंतर

आपल्या दक्षिणेत येण्याचे पूर्णपणे सार्थक झाले असे जयसिंगराजास वाटण्याजोगी व्यवस्था झाल्यावर त्याला दीड बोट स्वर्ग उरून तो आनंदाने विमूढ झाला तर त्यात आश्चर्य नाही. त्याने शिवाजीमहाराजांचे, तह केल्याबद्दल अभिनंदन करून, तहाची कलमे आणि सर्व हकिकत बादशहास तत्काळ कळवित असल्याचे सांगितले. एवढे झाल्यावर महाराजांनी तेथून निघण्याबाबत जयसिंगराजांची अनुज्ञा घेतली आणि लगेच जयसिंगाने दिलेला नजराणा घेऊन ते तेथून राजगडला आले. महाराज गेल्यावर दिलेरखान पुरंदरला गेला आणि त्याने आपल्या मुलीवर दुर्धर प्रसंग आणणाऱ्या मनुष्याचा बारकाईने तपास सुरू केला.

शिवाजीमहाराजांच्याकडील सर्व किल्ले आपल्या ताब्यात आल्याची वर्दी येताच, राजे जयसिंगाचा पुढला हेतू — विजापुरकरांना नाहीसे करून टाकण्याचा – सफल करण्याकडे त्याचे लक्ष लागले. त्या कामात शिवाजीमहाराजांनी पूर्ण मदत देण्याचे कबूल केले होते. त्यांच्या मनात विजापुरकरांचे राज्य रसातळाला नेण्याचे नव्हते असे नाही. परंतु मोंगल राज्याच्या विस्तारात ते सामील होण्यास आपण मदत करावी की काय, याबद्दल त्यास थोडे चमत्कारिक वाटले. मोंगलाचे राज्य आपण फार दिवस येथे टिकू देणार नाही; अर्थात त्याच्याबरोबर हा विजापुरकरांचा प्रांतही आपण काबीज करू असा विचार एक वेळ त्यांनी मनात केला. तथापि आपण करतो हे बरे नव्हे असे त्यांना राहून राहून वाटेच. परंतु तहाच्या अटीपैकीच ती एक अट असल्यामुळे महाराजांना त्याही बाबतीत आपल्या मनास दाबून धरून विजापुरकरांवर हल्ला करण्यास जावे लागले. शिवाजीमहाराज आपल्या वचनाला जागून त्यांनी आपणास योग्य तऱ्हेने मदत देण्यास प्रारंभ केला आहे हे पाहून जयसिंगाने त्यांच्याबद्दल आणखी एकशिफारसपत्र बादशहाकडे पाठविले. तहाच्या पत्राचा जबाब औरंगजेबाकडून आल्यावर जयसिंगाने महाराजांस बोलावून घेतले. त्याप्रमाणे महाराज आल्यावर बादशहाचे पत्र जयसिंगाने त्यांस वाचावयास दिले. त्या पत्रात सर्व एकंदरीत ठीक होते; परंतु एक अट अशी घातली होती, की तहाची सर्व कलमे शिवाजी येथे ( औरंगजेब होता तेथे ) आल्यास मान्य होतील. त्याप्रमाणे त्याने आपल्या मुलास आपल्याबरोबर आणले तर त्याला मनसबदारीची वस्त्रे दिली जातील. ही अट वाचताच महाराजांना चमत्कारिक वाटले. पहिल्यापासून त्यांना असे वाटतच होते, की औरंगजेब काही सुध्दा मनाने आपणास सोडणार नाही. त्यांच्या मनास असेही वाटे की, आपण एकवार त्या प्रांती गेलो, तर आपल्या मनाप्रमाणे काही गोष्टी करावयाला सापडतील. औरंगजेबाचा दरारा इकडे जसा वाटतो, तसा तिकडे तो आहे काय ? त्याचप्रमाणे त्याला न जुमानणारे काही तरी रजपूत, जाट वगैरे लोक निघतात अगर कसे ? जसा आपण इकडे उपक्रम करतो आहो, तसा तिकडे करण्याची कल्पना कोणाच्या डोक्यात घातली, तर ती मनात शिरेल आणि हातून काही घडेल अशी तरी मंडळी तेथे आहेत काय ? हे

सर्व आपण प्रत्यक्ष तेथे गेल्याखेरीज कळण्याला मार्ग नाही. तेव्हा हा प्रसंग आपण त्या कामाला उपयोगी पडेल असे करावे. असा विचार त्यांनी केला खरा; परंतु आपले राज्य सोडून इतक्या दूर आपल्या शत्रूच्या तोंडात जाऊन पडावे आणि त्यातून निसटतो कसे याबद्दल काळजी करण्याचा प्रसंग आपल्यावर ओढवून घ्यावा हे त्यांस बरे वाटेना. औरंगजेबाच्या मुलाखतीस जाण्यात फार मोठा धोका आहे हे त्यांस फार चांगल्या प्रकारे माहीत होते. औरंगजेब फार कपटी. तो विश्वास दाखवून आपला घात करण्यास कमी करणार नाही. परंतु पत्र तर त्याने असे लिहिले होते, की जणु काय शिवाजीचा आणि आपला सलोखा झाला ही फार समाधानाची गोष्ट झाली असून त्यांस आपण केव्हा आपल्या दरबारात बोलावून त्याचा मान करू असे त्यास झाले असावे.

महाराजांनी पत्र वाचल्यावर राजा जयसिंगास विचारले, " बादशहाने आम्हास आपले दरबारी बोलावण्याचा हेतू काय ? आम्ही तेथे गेलो आणि कपटाने त्याने आमच्या जिवास धोका केला तर काय समजावे ? " राजा जयसिंगासही महाराजांच्या बोलण्यात काही तथ्य वाटले; तथापि थोडा वेळ विचार करून त्यांनी म्हटले, " तसा संशय आपल्या मनात आला यात नवल नाही. परंतु तो संशय आपल्या मनात आणू नका आणि जाण्याचा निश्चय करा. आपल्या केसालाही तिकडे धक्का लागणार नाही याबद्दल मी आपली खातरजमा करून देतो माझा मुलगा रामसिंग आपल्या संबंधात फार जागरूक राहील. आपण गेलात तर आपले हितच होणार. घात होण्याची पाळी आली तर रामसिंग आपल्याला अगदी सुरक्षितपणे इकडे येण्याची तजवीज करील. त्याबद्दल मी तुम्हाला खात्री देतो. "

शिवाजीमहाराज जात्या अत्यंत निश्चयी. त्यांच्यावर बालपणापासून अनेक दुर्धर प्रसंग आले, परंतु एकदा विचारपूर्वक केलेला निश्चय त्यांनी कधी ढळू दिला नाही. परंतु आजचा हा प्रसंग इतका विलक्षण होता की त्यांचे मन फार चंचल झाले. काय करावे याबद्दल त्यांचा निश्चय होईना, आणि जयसिंगास काही नक्की उत्तर न देता महाराज राजगडास परतले. त्यांच्या येण्याची सर्वजण चातकाप्रमाणे मार्गप्रतीक्षा'च करीत होते. त्यांच्या चेहऱ्यावरून सर्वांस असे स्पष्टपणे दिसून आले की, काहीतरी चिंता करण्याजोगा

प्रकार आहे. कोणत्याही एकांत व विश्वस्त विचाराच्या प्रसंगी जी मंडळी असावयाची, ती एकत्र आल्यावर महाराजांनी औरंगजेबाच्या पत्रातील मजकूर सर्वांस सांगितला, व शेवटी म्हटले : "धर्मराज द्युत खेळायला बसल्यावर त्याची जशी स्थिती झाली, तशी आज माझी झाली आहे. त्याने आपले सर्वस्व पणाला लावून गमावले आणि शेवटी वनवास पतकरला, याबद्दल लोक त्याला दोष देतात, पण मी त्याला दोष देत नाही. त्याच्यावर प्रसंगच असा होता की, आपले सर्वस्व गमावून हरिहरि म्हणत बसावे, किंवा हक्काने जितके आपले तितके सर्व दुष्टापासून परत घ्यावे. त्याने जर आपले सर्वस्व पणाला लावून गमावले नसते, तर तो आपल्या वाट्यापुरते तुकडे घेऊन स्वस्थ बसता. परंतु ते न्याय्य नव्हते. एवढ्याकरिता परमेश्वराने त्याच्या मनात अशीच प्रेरणा केली, की त्याने आपले सर्वस्व पणाला लावावे. नेमानेमच असा की ते त्याने गमवावे, वनवास भोगावा आणखी मग आपल्या प्रतापाने सर्व काही परत घ्यावे. आमचाही नेमानेम असाच दिसतो. आम्ही आता पणाला लावल्याप्रमाणे गमावून बसलो आहो; त्यांच्याप्रमाणे आम्हाला आता वनवास भोगावा लागणार आहे, आणि शेवटी आम्ही आपले म्हणून जेवढे हक्काचे तेवढे सगळे सव्याज घेणार. माझी अशी अगदी पूर्ण श्रद्धा आहे."

वरीलप्रमाणे महाराजांचे बोलणे झाल्यावर मोरोपंत पेशवे यांनी औरंगजेबाच्या मनात काही दुष्ट हेतू असण्याची शंका प्रदर्शित करून महाराजांना न जाण्याचा सल्ला दिला. त्यांच्या बोलण्यानंतर महाराज बराच वेळ स्तब्ध बसले आणि नंतर हसून म्हणतात, "आपण म्हणता ही गोष्ट अगदी खरी. परंतु आता इलाज नाही. आता परदेशवास – वनवास – अज्ञातवास काय वाटेल ते त्याला नाव द्या — आपल्याला करावा लागेल असे आई जगदंबेने दृष्टांत देऊन सांगितले. समर्थ गुरुमहाराजांनी तीर्थयात्रेला निघण्यापूर्वी येथे येऊन आपणास तेच सांगितले. त्याप्रमाणे सगळ्या गोष्टी घडून येताहेत. आता आपण या गोष्टीच्या उलट वागणूक करून काही निभायचे नाही. तोंड दिले पाहिजे. शंभूलाही आता नेत नाही म्हणणे काही ठीक होणार नाही. तेवढ्या आपल्या नकारानेच एखादे काम बिघडायचे आणि आहे त्याचेही तळपट करण्याला आयतीच त्यांना सबब मिळायची!"

इतके बोलून महाराज काही वेळ थांबले. नंतर पुनः म्हणतात, "जे ठरले, ते ठरले. शंभूला मी घेऊन जातो. काही वेडावाकडा प्रसंग होऊन आम्ही दोघेही परत येत नाही असे ठरले की, राजारामाच्या नावे द्वाही फिरवून तुमच्या अंगात काय मर्दुमकी असेल ती दाखवा. तुम्हा सर्वांवर मी हा सगळा भार टाकून जातो आहे. मातुःश्री आईसाहेब यांना विचारून प्रत्येक गोष्ट करणे. त्यांचा शब्द म्हणजे आज्ञा. जगदंबेच्या, समर्थांच्या आणखी आईसाहेबांच्या आशीर्वादाने कोणतेही वावगे होणार नाही. होईल ते सगळे बरेच होईल."

त्यांचा कंठ भरून आला. जिजाबाईसाहेबांचे नेत्र अश्रूंनी मंद झाले होते. त्यांचाही कंठ भरून आला होता. इतरांनी हा प्रकार पाहिला. मायलेकरांच्या अशा स्थितीत आपण असणे इष्ट नव्हे असे वाटून इतर मंडळी तेथून उठून गेली.

* * *

## २२. भोळा बिचारा दिलेरखान

नूर एल हुदा हिला महाराजांनी तिच्या बापाच्या स्वाधीन केल्यापासून किरातसिंगाचे धाबे दणाणून गेले होते. आपण 'यः पलायते स जीवति' हाच काय तो मार्ग स्वीकारला पाहिजे, असे त्यास वाटू लागले. शिवाजी महाराजांना बादशहाचे मुलाखतीसाठी बोलावले असल्याचे त्याला कळले असावे. ही संधी आपल्याला आपला पाय काढण्यास बरी आहे असे वाटून तो एके दिवशी दिलेरखानाच्याकडे गेला. त्याने त्याची मुलगी परत मिळाल्याबद्दल अभिनंदन केले, पण तह झाला हे बरोबर झाले नाही असे त्याने सूचित करण्यास कमी केले नाही. त्यावर दिलेरखानास आश्चर्य वाटून त्याने त्यास काय व्हायला पाहिजे होते, ते विचारल्यावर तो आढेवेढे घेत म्हणतो, "आपण विचारताच तर सांगतो की, खरं म्हटले तर शिवाजीचा

दरोबस्त किल्ला घेऊन त्याला कैदेत टाकून खितपायला लावायचं. आपल्याला असं वाटतं काय की हा तहाच्या अटी पाळील ? खानसाहेब, आपली पाठ वळली की आपल्या राज्याची स्थापना याने केलीच म्हणून समजा. बादशहाच्या बोलावण्याप्रमाणे तो जायला कबूल झाला आहे हे आश्चर्यच आहे. त्याअर्थी त्याचा काही तरी कावा असला पाहिजे. दरबारात जाऊन बादशहापुढे अगदी मांडलिक म्हणून कुर्नीसात करून पाच हजारांची मनसब मिळाली, की येतायेताच कित्येक किल्ले घेतच स्वारी परत येईल आणि पुनः आपले राज्य स्थापन करील. हरळीची मुळी आणखी मराठ्यांची कुळी नायनाट करण्याला फार कठीण; ती उपटून काढून जाळून पार नाहीशीच केली, तर पुनः त्रास होणार नाही. थोडा शेष राहू द्या, की तिचा आपला विस्तार पुनः सुरू झालाच. आपण मजवर लोभ करता म्हणून मी एवढं बोलण्यास धजलो असो. चला. मला आता माझे लोक घेऊन परत जायला परवानगी द्या. दक्षिणेत मला काही राहण्याची आता इच्छा नाही. उद्या शिवाजी निघणार. तेव्हा आपल्याला माझा काही उपयोग करून घ्यावा असे वाटत असेल, तर मला त्याच्याबरोबर म्हणून लावा. मी त्याच्या पोटात शिरून त्याचा काही कावा असला, तर तो तेव्हाच जाणीन, आणि आपल्याला किंवा तिकडे गेल्यावर बादशहाला कळवीन. ''

किरातसिंगाच्या या भाषणाने दिलेरखान अगदी संतुष्ट झाला. हिंदु व जातीचा रजपूत असून त्याची सगळी श्रद्धा, सगळी भक्ती आपल्यावर असावी आणि त्याचा जातभाई जो राजा जयसिंग त्याच्यावर नसावी, याबद्दल त्याला फार मोठेपणा वाटला. आणि शिवाजीवर नजर ठेवण्याचे काम हा सुचवितो आहे, तेही काही खोटे नाही, असेच दिलेरखानाला वाटू लागले. राजा जयसिंगाचा शिवाजीकडे ओढा आहे हे तर त्याला कळून चुकलेच होते. तेव्हा किरातसिंगासारखा हेर म्हणून कोणी तरी जरूर येथपासून त्यांच्याबरोबर गेलाच पाहिजे असे दिलेरखानास तीव्रतेने वाटून राजा जयसिंगाची त्याप्रमाणे परवानगी मिळवून देण्याचे आश्वासन दिलेरखानाने किरातसिंगास दिले. पडत्या फळाची आज्ञा समजून त्याची स्वारी तेथून चालती झाली.

किरातसिंगास मनातल्या मनात गुदगुल्या झाल्या. आपले कपटनाटक बाहेर पडून आपल्याला देहांत प्रायश्चित्त होते की काय, अशा भीतीने जो नुसती काय हालहवाल आहे ती पाहण्यासाठी आला, तो आपले साधून पुन: दिलेरखानाच्या भोळेपणाबद्दल हसू लागला.

* * *

## २३. सूर्यास्ती

पवित्र रमणीय असा तापी नदीचा प्रवाह आणि सूर्यास्ताच्या वेळची पवित्र रमणीय अशी वेळ. त्या नदीप्रवाहापासून वरच्या बाजूस एक विस्तीर्ण व भव्य देवालय होते. या देवालयात अनेक प्रवासी उतरत. येथून जवळच बऱ्हाणपूर. त्या काळी हे शहर फार मोठे व नामांकित. त्यामुळे तेथे जावे, चार घरे भिक्षा मागून आणावी, या देवालयात यावे, नदीतीरी त्या भिक्षेचा पाक करावा, आणि देवाळयाच्या ओवरीत जाऊन श्रीशंकराच्या सान्निध्यात खुशाल पडावे, आणि अशा प्रकारे आपला काल कंठून पुढे मार्गस्थ होणारे कितीक पांथस्थ व यात्रेकरू या देवालयात उतरत असत. बऱ्हाणपूर हे उत्तरेकडे जाणाऱ्या सर्व प्रवाशांचे मुक्काम करण्याचे मुख्य ठिकाणच असे. परंतु ज्यांस जनसंमर्दाचा त्रास नको, त्यांना या देवाळयात नदीप्रवाहाच्या सान्निध्यात फार सौख्य होई. असे साधुसंत व गोसावी या देवालयात उतरत; नगरवासात आनंद मानणारे शहरात उतरत; त्याप्रमाणे मोठमोठाली सैन्ये अगर लवाजमे घेऊन प्रवास करणारे लोक शहराच्या बाहेर छावण्या देऊन राहावयाचे, तेही नदीप्रवाहाचा फायदा घेत आणि त्यातले धर्मश्रद्धाळू देवालयाचाही आश्रय करू इच्छित. असा लवाजमा घेऊन प्रवास करणाऱ्या एका दोघा गृहस्थांचाही तळ या देवळा-पासून थोड्या अंतरावर पडलेला दिसला.

वाचकांच्या परिचयाची माता रणदेवी व तिच्या मैत्रिणी आपापले कमंडलू घेऊन नदीतीरी आपली सायंकाळची पवित्र कर्मे करण्यासाठी आल्या होत्या. त्यांच्या पहिल्या विचाराप्रमाणे त्या मध्यंतरीची सर्व तीर्थे व यात्रा करीत करीत या स्थानी दोन दिवस मुक्काम करण्याच्या हेतूने राहिल्या होत्या. सूर्यास्ताचा समय होता. त्याचे प्रशांत सुंदर तेज आकाशाच्या सन्निध भागावर पसरून त्याचे प्रतिबिंब त्या सुंदर जलप्रवाहात पडले होते, आणि त्या जलप्रवाहावरून परावर्तनाने ते घाटावरील व्यक्तींच्या अंगावर पडले होते. पश्चिम दिशेस त्या वेळचा तो देखावा इतका काही चित्ताकर्षक दिसत होता, की माता रणदेवी आपला कमंडलू त्या काळी वाहत चाललेल्या रौप्यरसात बुडविण्याचे विसरून जाऊन त्या दिग्भागाकडे तटस्थपणे पाहतच उभी राहिली. सूर्यनारायण बहुतेक अदृष्ट झालाच होता. परंतु त्याचे सहस्र कर मात्र अद्यापि लांबवर पसरले होते. जणू काय, तो जाताना रणदेवी-सारख्या आपल्या पवित्र भक्तास आवाहन करीत आहे किंवा भिऊ नका, मी उद्या पुनः येतो असे आश्वासनच देत आहे. त्या प्रशांत रमणीय तेजाची प्रतिमा तिच्या चर्येवर दिसत होती. तिचे अंतःकरण जणू काय त्या देखाव्याने पूर्णपणे मोहून टाकले होते. तिची ती तल्लीनता पाहून कौसल्यादि तिच्या मैत्रिणींना तिचे त्यावेळचे स्वरूप एखाद्या देवतेच्या स्वरूपाप्रमाणे विशेषच प्रशांत व प्रसन्न वाटून त्यांचे डोळे तिच्या ठिकाणी संलग्न झाले... तो नदीकाठ, तो सूर्याच्या अस्तकाळच्या सौम्य तेजस्वी किरणांनी रंजित झालेला पश्चिम दिग्भाग, तो तेजाने रौप्यरसाप्रमाणे भासणारा जलप्रवाह, ते पार्श्वभागी सुंदर देवालय, तो सुंदर घाट, त्या सुंदर घाटाच्या पायऱ्यांवर सूर्यतेजाकडे पाहत उभी असलेली रणदेवीची श्वेतवस्त्रे परिधान केलेली, तिच्या गंभीर प्रशांत मुखाकडे पाहणाऱ्या श्वेतवस्त्र परिधान करणाऱ्या दुसऱ्या पवित्र स्त्रियांनी वेष्टलेली, एका हातात तो कमंडलू, दुसऱ्या हातात रूद्राक्षमाळा, आणि तोंडाने काही जप करणारी, अशी माता रणदेवीची धीरगंभीर व प्रशांत पवित्र अशी मूर्ती. असा तो देखावा नुसता शब्दांनी रेखाटला तरी मनास किती मोह होतो! मग ज्याच्या तो प्रत्यक्ष दृष्टीस पडला असेल, त्याच्या आनंदाची कल्पना काय करावी? त्यावेळी तो देखावा पाहणारा असा एक धन्य पुरुष त्या घाटाच्या वरच्या बाजूला एकटाच उभा

होता. त्याचे विशाल नेत्र माता रणदेवीच्या मुखाकडे अगदी लागून राहिले होते. त्या त्याच्या पाहण्यात पूज्यबुद्धी, श्रद्धा, भक्ती, इत्यादि पवित्र विकाराखेरीज दुसरे काहीही नव्हते हे तर अगदी स्पष्ट होते. पाहता पाहता त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले, परंतु ते पुसून काढण्याचे सुद्धा त्याला भान नव्हते. माता रणदेवीकडे पाहून कोणा तरी अत्यंत पूज्य अशा व्यक्तीचे त्याला स्मरण झाले असावे असे दिसले.

परंतु असा प्रकार किती वेळ चालणार ? सूर्याचे तेज हळूहळू कमी होत चालले. माता रणदेवी भानावर आली. तिने आपल्या मैत्रिणीकडे पाहून फारच मनोरम हास्य करून म्हटले, " तुम्हीसुद्धा हा देखावा पाहून मोहित झाला ना ? पण आता चला. आपण आपले कमंडलू भरून घेऊन हातपाय धुवून भजन करायला जाऊ. आज माझे मन फार सुप्रसन्न झालं आहे. " त्या सर्वांचे हस्तपादादि प्रक्षालन झाल्यावर त्या सर्वजणी घाटावरून देवालयाकडे जावयास निघाल्या. इतक्यात आपल्या अंगाभोवती काळे कापड गुंडाळलेल्या सात आठ काळपुरुषांनी त्यांच्याभोवती गराडा घातला; आणि त्यांच्यापैकी मुख्याने त्या स्त्रियांपैकी तरुण असलेल्या, वाराणशी, मथुरा आणि कौसल्या यांना बळजबरीने आपण घेऊन जाणार असल्याचे सांगताच, माता रणदेवी संतापाने लाल झाली आणि तिच्या तोंडून संतप्त स्वरात,' अधमा ' एवढा शब्द उच्चारताच तो बोलणारा गृहस्थ दचकून मागेच सरकला. पण त्याच्या दुसऱ्या साथीदाराने तितक्यात पुढे येऊन आपल्या कणखर व बोजड हाताने तिचे तोंड बंद केले. तेवढ्यात पहिल्या बोलणाऱ्याने आपल्या लोकांस त्या तीन स्त्रियांस जबरदस्तीने उचलण्यास सांगितले.

परंतु इतक्यात " खबरदार दुष्टानो, गरीब गोसावणींना त्रास दिलात तर ! " हे शब्द उच्चारणारा स्वर विलक्षण गंभीर व कठोर होता. इतकेच नव्हे, तर ज्याला नेहमी इतरांस हुकूम करून त्याची अंमलबजावणी करून घेण्याशिवाय दुसरी सवयच नाही असाच तो पुरुष असावा हे त्याच्या पवित्र्यावरून दिसत होते. त्याच्या हुकूमाबरोबर ते सगळे काळपुरुष प्रथम दचकून मागेच झाले. परंतु आपल्यापुढे एकच गृहस्थ उभा आहे असे पाहताच, त्या मुख्याने आपल्या सात आठ माणसांशी लढण्याचा मूर्खपणा न करण्याचा सल्ला आपल्या नवख्या गृहस्थास दिला. परंतु उत्तर देण्याची

भानगड मुळीच न करता, त्याने आपल्या तलवारीचा फटकारा त्यांस लगवावा म्हणून ती उपसली. त्या गोसावणींच्या जिभा जणू काय आतापर्यंत त्यांच्या तोंडात अगदी बद्ध झाल्या होत्या, त्या सुटल्या आणि त्यांनी खूप मोठा गलगा केला. हा गलगा ऐकून देवालयात बसलेले लोक धावून आल्यामुळे त्या काळपुरुषांना जे काही साधावयाचे होते ते साधले नाही. जो एक गृहस्थ या सर्वांचा मारा चुकवीत होता, त्याच्या मदतीस देवळातून आलेला एक हत्यारबंद शिपाई आला. त्या सात आठ काळपुरुषांना या दोघांनी अगदी जेरीस आणले. त्या काळपुरुषांपैकी एकाने हत्यारबंद शिपायावर जोराचा वार केल्यामुळे तो खाली पडला. काळपुरुषांना आपली धडगत नाही असे वाटल्यामुळे व पडलेल्या शिपायाकडे लोकांचे लक्ष वेधलेले पाहताच त्यांनी पळ काढला.

माता रणदेवीच्या मैत्रिणी आपल्या देवळात जाऊन केव्हाच बसल्या होत्या. माता रणदेवी जखमी शिपायाजवळ बसून त्याच्या कानशिलातून वाहत असलेला रक्ताचा पाट थांबविण्यासाठी खटपट करीत होती. इतक्यात पहिला मराठा शिपाई आला आणि त्याने तेथून जवळच असलेल्या मराठ्यांच्या छावणीत त्यास नेले. त्याच्याबरोबर माता रणदेवीही जावयास निघाली, तेव्हा त्या शिपायाने तिने येण्याची आवश्यकता नाही, शिपायाची खबरबात जासुदाबरोबर दर प्रहराला कळवितो वगैरे सांगितले. पण आपल्यासाठी स्वतःच्या प्राणावर उदार होणाऱ्या रजपूत शिपायाची वास्तपुस्त केल्याशिवाय माता रणदेवीस चैन पडणार नसल्याने ती त्या शिपायाबरोबर मराठ्यांच्या छावणीपर्यंत गेली. त्या शिपायास छावणीतले लोक "महाराज, महाराज" म्हणून संबोधीत होते, ते पाहून माता रणदेवीला वाटले, की महाराज पदवीने संबोधलेला हा तेजस्वी शिपाई मराठ्यांचा शिवाजी राजा तर नव्हे ! तिने आपला हा तर्क बोलून दाखविल्यावर त्याने काही उत्तर दिले नाही. अत्यंत विनयाने त्याने आपली मान लवविली आणि माता रणदेवीस फार लीनपणे नमस्कार केला. तिच्या नेत्रात अश्रुपूर लोटला. त्याच्यावरून हात ओवाळून तिने म्हटले, "बाबा, तुला भगवान एकलिंगजी दीर्घायुष्याचा करो. तू आपल्या आईबापांच्या पोटी येऊन जन्माचे सार्थक केलंस. तुझी कीर्ती मी फार ऐकली, आणखी आज प्रत्यक्ष पाहिलं.

समाधान झालं. आमच्यासारख्या गोसावर्णींच्या जिवासाठी तू सातआठ मारेकऱ्यांच्या अंगावर तुटून पडलास, तेव्हा तुझ्या आईचा कुसवा धन्य! एवढासा लहान लवाजमा घेऊन तू उत्तरेकडे चाललास; पण बादशहा औरंगजेब फार नीच, फार दुष्ट, आणखी कपटी. कोण्यावेळी तुला काय करील याचा नेम नाही ... "

यावर महाराज काही बोलणार तोंच त्या जखमी शिपायाच्या जखमेतून रक्त येण्याचे बंद झाले असून त्याला झोप लागली आहे व काळजी करण्याचे कारण नाही असे वैद्यबुवांचे म्हणणे असल्याचे तानाजीने येऊन सांगितले.

ते ऐकताचि माता रणदेवीस फार समाधान झाले. आपली कृतज्ञता व्यक्त करून ती आपल्या देवळाकडे आली. तिच्या मैत्रिणी तिची वाटच पाहत होत्या. दक्षिणेत असताना आपण ज्या पुरुषाचे नाव गोब्राह्मण प्रतिपालक म्हणून पावलोपावली ऐकत होतो, तोच आपल्या सोडवणुकीला धावला होता असे माता रणदेवीने सांगताच तिच्या मैत्रिणी उद्गारल्या, " कोण ? शिवाजीमहाराज ! "

* * *

## २४. जखमी झालेला शिपाई

शिवाजीमहाराजांचे नाव ऐकताच सर्वजणी अगदी चकित नेत्रांनी माता रणदेवीकडे पाहू लागल्या. नंतर त्या सर्व रात्रभर शिवाजीमहाराजांच्या व त्यांच्या पराक्रमाबद्दलच्या गोष्टी बोलत होत्या. अशा गोष्टी होता होता सुप्रभात झाली. गोसावी, बैरागी वगैरे लोकांना दक्षिणचा राजा ऐकून चांगला ठाऊक होता. मुसलमानांच्या कचाट्यातून आपल्या देशाला सोडवून गोब्राह्मणांचा प्रतिपाल करण्यासाठी त्याचा एकसारखा खटाटोप चालला आहे, हे जिकडे तिकडे महशूर होते. आणि ते महशूर होण्याला जी अनेक कारणे

होती त्यापैकी सगळ्यात मोठे कारण म्हणजे भारतवर्षाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत एकसारखे हिंडत राहणारे हे यात्रेकरू–गोसावी–बैरागी–तपीतापसीच होत यात तिळमात्रही संशय नाही. आपल्या धर्मावर औरंगजेबाने काय अनन्वित जुलूम चालविले आहेत, त्याने कित्येक देवळात गाई कापवून त्या देवळांचा कसा उच्छेद करविला व तेथे मशिदी कशा बांधल्या यांचे ज्ञान या बैराग्यास जितके असे, तितके कोणासच नसावयाचे. दक्षिणेत जे तीर्थाटने करीत आले, त्यांना हा महात्मा पाहण्याची आतुरता वाटे, पण ती सफल होईल असे मात्र नाही. तशीच उत्कट आतुरता या गोसावणींना होती. माता रणदेवीने आपल्या मैत्रिणींना शिवाजीमहाराजांचे दर्शन दुसऱ्या दिवशी घडवून देण्याचे आश्वासन देताच त्या सर्वांना फार आनंद झाला. अशा त्यांच्या गोष्टी चालल्या असता वाराणशी म्हणाली, "माताजी, आपल्याला सोडवायला धावलेला दुसरा पुरुष कोण? त्याचीसुद्धा चौकशी आपण करायला पाहिजेना?"

इतके त्यांचे बोलणे चालले होते, तों तानाजी तेथे येऊन त्याने तो जखमी शिपाई बरा होत असून सकाळपासून खडखडित बोलू लागल्याचे सांगितल्यावर माताजीस फार आनंद झाला आणि ती म्हणते, "बाबा, तुझ्या तोंडात साखर पडो. आम्हाला संकटातून सोडविण्यासाठी आपला जीव धोक्यात घालणाऱ्या एका वीराचा जीव गेला असे जर ऐकले असते तर जन्मभर मनाला खाल्ले असते. आम्हाला आपल्या छावणीत घेऊन जाऊन महाराजांना भेटवा. त्यांचा निरोप घेऊ; त्या जखमी शिपायांसही भेटू आणि मार्गाला लागू. याप्रमाणे बोलून माताजी आपण होऊनच महाराजांना भेटण्यासाठी निघाल्यामुळे महाराजांनी त्यांना बोलावले असल्याचा निरोप सांगण्याची तानाजीस जरूरच पडली नाही. तानाजीबरोबर माता रणदेवी व तिच्या मैत्रिणी आपल्या छावणीत आलेल्या पाहताच, महाराजांनी मोठ्या आदर-सत्काराने त्यांचे स्वागत केले. त्या शिपायाची प्रकृती अगदी बरी असल्याचे त्यांनीही सांगितल्यावर माता रणदेवी त्यांस म्हणाली, "महाराजा, तुझी पुण्याई फार जबर. चार दिवस जरी तुला पड खावी लागत आहे, तरी अंती तुझा जयच होणार याबद्दल तुला अगदी शंका नको. तू अलमगिराच्या खाईत जातो आहेस हे मात्र बरोबर नाही. तो फार कपटी–कपटाचा मूर्तिमंत

पुतळा आहे. परंतु तू फार सावधगिरीने रहा. तुझे कल्याण होईल. यापली-कडे मी गरीब बैरागीण तुला आशीर्वाद तरी काय देणार? पण माझा आशीर्वाद कधी खोटा होणार नाही. आम्हाला एकवार त्या जखमी शिपायाची भेट घेऊ दे म्हणजे आम्ही जातो."

त्यावर महाराज म्हणाले, "आपण त्याला भेटा. पण माझी एक विनंती आहे. आपल्याला जो काही प्रवास करावयाचा असेल, तो आता आमच्या छावणीबरोबर करा, म्हणजे आपल्यावर कालच्यासारखा कठीण प्रसंग येणार नाही. जेथून आपला रस्ता फुटेल तेथून आपणास पोचविण्या-साठी चारसहा माणसे देईन. पण आता काही मजलपर्यंत तरी एकट्या जाऊ नका. माताजी, आपल्याला मी दुरून पाहिल्या वेळेपासून माझ्या मातेचे–जिला मी दक्षिणेत सोडून इकडे चाललो आहे तिचे–स्मरण झाले. ती अशीच आपल्यासारख्या पवित्र तेजाने नुसती तळपते आहे. तिच्या हातात सर्व अधिकार. तिच्या आज्ञेचे उल्लंघन कोणी तिळभरही करावयाचे नाही. परंतु तिचीही वृत्ती अगदी आपल्याप्रमाणे संसारात असून अगदी अलिप्त. तेव्हा आपण मजजवळ असला, तर मला माझी माता माझ्या-जवळ असल्याप्रमाणे वाटणार आहे..."

हे वाक्य कानी पडताच माता रणदेवीचा शांतपणा एकदम नाहीसा झाला. तिच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले आणि ती म्हणाली, "महाराजा, माझा पुत्र जर तुझ्यासारखा असता, तर मी अशी देशोधडीला कशाला लागले असते?...पण मी हे काय बोलते! राजा, मी हा मातृमोहाचा पाश एकदा ताडकन तोडून टाकला आहे, तो मी पुनः जखडून घेऊ इच्छित नाही. मी जशी दुर्दैवाने बैरागीण झाले, तशाच माझ्या मैत्रिणी झाल्या आहेत. तुझ्या-वर आम्ही आपली काळजी का घालावी? वाईट प्रसंग आलाच तर भगवान् एकलिंगजी आजच्याचप्रमाणे आमचे संरक्षण करील. महाराजा, आम्हाला आपल्या वाटेने जाऊ दे. आणखी तुझे उपकार किती घ्यायचे?"

"माताजी, माझे उपकार कसले? आपण असलं बोलू नये. आपल्या-वर ज्यांनी काल हल्ला केला, त्यांचा मी तपास लावतो आहे. त्यांचा तपास लागून जोपर्यंत ते दुष्ट सापडले नाहीत, तोपर्यंत आपण यापुढे काही दिवसपर्यंत तरी एकट्या हिंडू नका, एवढी आमची विनंती आहे."

"बरं, पुढे पाहू. मला सध्या त्या शिपायाकडे घेऊन तर चल."

महाराजांनी तिला त्या शिपायाकडे नेले. हा जातीचा रजपूत असल्याचे माता रणदेवींने त्याला पाहण्याबरोबर ओळखले आणि त्याचे आभार तिने मानले. त्या शिपायाने डोळे उघडून तिच्याकडे पाहिले. त्याने तिला ओळखलेसे वाटले की काय न कळे. त्याची जखम बरी झाली होती, पण क्षीणता बरीच आल्याने त्याला शब्द काढण्यास फार अडचण पडत असावी असे दिसले. तथापि शब्दांनी जे काम करावयाचे, ते तो आपल्या अर्थपूर्ण व उत्कट नेत्रांनी करीत होता. महाराजांनी त्याला दिलासा दिला आणि परत फिरले आणि त्यांनी माताजीस छावणीबरोबर चार दिवस राहण्याची विनंती केली. त्या विनंतीचा स्वीकार करण्याबद्दल तिच्या मैत्रिणींनीही पण गळ घातल्यामुळे माता रणदेवीने महाराजांची विनंती मान्य करण्याचे ठरविले. या स्त्रीची पवित्र संगत आपणास दोनचार मुक्काम लाभणार हे पाहून महाराजांना फार आनंद झाला.

महाराजांनी त्या गोसावर्णीच्या योगक्षेमाची व्यवस्था उत्तम प्रकारे लावून दिली. संभाजीला त्यांनी एकवार माताजींच्या पाया पडण्यास पाठविले आणि काय चमत्कार ! त्याने तेव्हापासून माताजींचा ढोकळा धरल्याप्रमाणेच केले. माताजी दिवसातून एकदोन वेळ त्या जखमी शिपायाच्या समाचाराकरता जात असे. त्याला थोडे बरे वाटताच महाराजांनी तळ हालविला.

गोसावर्णींना त्रास देणाऱ्या मंडळींची चौकशी करता त्यांना असे कळले, की किरातसिंग म्हणून जयसिंगाबरोबरचा कोणी सरदार परत दिल्लीकडे चालला आहे आणि त्याची छावणी आपल्या आगेमागे गेले पंधरा दिवस असून, त्या छावणीतील लोकांनी दोघीतिघी सुंदर गोसावर्णींच्यावर डोळा ठेवून हे काम केले असावे. किरातसिंगाचे नाव ऐकताच त्यांना काही स्मरण झाले. त्यांनी तान्हाजीला बोलावून आणून त्याच्याशी काही हितगुज केले. तान्हाजीने महाराजांस म्हटले, की जयसिंगाने अगर दिलेरखानाने आपण दिल्लीस बरोबर जातो की नाही हे पाहण्यासाठी ही तुकडी हेर म्हणून पाठविली असावी. महाराजांना तान्हाजीचे म्हणणे पटल्यासारखे दिसले. तान्हाजीने जास्त चौकशी करून येण्यासाठी जाण्याची परवानगी मागताच त्यांनी ती दिली आणि मग जखमी शिपायाच्या समाचारासाठी ते-

गेले. तेथे त्यावेळी माता रणदेवी बसलेलीच होती. महाराजांनी विचारल्यावरून त्याने आपली माहिती सांगितली. तो म्हणाला, "महाराज, मी औरंगजेबाच्या जुलमाला आणखी त्याच्या पदरच्या कित्येक नीच लोकांनी आरंभलेल्या छळाला त्रासून गेलेला एक प्राणी आहे. दक्षिणेत आपल्याजवळ नौकरी मागण्यास येणार होतो, तों वाटेत या अनपेक्षित प्रसंगामुळे आपलं मला दर्शन झालं मी मूळचा अगदी गरीब आईबापांचा, परंतु माझा बाप फार शूर आणि मोंगलांचा तिटकारा असलेला. औरंगजेबाने राजपुतान्यावर स्वारी करून आमच्या खरकपुरात ठाणे दिले. आमच्या गावचे जहागिरदार अनुपमसिंह व माझे वडील यांचा फार मोठा स्नेह. मरायचे पण मोंगलांच्या ताब्यात आपला गाव जाऊ द्यावयाचा नाही असा त्यांचा निश्चय झाला. गावातील बायकांनीसुद्धा आम्हाला अतोनात उत्तेजन दिले. सर्व गाव मरणास सिद्ध झाल्याप्रमाणे दिसू लागला. औरंगजेबास हे कळताच त्याच्या अंगाचा तिळपापड झाला. पण तो महा कपटी. त्याने जासुदाबरोबर निरोप पाठविला, की आपण तुमच्या गावास बिलकुल त्रास देऊ इच्छित नाही, आणि आपला तळ उठवून नेतो. या निरोपाप्रमाणे मोगल सैन्य पार हलले, असे पाहताच आम्ही निर्धास्त झालो.

"आमच्या गावाला नदीचा सुंदर प्रवाह होता. नदीकाठच्या तटाच्या बुरुजावर अनुपमसिंह व माझे वडील, अनुपमसिंहाचा पुत्र व मी, आणि त्याचप्रमाणे आमच्या दोघांच्या मातुःश्री, ही सर्व मंडळी बोलत बसली होती. मध्येच अनुपमसिंहाचा मुलगा नाहीसा झाला. इतक्यात नदीच्या बाजूने सात नावा आल्या आणि त्यातून लोक भराभर उतरले. तटाचा दरवाजा उघडल्याचा आवाज होऊन माझे वडील व अनुपमसिंग 'घात रे घात' म्हणून ओरडतात, तों 'दीन दीन' म्हणत त्यांच्या भोवती गराडा पडला. त्याबरोबर नदीच्या तटावरून माझी आई व अनुपमसिंह यांची पत्नी यांनी उड्या घातलेल्या पाहताच मीही त्यांना वाचविण्यासाठी नदीत उडी घातली. त्या दोघींपैकी एक माझ्या हाती लागली. तिला घेऊन मी तिला वाळवंटात टाकले, तों तिने—माझ्या स्वामिनीने—मी माझ्या बापाच्या व स्वामीच्या सोडवणुकीस न गेल्याबद्दल माझी निर्भर्त्सना केली. तिचे भाषण ऐकताच माझे कर्तव्य न केल्याबद्दल मला वाईट वाटले आणि परत

तटाकडे परतलो. इतक्यात एक नाव आली आणि माझ्या कानी पुढील शब्द आले : " मी तुम्हाला म्हटलं नाही, त्यांनीच उडी टाकली असावी. दुसरी मला वाटतं ताबडतोब बुडून मेली. आपण वेळीच पोचलो, म्हणून ही एवढी तरी सापडली. " हे शब्द उच्चारणाऱ्या स्वामीपुत्राच्या दुष्ट नावाचा मी उच्चार करीत नाही. ती नाव तटाच्या पायथ्याशी लागल्याबरोबर मी तिच्यावर हल्ला केला. एक मेला व एक पळून गेला. नावेत एक चिंब भिजलेली मृत स्त्री–माझी मातुःश्री होती. तिला उचलून तीराबर नेऊन ठेवले. थोड्या वेळापूर्वी तीरावर नेऊन जिला ठेवले, ती आपली स्वामिनी मात्र दिसेना, म्हणून जवळपास शोध केला; पण काही उपयोग झाला नाही. दुसरे दिवशी सकाळी माझ्या मातुःश्रीचे सर्व विधियुक्त करायचे ते केले. "

इतकी हकिकत सांगून तो शिपाई थांबला. त्याचा कंठ सद्गदित झाला होता. माता रणदेवीच्या डोळ्यातून तर एकसारखे अश्रू गळू लागले. ती उठली आणि म्हणाली, " पुढची तुझी हकिकत माझ्याने ऐकवेल की नाही कोण जाणे ! "

त्याबरोबर तो तिला म्हणतो, " माताजी, पुढे काय हकिकत असायची ? माझा बाप व अनुपमसिंग हे दोघे लढता लढता मेले. तो दुष्ट ज्याने फितुरी करून आपले संस्थान अलमगीरच्या हाती दिले व जो आपल्या व माझ्या मातुःश्रीच्या मृत्यूला कारण झाला, तो औरंगजेबाचा बंदा गुलाम बनला. माझी बायको खरकपुराहून कोणीकडे गेली ते मला समजले नाही. खरकपुरास जाण्याची माझी आता इच्छा नाही. स्वतंत्र बाण्याने राहणाऱ्या राजपुतान्यातील संस्थानिकाजवळ नौकरी मिळणे शक्य नाही, म्हणून दक्षिणेतल्या या महाराजांच्याकडे चालली होतो, तों आपली अशी गाठ पडली; तरी आपण माझा स्वीकार करा. "

माता रणदेवी त्याच्याकडे मोठ्या प्रेमाने पाहू लागली. तिच्या ओठावर काही तरी शब्द आले, परंतु ते तिने मागे ओढले. नंतर ती त्यास म्हणते, " बाबारे, अशा महात्म्याजवळ मृत्यू बरा, पण अलमगिराच्या दरबारात दिवाणगिरी नको. तुझी बायको तुला भेटेल सारं काही यथास्थित होईल. तुला महाराजांनी बरा केला, तो तुझा स्वीकार केला म्हणूनच केला. आता मीच तुला त्यांच्यादेखत तुझी कामगिरी काय ती सांगते. महाराजांच्या

माणसांपैकी कोणाला इकडील फारशी माहिती नाही. तेव्हा तू जपणीवर रहा. वाटेल ती सोंगं करुन वाटेल ते कर, पण दरबारात काय चालले आहे त्याच्यावर नजर ठेव. जे काय नजरेस पडेल ते यांना सांगत जा. महाराज म्हणतात, की जयसिंगाचा मुलगा रामसिंग सर्व प्रकारांनी काळजी घेणार आहे. परंतु किती झाले तरी गुलामगिरीचे दूध प्यालेला तो; त्याच्या मनात हेतू चांगला असला तरी हातून चांगली कृती घडेलच असा नेम नाही. गुलामगिरीत वाढलेल्यांचा सल्ला गुलामांना शोभेसाच असावयाचा. आणखी तू स्वतःही थोडा जपून रहा. तू जर ओळखला गेलास तर तुझ्याही जिवाला धोका आहे. महाराज, या माणसाला आपण दूर करू नका. याचा आपल्याला फार उपयोग होईल."

महाराजांनी त्याला आपल्याजवळ ठेवून घेण्याचे आश्वासन दिले. मग माता रणदेवी त्यांना म्हणाली, "महाराज, आता आम्ही आपल्यापासून फुटणार. इतके मुक्काम आपण आमची काळजी घेतली, त्याचे उपकार आम्ही आपल्या चर्माचे जोडे आपल्या पायी घातले तरी कधी फिटणार नाहीत. माझ्या आशीर्वादाचा उपयोग काय होणार? पण तुझ्यावर किती जरी संकटे आली तरी तू अखेरीस यशस्वी होऊन दुष्ट अलमगिराच्या मोंगली गुलामगिरीतून आपल्या देशाला सोडवशील. माझी म्हातारीची वाणी कधी खोटी होणार नाही. आम्ही आता निदान चार महिने मथुरेस राहणार. अलमगीर आग्रा येथे आहे. तेथून मथुरा अगदी जवळ. माझी म्हाताऱ्या गोसावणीची आपल्याला मदत ती काय होणार? पण जर कधी काळी लागली तर वृंदावनास माझा शोध करा, म्हणजे माझी जागा कोणीही दाखवील."

शिवाजीमहाराजांनी तिला गोकुळ-वृंदावनास पोचविण्याचे आश्वासन दिले; पण तिने आता स्वतंत्रपणे जावयाचे ठरविले होते. तिने महाराजांना त्याप्रमाणे सांगून महाराजांनी आग्रह केला, तरी कोणाचीही सोबत न घेता तिने एकटीने जाण्याचा निश्चय केला. जातेवेळी तिचे त्यांनी घट्ट पाय धरले. इतर सर्व मंडळींनी तिला लोटांगण घातले आणि आशीर्वाद घेतले आणि त्या सर्व गोसावणी निघून गेल्या. त्या जात असताना तो खरकपुरचा शिपाई त्यांच्याकडे फारच आतुरतेने पाहत होता. त्याच्या मनात काही तरी

विलक्षण आठवण येऊन काही तरी भास झाला असावा व म्हणून तो त्या गोसावर्णीच्याकडे पाहत असावा असे दिसले. पुढे दुसरेच दिवशी तो मुक्काम महाराजांनी सोडला आणि मध्यंतरी विशेष काही न घडता ते आग्रा शहराच्या हद्दीवर जाऊन पोचले. जयसिंगाचा मुलगा रामसिंग हा त्यांस सामोरा आला.

★ ★ ★

## २५. स्वागत

शिवाजीमहाराजांनी रामसिंगास एक पत्र पाठवून आपण तेथे केव्हा येत आहो, त्याबद्दल कळविले होते. हे पत्र येताच ' शिवाजीमहाराजांस सामोरे कोणी व कशा लवाजम्यानिशी जावे ' हे विचारण्याठी रामसिंग औरंगजेब बादशहाकडे गेला आणि त्याने त्याबद्दल विचारले. या बोलण्याकडे आपले लक्षच नाही असे बादशहाने दाखविले. त्याच्या तेजस्वी डोळ्यात एक प्रकारचे दुष्ट समाधान अगदी स्पष्टपणे तळपत होते. तो मोठा वस्ताद, धूर्त, मत्सरी व घातकी होता. औरंगजेबाने काहीच उत्तर न दिलेले पाहून रामसिंगाने परत कुर्निसात करून तोच प्रश्न पुनः विचारला तेव्हां औरंगजेब म्हणतो, " आधी शिवाजीमहाराज कोण ते मला सांग. दहापाच किल्ले आणखी पाचपंचवीस खेडी भिक्षा मागून आपल्या हाती ठेवून माणूस कोठे महाराज होतो काय ? जा. असल्या माणसाच्या योग्यतेला साजेसाच पाच दहा इसमांचा लवाजमा देऊन एखाद्या शिलेदारास पाठवा सामोरा. त्याच्याबरोबर आहेत काय पाचसात माणसं ! महाराज ! पुनः माझ्या देखत याला कोणी महाराज म्हणता कामा नये. जा. " हे बोलताना औरंगजेबाचा चेहेरा मत्सर व द्वेष यांनी इतका पूर्ण दिसला की रामसिंगास त्याच्याकडे पाहून फारच चमत्कारिक वाटले. शिवाजीमहाराज आपल्या तावडीत आले असे वाटूनच हा प्रकार सुरू झाला, तर ते एकदा का येथे येऊन राहिल्यानंतर काय होणार ?

असा विचार त्याच्या मनास चाटून गेला. तथापि ही वेळ जास्त बोलण्याची नव्हे हे लक्षात घेऊन बादशहाची रजा घेण्यासाठी रामसिंगाने पुन्हा कुर्निसात केला, तेव्हा बादशहा त्यास म्हणतो, " काही हरकत नाही. तुम्ही वाटेल तितका लवाजमा – त्याची योग्यता जशी आहे अशी तुमची समजत असेल, त्यापेक्षा थोडा जास्तच वाटेल तर–घेऊन चला. तुमचे तुम्ही सर्व एकच आहा, तेव्हा त्यात काही कमी पडायचेच नाही. "

बादशहाचे हे भाषण ऐकून रामसिंगास तर फारच विचित्र वाटले. आज आपण याच्या समोरून लवकर गेलो तर बरे असे वाटून तो बादशहाचा निरोप घेऊन आपल्या वाड्यात आला त्याने महाराजांच्या स्वागताची सिद्धता त्याला योग्य दिसली, त्याप्रमाणे केली. ज्या सरदारांनी महाराजांच्या आगमनाची गेले आठ दहा दिवस चौकशी केली होती, त्या सर्वांना त्याने निरोप पाठविले आणि ते सर्व आपापल्या लवाजम्यानिशी महाराजांस सामोरे जाण्यास सिद्ध झाले. याचा परिणाम असा झाला की एक बादशहाखेरीज बाकी सर्व रजपूत व मुसलमान सरदार त्याला सामोरे जाणार आहेत, खुद्द बादशहाची स्वारी निघत असते तसला थाट होणार आहे, अशी जिकडे तिकडे भुमका उठली; आणि सगळ्या आग्रा शहरभर महाराजांच्या स्वागताची एकच धुमश्चक्री सुरू झाली. कोणी आपल्या घरासमोर गुढ्या उभारल्या, कोणी तोरणे उभारली, तर कोणी सडासम्मार्जने करून अंगणे व दारापुढील जागा सारवून त्यावर रांगोळ्या काढल्या. रामसिंगाच्या स्वप्नातसुद्धा असे आले नव्हते की महाराजांच्या स्वागताचा केवळ यदृच्छेने इतका थाट होईल. परंतु बनाव बनून गेला. सर्व सरदार, दरकदार, दरबारी रजपूत, इतर हिंदू आपापला लवाजमा घेऊन महाराजांच्या स्वागतासाठी तयार झालेले पाहताच रामसिंगाने शिवाजीमहाराजांस निरोप पाठविला की, ' आपण आता शहरात येण्याची सत्वर तजवीज करावी; लहानापासून थोरापर्यंत सर्व माणसे आपले दर्शन व्हावे म्हणून उत्सुक आहेत.'

शिवाजीमहाराजांनी आपला मुक्काम हलविला होताच. आग्रा जों जों जवळ येऊ लागले, तों तों त्यांचे अंत:करण मात्र फार जड होऊ लागले. महाराजांस असे वाटले, की जसा एखादा विजयी पुरुष आपल्या शत्रूस बंदिवान करून घेऊन येतो आणि मग मोठ्या थाटाने नगरप्रवेश करून आपण आणलेल्या बंदिवानाचे रस्तोरस्ती प्रदर्शन करावयाचे म्हणून सगळ्या

शहरातून हिंडतो, तसाच हा आपला प्रवेशसमारंभ होणार असे त्यांस वाटत होते. त्यामुळे अर्थातच त्यांच्या मनास फार खेद होत होता.

परंतु नगरच्या वेशीपासून पुढे सामोरे आलेले लोक त्यांच्या नजरेस पडले, त्यात सर्व रजपूत व इतरच दिसले. बादशहाच्या लोकांपैकी कोणी दिसले नाहीत. पुढे त्या लोकांचा जो उत्साह दिसला व आपल्याविषयीचे जे प्रेम दिसले, तेव्हा त्यांच्या समाधानास पारावार नाहीसा झाला. दक्षिणेतून आणलेला बंदिवान प्रदर्शनासाठी फिरविला जात असल्याच्या उत्साहाहून हा उत्साह फार भिन्न होता. जसा एखादा वीर मोठी लढाई मारून आला असता लोकांस त्याबद्दल फार कौतुक वाटावे आणि त्याचे स्वागत त्यांनी करावे त्याप्रमाणेच सर्व नगरभर त्यांचे स्वागत चालले होते. त्यांच्या नावाचा सारखा जयघोष होत होता.

मोंगलांचे पारिपत्य करण्यासाठी अवतरलेला हा पुरुष आज आपल्या नजरेस पडला म्हणून ज्यास त्यास फार आनंद झाला. बादशहाला त्याच्याशी तह करून घेण्याची पाळी आली व त्याने मोठ्या मिनतवारीने त्याची स्वतंत्रता कबूल करून त्यास इकडे आणून त्याला मनसबदारीची लालूच दाखवावयाचा बेत केला आहे अशी जिकडे तिकडे भुमका उठली. शिवाजी-महाराजांस इकडे यावे लागले, तह करण्यास त्यांना कबुली द्यावी लागली यात कोणासच काही नामुष्कीचे दिसेना. या स्वागतामुळे शिवाजीमहाराजांचे विशेष समाधान झाले ते निराळ्याच दृष्टीने होय. स्वराज्याची व स्वातंत्र्याची इच्छा लोकात अद्यापि कायम आहे; आपण स्वराज्यासाठी आपल्या देशी जी धडपड करतो आहो, ती केवळ मूर्खपणाची आहे असे काही या लोकांना वाटत नाही व हे फार चांगले लक्षण आहे असे महाराजांना वाटले. जोपर्यंत माणूस किंवा समाज आपल्या अवनत स्थितीला – हीच आपली कायमची ईश्वराने नेमून दिलेली स्थिती असे मनात धरून निराश होऊन बसला नाही, तोपर्यंतच त्याचे डोके वर निघण्याची आशा. ती स्थिती जर का एकदा येऊन पोचली तर पुढच्या आशेचे नावच काढावयास नको, हे महाराजांस स्पष्ट दिसत होते. तेव्हा तितकी अवनत स्थिती अद्यापि दिल्ली, आग्रा वगैरे ठिकाणी येऊन पोचली नाही हे पाहून त्यांना समाधान झाले तर त्यात नवल काय ?

शिवाजीमहाराजांना मिळालेल्या सर्वोत्कृष्ट स्वागताबद्दल अस्सल मुसलमान म्हणविणाऱ्यांना मात्र फार वाईल वाटले. मुसलमान पुरुष जरी वाटेल तशा शिव्या देत होते, तरी पण त्यांची अंतःपुरे मात्र त्यांच्याइतकी दुराभिमानी नव्हती. मनुष्य जात्या उत्सवप्रिय आणि त्यात स्त्रियांची उत्सवप्रियता तर विचारूच नये. यामुळे त्यांना तो उत्सव पाहण्याची उत्सुकता साहजिकपणेच वाटून त्या आपापल्या गच्च्यांवर बसून त्या मिरवणुकीकडे पाहत होत्या. अगदी अनायासे झालेल्या या स्वागत-समारंभाने रामसिंगास एका परीने समाधान झाले, परंतु दुसऱ्या परीने वाईट वाटले. या समारंभाचे वर्णन बादशहाच्या कानी गेले असता, त्याच्या वैराग्नीचा भडका होईल व त्या योगाने त्याच्या अंगाची लाहीलाही होईल हे त्यास उघड उघड दिसले. ज्याला आपण नुसते महाराज म्हटले म्हणून संताप आला, तो हे वर्णन ऐकून डोक्यात राख घालून उठणार नाही हे संभवनीयच नव्हे. परंतु आता काय करणार ?

रामसिंगाने आपल्या मकाणापासून जवळच महाराजांसाठी व त्यांच्या लवाजम्यासाठी उतरण्याकरता एक प्रचंड वाडा दिला होता. तेथे सर्व अगदी उत्तम व्यवस्था रामसिंगाने ठेवली होती. त्या वाड्यात स्वाऱ्या जाऊन पोचल्यावर महाराजांस त्या वाड्याच्या दिवाणखान्यात नेऊन बसविले. नंतर पुष्कळ हिंदु अमीरउमरावांच्या भेटी झाल्या. मुसलमान उमराव कोणी आलेच नव्हते. काही वेळाने सर्व मंडळी गेल्यावर महाराज व त्यांची खाशी मंडळी विचार करीत बसल्यावर रामसिंगाच्या मनात काही तरी डाचत असल्याचा संशय महाराजांनी व्यक्त केल्यावर खरकसिंग ( जखमी शिपायास तो खरकपूरचा म्हणून लोक खरकसिंग म्हणू लागले. ) हात जोडून त्यांना म्हणतो, " महाराज, रामसिंगास काही चिंता पडली, तर त्यात नवल नाही. आपल्या स्वागताची हकिकत बादशहाच्या कानी गेली म्हणजे मत्सराने व द्वेषाने त्याच्या अंगाचा अगदी भडका उडेल, व तो त्या द्वेषाच्या भरात काय करील आणि काय नाही याचा नेम नाही. " खरकसिंगाचे हे बोलणे महाराजांस अगदी यथार्थ वाटले. आपल्याला दगाफटका होऊ न देणे हे रामसिंग आपले काम समजतो हे साहजिकच होय. तेव्हा त्याला हीच काळजी वाटत असली पाहिजे हे उघड आहे. हे महाराजांसही बरोबर वाटले.

शिवाजीमहाराजांच्या आपोआप झालेल्या स्वागताच्या बातम्या बादशहाच्या कानावर जसजशा जात होत्या, तसतसा त्याच्या अंगाचा तिळपापड होत होता. पण रामसिंग भेटावयास आल्याबरोबर बादशहा त्यास म्हणाला, "वा! आपण तर फार बहार उडवून दिली असे ऐकतो. पण ठीक केलेत त्यांची राहण्याची वगैरे व्यवस्था फार उत्तम ठेवली आहे ना? काही सुद्धा उणे पडू नये. आपण त्यांच्या तैनातीत असायला पाहिजे. त्याला आमचा दोस्त बनवावयाचा आहे. आमच्याविषयी गैरसमज उत्पन्न होईल असे काही सुद्धा घडता कामा नये, अशी खबरदारी ठेवा. दोन तीन दिवस विश्रांती घेतली म्हणजे मग दरबारला येण्याची व्यवस्था करू. आता जा. आणखी त्यांना आपण इथे आलो हे बरे झाले नाही असे वाटू देऊ नका. त्याची आम्हाला दोस्ती संपादन करावयाची आहे, दुष्मनी नको, हे पुनः सांगतो ते ध्यानात ठेवा."

रामसिंग कुर्निसात करून तेथून निघाला. बादशहाचे हे सर्व भाषण ऐकून रामसिंग फारच चकित झाला. इतका विलक्षण स्वागतसमारंभ होऊन बादशहा शांत कसा? परंतु कपटी माणसाच्या बोलण्याचा भरवसा मुळीच धरू नये, हे त्याचे पक्के ठरलेले. भलताच घात होण्याचा संभव फार असे त्यास वारंवार वाटू लागले. आपण अत्यंत सावधपणे राहावे हेच विहित, असा मनाशी विचार करीत रामसिंग आपल्या घरी परतला.

* * *

## २६. बादशहाची थैली

महाराज आग्रा येथे येऊन उतरल्यानंतर दोन दिवस झाले. बादशहाच्यातर्फे एका माणसाने एवढाच निरोप आणला, की आपण स्वस्थ बसावे; आपला दगदगीचा शीण उतरला म्हणजे बादशहा आपणास दरबारी बोलावण्याचा दिवस मुक्रर करून निरोप पाठवितील.

आणखी दोन दिवस झाल्यानंतर महाराजांस असे वाटले, की आपण आता काय करावे ? सर्व व्यवस्था उत्तम होती. रामसिंग दोनदा येऊन समाचार घेई, परंतु त्या पुरुषास या गोष्टींनी काय समाधान होते ? आपण आलो त्या कार्याचे काय ? हे प्रश्न त्यांच्या मनात यावयाला लागले.

महाराजांची मंडळी आग्रा शहरात हिंडून शहराच्या सर्व भागांची चांगली माहिती करून घेत होती. खरकसिंग त्यांचा वाटाड्या बनला. पुढील चार दिवसातही बादशहाकडून दरबारी येण्याबद्दल महाराजांना काही निरोप आला नाही. त्यामुळे महाराज जास्त त्रस्त झाले. त्यांस आपण येथे येऊन उगीच अटकेत पडल्यासारखे वाटू लागले. दरबारच्या सरदारांशी ओळखी व्हाव्या असे त्यांना विशेषत्वाने वाटू लागले व त्याकरता म्हणून त्यांनी आपल्या माणसांबरोबर काही भेटीचे जिन्नस व पत्रे निरनिराळ्या अमीरउमरावांकडे पाठविण्यास सुरुवात केली. पत्री एवढेच लिहिलेले की, " बादशहाच्या आमंत्रणावरून आम्ही आपल्या गावी आलो आहो. बादशहा तर सर्वथा आमचा परामर्श घेत आहेतच. परंतु आपणही परामर्श घेत जावा; कां की मी आपल्यापैकीच आहे. "

अशी पत्रे व भेटीच्या जिन्नसांच्या मोठ्या पेट्या पाठविण्यात येऊ लागल्या. त्यात काय आहे, काय नाही याबद्दल चौकशी करण्याचे कोणाच्या मनात आले नाही. येणार कसे ? महाराजांसारख्यांनी आपल्या बरोबरीच्या किंवा आपल्याहून श्रेष्ठ अशा लोकांस नजराणे पाठविणे अगदी स्वाभाविक होय. त्यात वावगे एवढेच होते, की बादशहाची मुलाखत होण्याच्या आधीच हे सर्व सुरू झाले. पण त्याची विशेष चिकित्सा कोणी केली नाही. बादशहाच्या कानी काही गेले असले, तरी त्याने त्याबद्दल विचारपूस केली नाही. तेव्हा तो प्रकार सुरूच राहिला आणि ज्यांना पत्रे गेली होती, त्यापैकी मध्यम स्थितीतले दहापाच सरदार महाराजांना भेटून गेले.

रामसिंग रोज दोन वेळ महाराजांच्या भेटीस येऊन त्यांची पूसतपास करीत असे; त्याचप्रमाणे तो बादशहासही भेटत असे. परंतु बादशहा नुसता प्रश्नानेसुद्धा विचारीत नसे, की शिवाजी ठीक आहे ना ? शिवाजीमहाराजांनी रामसिंगाला एके दिवशी विचारले, की " आम्हाला दक्षिणेतून इकडे आणले ते काय असे अटकेत लोंबत ठेवण्यासाठी ? आपण एके दिवशी बादशहाला स्मरण तरी द्या."

अशा तऱ्हेने महाराजांनी बरेच दिवस काढले. त्यांना जे करावयाचे होते, त्यालाही त्यांनी प्रारंभ करून हळूहळू खडे टाकून पाहण्याचे काम चालू केले होते; पण त्यात विशेष यश येण्याचे चिन्ह दिसेना. त्यामुळे त्यांना आपण उत्तर हिंदुस्थानात फार दिवस काढण्यात तात्पर्य नाही असे वाटू लागले. परंतु बादशहाच्या अनुमतीवाचून, निदान त्याची व आपली मुलाखत होण्याच्या आधीच — जाणे केवळ अनिष्ट होते. जी कुचंबणा चालली होती ती फारच त्रासदायक होती. शेवटी एके दिवशी महाराजांनी रामसिंगास बादशहास स्मरण देण्याबद्दल पुनः बजावले. त्यावर रामसिंगाने बादशहाची मुलाखत घेऊन, शिवाजीमहाराजांना दरबारास बोलावून काय मानपान द्यायचा तो देण्याची विनंती करून बरेच दिवस झाल्याने महाराजांचे मनी, खाविंदाची अवकृपा झाली असावी असा खेद वाटू लागल्याचे सांगितले. त्यावर बादशहा म्हणतो, " का ? त्यांचा फितुरी करण्याचा उद्योग यशस्वी होत नाही असे त्यांना वाटू लागले वाटते ? त्याखेरीज काही इथून आपण जावे एकदा, असे नाही वाटणार ! जे त्यांचे लोक गावभर हिंडताहेत, त्यांनाही आमची काही मनाई नाही. दरबारात आमची चाकरी करणाऱ्या इराद्याने आमच्या शहरात ते आले आहेत, तर मग असे कंटाळून कसे चालणार ? शिवाय, कोणाला तरी गाठून त्याला आमच्या विरुद्ध उठविण्याचा उद्योग चालूच आहे. सांगा त्यांना की, आपल्याला दिलगिरी वाटून घेण्याचे काही कारण नाही. बादशहाला आपले पक्के स्मरण आहे. आमचा असा निरोप सांगा, आणि त्यांना त्यांच्या कामात मदत करीत राहा. "

" शहानशहा " रामसिंग एकदम म्हणाला, " आपण काय म्हणता याचा मला उलगडा होत नाही. वडिलांनी शिवाजीमहाराजांस नाना प्रकारे समजावून आणि खाविंदाच्या हुकुमाप्रमाणे कबुल्या करून इकडे पाठवून दिले. त्यांनी येण्याचे नाकारले नाही, कारण आपल्या ठिकाणी त्यांचा विश्वास. परंतु त्यांनी किती दिवस स्वस्थ बसावे ! आपण मुलाखत देऊन स्पष्ट खुलासा केला तर ठीक होणार आहे. ते सर्वथैव वडिलांवर विश्वास टाकून आले आहेत. "

रामसिंगाच्या या धिटाईच्या बोलण्याचे बादशहास थोडे आश्चर्य वाटले, पण तसे न दाखविता कपाळास आठ्या घालून तो म्हणाला, " विश्वासाचा

गैरविश्वास झाला कुठे ? चार दिवस दरबाराला बोलावले नाही म्हणून ! शाबास. पण त्याचे दिवस इथे काय वाया चालले आहेत का ? त्याला जी कामगिरी करायची म्हणून तो आला, ती कामगिरी चाललीच आहेना ? ”

“ खाविंद ” रामसिंग म्हणाला, “ आपण काय म्हणता ते माझ्या लक्षात येत नाही. याबद्दल मी फार लाचार आहे. ”

“ नाहीच लक्षात येणार. कारण तुम्ही सगळा कारभार डोळे मिटून करता, म्हणून तर त्याचे सगळे ठीक चालले आहे. मी जर दुसऱ्या कोणाला त्याच्या पाठीवर ठेवला नसता, तर मलासुद्धा काही समजले नसते. आपण दोनतीनदा जाता आणि आपल्याला समजत नाही, यावरून काय समजावे ? एक सामिली तरी समजावी, नाही तर आंधळेपणा तरी समजावा. बरं ते जाऊ द्या. त्यांना सांगा, आम्हाला लहर लागेल, तेव्हा दरबारी बोलावू. तोपर्यंत असेच इथं राहिलं पाहिजे. ”

इतके बादशहाने निक्षून सांगितल्यावर जास्त काही न बोलता रामसिंग आपल्या वाड्यात गेला.

पण वरील प्रकार घडल्यानंतर दुसरेच दिवशी बादशहाकडून थैली आली, तीत आज दोन प्रहरी भरावयाच्या दरबाराचे बादशहाने स्वदस्तुरचे पाठविलेले निमंत्रण होते. थैलीतील मजकूर ऐकून सर्वांस संतोष झाला, परंतु महाराजांची चर्या मात्र संतुष्टतेची दिसली नाही. महाराज आपल्याशीच खिन्न मनाने विचार करू लागले. आतापर्यंत बादशहा दरबारी बोलावीत नाही याबद्दल त्यांस खेद वाटत होता, तर आज त्याने बोलावले याबद्दल खेद वाटू लागला. याची मीमांसा करणे काही कठीण नाही. जी गोष्ट पहिल्या-पासून अनिष्ट वाटत होती, ती गोष्ट करण्याचा काही कारणाने आपण निर्धार केला, तरी त्या निर्धाराने ती गोष्ट घडून येण्याची वेळ आली, की त्याबद्दल खेद हा व्हावयाचाच. येथे येण्यात जो दुसरा हेतू होता, तोही सफल होण्याची चिन्हे दिसेनात. कारण जो सरदार भेटण्याला येई, तो त्यांची फार तारीफ करी, आपण गोब्राह्मण प्रतिपालनासाठी मोंगलाशी झुंजता, याचे आम्हाला फार कौतुक वाटते; परंतु आमच्या सगळ्यांच्या नांग्या पार मोडल्या आहेत असेही आपल्या तोंडाने सांगे. हे सर्व त्यांच्या मनात आलेव निराशेने त्यांच्या अंतःकरणास पूर्णपणे व्यास केले. दरबारात गेल्यावर आपण कसे वागावयाचे याचाही त्यानी आपल्या मनाशी काही निश्चय केला. * * *

## २७. दरबारी गेल्यावर

दरबारची वेळ झाल्यावर ते आपल्या तयारीला लागले. आपल्या सर्व माणसांस व जिवलग मित्रांस त्यांनी एकांतात बोलावून काही हितगुज केले. नंतर पोशाख चढविला. संभाजीमहाराजांनीही पोशाख घातला. दरबारी जाण्याच्या वेळचा लवाजमा रामसिंगाकडून आला, त्यात महाराजांच्यासाठी एक उत्तम शृंगारलेली पालखी होती. महाराजांची स्वतःची पालखी तयार झाली. बादशहाकडून आलेल्या पालखीत महाराज न बसता तीत त्यांनी आपल्या चिरंजीवास बसविले. पण हे बरे झाले नाही असे रामसिंगास वाटून, त्याने त्याप्रमाणे महाराजांस बोलून दाखविले. परंतु महाराजांनी त्यास, "जे मी करतो आहे तेच बरोबर आहे. संभाजी-महाराजांना मनसबदारीची वस्त्रे मिळणार आहेत तेव्हा त्यांनीच बादशहाचा मान घ्यावा," असे अर्धवट विनोदाने म्हणून आपल्या पालखीत आरोहण करण्यासाठी त्यांनी गोंड्यास हात घातला, तों गोंडा तुटून हाती आला. हा अपशकुन झाला असे सर्वांच्या मनात आले; परंतु महाराज फार समयसूचक. ते एकदम हसून म्हणतात, "वा! आई भवानीची तरी काय मौज आहे! बाबारे, बाहेरच्या कोणत्याही आधाराच्या जोरावर काम करशील तर तुला यश येणार नाही. आपला स्वतःचा आधार तोच तुझा आधार असे मला सुचविले" असे म्हणून ते चटकन् पालखीत चढून बसले.

महाराजांची स्वारी मोठ्या थाटाने आग्रा किल्ल्याकडे जाण्यास निघाली. सर्व शहर शिवाजीमहाराजांना पाहण्यास मार्गावर लोटले होते. किल्ल्यातील दरबार भरण्याचा जो आमखास दिवाणखाना आहे, तेथे महाराज आल्यावर रामसिंगाने व त्याच्या मित्र सरदार-दरकदारांनी त्यांना आपल्यातील उच्च मानाची जागा दिली. पुष्कळांनी त्यांना आपापल्या रीतीप्रमाणे आदराने हात उचलून, माना हलवून आदर दाखविला. इतक्यात बादशहा आल्याची ललकारी झाली आणि सर्वांनी खडी ताजीम दिली.

बादशहा आपल्या तक्तावर बसला. शिवाजीमहाराजांच्या मनावर आपल्या वैभवाचा खूप परिणाम व्हावा, त्यांना आपली स्वतःची दुर्बलता किती विलक्षण आहे, हे विरोधाने चांगले समजावे म्हणून दरबारचा थाट विशेष भपक्याचा व्हावा अशी तजवीज त्याने केली होती. दिवाणखाना जसा शृंगारलेला होता, त्याप्रमाणे तेथे बसलेले अमीरउमराव, राजेरजवाडे हेही आपल्या मनाच्या हौसेने शृंगार करून आले होते.

बादशहा नेहमी अगदी साधा पोशाख करी, परंतु आज त्याने सुद्धा आपला साधेपणा बऱ्याच अंशाने टाकला होता. बादशहाने रामसिंगाकडे पाहिले, अर्थात् रामसिंग समजला आणि शिवाजीमहाराजांस खूण करून तक्ताच्या जवळ जाऊन कुर्निसात करून या, असे त्यानें सुचविले. महाराजांच्या मनास खेद झाला. त्यांनी मोठ्या कष्टाने कुर्निसात केला. बादशहाने तो घेतला न घेतलासे दाखविले, आणि " कशी काय तब्येत ?" असे विचारून हाताने उजव्या बाजूला पलीकडे तिसऱ्या-चवथ्या प्रतीच्या सरदारात उभे राहण्याची खूण केली. ती खूण करताना बादशहाचा चेहरा इतका काही तिरस्कारपूर्ण दिसला, की महाराजांस त्यामुळे फार खेद वाटून त्यांच्या अंगाचा तिळपापड उडाला. हा अपमान त्यांना सहन कसा व्हावा ? त्यांनी त्या बाजूकडे जाण्याची हूल दाखविली, परंतु तितक्यात आपल्या मंडळीस खूण करून बादशहाकडे पाठ करून त्याचा मुळीच निरोप न घेता त्यांनी बाहेर जाण्याची वाट धरली. त्यांचे हे करणे पाहून रामसिंग फार चकित व भयभीत झाला. महाराज आपल्यावर विनाकारण बादशहाचा राग ओढवून घेत आहेत, असे बिचाऱ्याच्या मनास वाटू लागले. म्हणून त्याने त्यांस असे करू नका म्हणून सुचविले. परंतु त्यांचे डोके कोठे ठिकाणावर होते ? त्यांनी त्याच्याकडे मुळीच लक्ष दिले नाही; आणि ते एकदम आपल्या सर्व मंडळीला घेऊन भर दरबारातून उठून आपल्या जागी परत गेले.

दरबारातील सरदारांनी आपापसात महाराजांच्या तडफदार वर्तनाची कुजबुजत प्रशंसा केली. रामसिंगास आता काय करावे हे क्षणमात्र समजेना. शेवटी तो बादशहाकडे वळून म्हणाला, " गरीबपरवर, शिवाजीमहाराजांनी आपल्याला विनंती करण्यास सांगितले आहे की, " दरबारचा बडेजाव पाहून चक्कर येऊ लागली म्हणून परवानगी न घेता त्यांना जावे लागले.

माझी प्रकृती फार बिघडली. संभाजीराजांना जे काही पोशाख आणखी ज्या सनदा द्यावयाच्या असतील ते सर्व आमच्या मकाणावर पाठवावे."

रामसिंगाचे बोलणे स्वस्थपणे ऐकून घेतल्यावर बादशहाने म्हटले, "ठीक आहे. ते येथे दरबारात आले हेच आमच्यावर त्यांचे उपकार झाले आहेत; आणि तुम्ही त्यांना येथे आणून बसविले याबद्दल तुमची तारीफ करावी तेवढी थोडी आहे. झाल्या प्रकाराबद्दल मी काही बोलत नाही. परंतु..."

असे अर्धवट बोलून बादशहाने दरबार बरखास्त झाल्याचे जाहीर करण्यास सांगून महाराजांच्या मुलास पाच हजारी मनसबदारीची वस्त्रे देण्यास आपल्या दिवाणास आज्ञापिले. शिवाजीमहाराजांस शिक्षा होण्याच्या ऐवजी त्यांच्या मुलास मनसबदारीची वस्त्रे देण्याचा हुकूम ऐकून प्रत्येक माणूस फार चकित झाला. बादशहाला इतका गरिबपणा आला कोठून, असे जो तो म्हणू लागला.

इकडे महाराज अत्यंत संतप्त होऊन आता काय करावे यासंबंधाने विचार करू लागले. त्यांना साधारणतः कोणत्याही गोष्टीचा पक्का विचार करण्याला फारसा वेळ लागत नसे. त्यांनी आपल्या सगळ्या मंडळींना बोलावून झालेली हकिकत सांगितली. आता प्रसंग ठीक नाही, करिता सगळ्यांनी येथे राहण्याचे कारण नाही. त्यानी जाणाऱ्या लोकांची नावे घेऊन, त्यांना दोन घटकाच्या आत येथून चालते होण्यास सांगितले. महाराजांच्या आज्ञेविरुद्ध काही बोलून दाखविण्याची कोणाची छाती नसे. यामुळे पुष्कळ मंडळींना जरी असे वाटले, की आपण महाराजांना अशा परक्या देशात सोडून जाऊ नये तरी आम्ही जात नाही किंवा आपण आम्हाला असे सोडून जाण्याची आज्ञा करू नका असे म्हणण्याचे कोणास धैर्य होईना. या आपल्या माणसांचे अंतःकरण त्यांच्या चेहऱ्यावरून तेव्हाच महाराजांनी ताडले आणि ते त्यांच्याकडे वळून म्हणाले, "मला एकट्याला किंवा आपल्यापैकी दहापाच जणांनाच अशा खाईत सोडून जाणे तुमच्या जिवावर येते आहे. परंतु तुम्ही इथे सर्व राहिलात तर मी जास्त संकटात पडेन. एवढ्याकरता मी सांगतो तसेच करा. आपले वाट सापडेल तसतसे निघून जा. गोदावरी, किंबहुना नर्मदा उतरलात की सुखरूप गेलात

म्हणून समजा. तोपर्यंत वाट चाला. सिंहाच्या गुहेत जाऊन त्याची आयाळ धरून त्याला गदगदा हलविले आहे. तेव्हा आता तो सूड उगवायची धडपड केल्याखेरीज राहणार नाही. मी व आणखी काय दहापाच लोक ठेवून घेऊन ते, असे हरप्रकारच्या युक्त्या करून निघून येऊ. तुम्ही आता येथून निरनिराळ्या वाटांनी चारपाच जणांच्या टोळ्या करून जा, म्हणजे फारसा दगा होणार नाही. माझ्या जिवाला काहीसुद्धा धक्का लागणार नाही. माता भवानीने पूर्ण आश्वासन दिले आहे हे लक्षात ठेवून दृढ भावनेने जा."

इतके महाराजांनी निक्षून सांगितल्यावर मग कोण काय बोलणार! सर्व मंडळी चालती झाली. दरबार संपवून मंडळी परत येतात तों शिवाजी-महाराजांची अगदी खाशा तैनातीची माणसे काय ती राहिलेली.

सायंकाळी रामसिंग भेटीस आला, तेव्हा महाराजांनी त्यांस म्हटले, "आमची माणसे आम्ही लावून दिली. आता आम्ही सर्वस्वी तुमच्या ताब्यात आहो. बादशहास कळवावे की, आमचे मन येथे लागत नाही, तरी आम्हास निरोप द्यावा."

"आपण सुरू केला हा क्रम बरा नव्हे. बादशहाला विनाकारण चिडविणे आहे. तेढीने वागण्यात फायदा काय? बादशहाचा दिल फार नाखूष झाला."

ते ऐकून महाराज म्हणाले, "आमचा तरी दिल कोठे खूष आहे? त्याने आमच्यावर किंवा आम्ही त्याच्यावर खूष होण्यासाठी आमचा जन्म नव्हे. आम्ही येथून निसटून गेलो, तर पुन्हा आपल्या उद्योगाला लागू. नाही गेलो तर जी माणसे गेली आहेत, ती लागतील. एवंच, आम्ही आरंभलेला उद्योग काही थांबून पडणार नाही. तरी आपण याबद्दल दिलगिरी करण्यात अर्थ काय? बादशहाच्या मनात काय आहे ते आज दरबारी दिसले. त्याच्या मनीचा मनसुबा असा की, आम्ही एखाद्या शिलेदाराप्रमाणे त्याच्या दरबारी राहावे. आपण एकदा पडत्या फळाची आज्ञा आणून द्या, की आम्ही त्या घटकेस आग्रा सोडतो. आपण आमच्या उपयोगी पडावयाचे तर एवढेच करावे की, आम्हाला दिल्लीस आल्यासारखे येथील गरीबगुरिबांना, फकीरसाईंना, उदासी कबीरपंथी लोकांना, गोसाव्या-

बैराग्यांना आमचे स्मरण राहावे म्हणून निरनिराळ्या धर्मशाळातून, मशिदीतून वगैरे मेवामिठाई वाटू द्या. आम्ही हलवायांना सांगू; तेथून ते तयार करून आमचेकडे घेऊन येतील. मग आमच्यापैकी कोणीतरी निरनिराळ्या लोकांना वाटून देत जातील. बादशहा आम्हाला जाण्याची अनुमती देईपर्यंत हा क्रम ठेवू. गरीबगुरिबांचा आशीर्वाद तरी घेऊ."

* * *

## २८. ग्रहणाचा मोक्ष

गेल्या प्रकरणात वर्णन केल्याप्रमाणे महाराज निक्षूनपणे बोलल्यावर, रामसिंग तरी काय उत्तर देणार ? आणि रामसिंगास तरी दरबारात शिवाजीमहाराजांना बादशहाने दिलेली वागणूक पसंत पडली होती असे थोडेच आहे ? बादशहाच्या मनात काही तरी कपट असेलच, अशी त्याला प्रथमपासून भीती वाटतच होती आणि ती भीती दरबारात झालेल्या प्रसंगामुळे खरीच ठरली. याच्यापुढे आपण कसे वागावे या विचारात तो पडला असल्यास नवल नाही. त्याचे वडील राजे जयसिंग यांनी महाराजांना काही धोका पोचणार नाही अशी खातरजमा दिली होती, आणि काही धोका निर्माण झाला तर रामसिंग त्यांची सर्व काळजी घेईल, असे आश्वासन जयसिंगराजांनी महाराजांना दिल्याचे त्याला माहितच होते. दरबारातील विचित्र घटनेमुळे तो धोका आता निर्माण झाला असे त्याला वाटले. त्यामुळे आपण काय करावे या विचारात तो पडला. महाराजांच्याबद्दल त्याच्या मनात पहिल्यापासून आदर होता, हे वाचकांस माहितच आहे. महाराजांना काही धोका पोचणार असल्यास त्यांना वेळीच सावध करण्याची, एवढेच नव्हे तर, त्याच्या वडिलांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे महाराजांचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपल्यावर पडल्याची जाणीव त्याला झाली असल्यास नवल नाही. पण याबद्दल तरी तो महाराजांच्या आताच्या प्रक्षुब्ध स्थितीत काय बोलणार ? तो काही वेळ तसाच बसला आणि मग निघून गेला.

बादशहाने दरबार बरखास्त केल्यावर जी ती सरदार मंडळी आपापल्या स्थानी गेली. पण परत जाताना, प्रत्येकाच्या मनात दरबारात घडलेल्या अकल्पित प्रसंगाशिवाय दुसरा विषय कोणता असणार? जो तो आपापल्या मनोधारणेप्रमाणे महाराजांच्या वागणुकीबद्दल टीका अगर स्तुती करीत होता. जे कडवे मुसलमान होते, त्यांना बादशहाने शिवाजीसारख्या दरोडेखोराला ज्या तऱ्हेने वागविले, त्यात बादशहाची काही चूक वाटत नव्हती. पण जे शाहाणे आणि समंजस मुसलमान होते, त्यांना बादशहाचे वर्तन मुळीच आवडले नाही. ते महाराजांची योग्यता जाणत होते. महाराजांच्यासारख्या मोठ्या पाहुण्याला बोलावून त्याच्याशी असे अपमानकारक वागणे समजुतदार मुसलमानांना पसंत पडणे शक्य नव्हते. पण औरंगजेबासारखा कपटी बादशहा असे न करील तरच त्यांना आश्चर्य वाटले असते. शिवाजीमहाराजांनी सर्पाच्या शेपटीवर पाय दिला आहे, तेव्हा शिवाजीमहाराजांना कठीण दिवस आले आहेत असा विचार मात्र त्यांच्या मनात आला; पण तो उघडपणे उच्चारण्याची सोय नव्हती. कारण, कुणा तरी चुगलखोराने ते ऐकून बादशहाकडे चुगली गेल्यास, आपल्या घरादारावर गाढवाचा नांगर फिरण्याची त्यांना भीती वाटत होती. जे हिंदु सरदार होते, त्यांनी महाराजांच्या धिटाईचे व स्वाभिमानाचे मनःपूर्वक अभिनंदन केले. पण कुटिलपटू औरंगजेब शिवाजीमहाराजांच्या दरबारातील वर्तनाबद्दल काही तरी धोकादायक कारस्थान रचल्याखेरीज राहणार नाही याबद्दल त्यांना मनोमन खात्री वाटत होती; आणि त्याचमुळे शिवाजीमहाराज आता औरंगजेबावर कशी मात करू शकतील याबद्दल हिंदु सरदार-दरकदारांना चिंता वाटत असल्यास नवल नाही. दरबारात शिवाजीमहाराजांनी जो प्रभावी बाणेदारपणा दाखविला त्याचा बोलबाला आग्रा शहरात ताबडतोब झाला असल्यास नवल नाही. काही घटकापूर्वी दख्खनच्या राजाचे दर्शन घेण्यासाठी आग्रा शहर लोटले होते. आग्रा शहराच्या लहानमोठ्या पौरजनांना शिवाजीमहाराजांच्या दरबारातील जाज्वल्य स्वाभिमानाची प्रचीती दिसून आल्याने, ते सर्व आश्चर्याने दिङ्मूढ झाले. आग्रा शहरात चर्चेचा एकच विषय झाला--शिवाजीमहाराजांनी औरंगजेबाच्या दरबारात दाखविलेली तेजस्विता, स्वतंत्र राजाची अस्मिता!

शिवाजीमहाराजांनी आपल्या बरोबरीच्या बऱ्याच लोकांना स्वदेशी जाण्यास सांगितले खरे, पण ते सर्वच आपल्या पूज्य विभूतीला सोडून कसचे लांब जातात! कोणी वेषांतर करून आग्रा शहरात राहिले, तर कोणी शहराच्या बाहेर पण नजिकच कोठे तरी राहून महाराजांच्या उपयोगी पडण्याच्या संधीची वाट पाहत राहिले.

असे दिवसामागून दिवस गेले. शिवाजीमहाराजांचा गरीबगुरिबांना, मुल्लामौलवींना, फकीरांना मेवामिठाई वाटण्याचा उपक्रम चालूच राहिला. दरबार झाल्या दिवसापासून औरंगजेबाने फौलादखान नावाच्या सरदाराच्या हाताखाली पाच हजाराची फौज देऊन महाराज राहत असलेल्या वाड्यास वेढा घातला होता. त्यामुळे महाराजांना तेथून आपली सुटका करून घेणे अशक्यच करून ठेवले. रामसिंग पूर्वीप्रमाणे नित्य दोन वेळा महाराजांची खुशाली विचारण्यासाठी येतच असे. त्याच्यावर त्याचे वडील जयसिंगराजे यांनी महाराजांच्या संरक्षणाची जबाबदारी टाकलेली असल्याने, तो अगदी सतत डोळ्यात तेल घालून महाराजांना जपत होता. औरंगजेब केव्हा दगा करील याचा त्यालाही भरवसा नसल्याने तो फार जागरूकपणे वागत होता. महाराजांच्या संरक्षणाचीच नव्हे, तर महाराजांची आग्र्याहून कशी सुटका होईल याची चिंता सुद्धा त्याला लागलेली होती. शिवाजीमहाराजांचा आपली सुटका करून घेण्याबाबत काय मनसुबा आहे, याचा कोणालाच थांगपत्ता लागणे शक्य नव्हते.

शिवाजीमहाराजांना रामसिंगाच्या वाड्यातील नजरकैद किती मनस्ताप करणारी झाली असेल, याची कल्पनाच केलेली बरी. आपणास याच वाड्यात मरेपर्यंत कुजत पडावे लागणार काय? आणि मग आपण उभारलेल्या स्वराज्यमंदिराचे पुढे कसे होईल याची चिंता त्यांना सतत लागून राहिली होती. दरबारात घडलेला प्रकार मातुःश्री जिजाबाईसाहेबांच्या कानांवर गेल्यावर त्यांना काय वाटले असेल? महाराष्ट्रातील आपला मुत्सद्दी अधिकारीवर्ग आता या दारूण प्रसंगात काय धोरण ठरवितील बरे? आपल्यावर झालेल्या अपमानाचे उट्टे काढण्यासाठी मराठी सेना उतावळी तर करणार नाही ना? असे अनेक विचार त्यांच्या मनात येत होते.

औरंगजेबासारख्या प्रबळ शत्रूशी, मला सोडविण्याकरता म्हणून का होईना, पण मराठी सेनेने घाई करणे किती घातक ठरणार आहे, याचा विचार योग्य तऱ्हेने होईल अगर कसे? असे अनेक विचार महाराजांच्या मनाला सतावीत होते. पण त्यांचा जगदंबेच्या दृष्टांतावर आणि रामदासस्वामींच्या आश्वासनावर संपूर्ण विश्वास होता. सिंहाच्या गुहेत आपणास शिरावे लागणार आणि तेथून आपण आपली सुटका करून घेणार, असा भवानीमातेचा दृष्टांत होता. तेव्हा आपण आपली सुटका करून घेण्याची काय युक्ती योजली पाहिजे याचा विचार महाराजांच्या मनात मनस्वीपणे वावरू लागला. पण ते विचार करण्यात फार काळ दवडीत नसत. त्यांचा निर्णय लवकर होत असे. आणि त्यांनी आपल्या मनाशी काही ठरवून त्यांच्याजवळ असलेल्या अत्यंत स्वामिनिष्ठ व विश्वासू मंडळींना आपला विचार सांगून आपल्या पुढील बेताची रूपरेखा समजावून दिली.

महाराजांचा मोठमोठ्या टोपल्यातून मेवामिठाई पाठविण्याचा उद्योग चालूच होता. हा रोजचा प्रकार झाल्याने टोपली विशेष बारकाईने कोणी तपासीत नसल्याचे महाराजांच्या निदर्शनास आले होते. असे काही दिवस गेल्यावर शिवाजीमहाराज आजारी पडल्याची वार्ता पसरली. त्यांचे औषध आणण्याकरता त्यांच्या नोकरास बाहेर जाण्यास रामसिंगाने परवानगी मिळवून दिली; आणि त्यामुळे महाराजांच्या नोकरांची बाहेर ये जा जास्त वाढला. एके दिवशी तर महाराजांची प्रकृती जास्तच बिघडल्याचे वर्तमान सर्वत्र झाले. महाराज बरे होण्यासाठी प्रार्थना करावी म्हणून मोठ्या प्रमाणात दानधर्म व मिठाईरूपे अन्नदान सुरु करण्यात आले. याच संधीचा फायदा घेऊन एका मेवामिठाईच्या टोपल्यातून संभाजीराजांस महाराजांनी प्रथम बाहेर पाठविले आणि मग आपल्या गादीवर आपल्या एका विश्वासूक नोकरास निजवून ते दुसऱ्या एका पेटाऱ्यात बसून वाड्याबाहेर पडून आपल्या बरोबरीच्या सोबत्यांसह आग्रा शहराबाहेर पडले. महाराज व संभाजीराजे गेल्यावर महाराज झोपले होते, त्या महालातील हालचाल जराशी मंदावली होती. यामुळे पहारेकऱ्यांना थोडा संशय आला. पण महाराजांचा बिछाना मोकळा

नव्हता. एक व्यक्ती त्यांचे सर्व कपडे पेहरून आणि त्यांचे पांघरूण डोक्यावरून घेऊन निजलेली पाहून पहारेकऱ्यांना आपला संशय चुकीचा होता असे वाटले असल्यास नवल नाही. पण असे किती वेळ चालणार? महाराजांच्या महालातील ये जा फारच कमी दिसलेली पाहून, पहारेकऱ्यांस पुनः संशय आला आणि तो त्यांनी फौलादखानास बोलून दाखविला. त्याबरोबर धावत्न जाऊन फौलादखान तेथे आला, आणि बिछान्यावरील पांघरूण बाजूला करून पाहतो, तो काय? महाराज निजलेले नसून, त्यांचा एक विश्वासू नोकर महाराजांचे सोंग घेऊन निजलेला. हे दृश्य पाहताच फौलादखानाची बोबडीच वळली. पिंजऱ्यातून पोपट पळाला, असे बादशहाला कळताच तो आपली गठडी वळल्याशिवाय खास राहणार नाही याची त्याला खात्री होतीच. त्याने शिवाजीमहाराजांना शिव्यांची लाखोली वाहिली, पण महाराज आपल्या हातावर तुरी देऊन पळाल्याचे वृत्त त्याला औरंगजेब बादशहाला जाऊन सांगावे लागलेच. ते वृत्त कळताच खुनशी व कपटी औरंगजेब किती खवळला असेल याची कल्पनाच केलेली बरी. त्याच्या राज्यास गदगदा हालविणाऱ्या शिवाजीमहाराजांवर सूड उगविण्याच्या त्याच्या कल्पना धुळीस मिळाल्या. आपल्या बुद्धिमत्तेच्या आणि मुत्सद्देगिरीच्या व स्वामिनिष्ठ नोकरांच्या बळावर शिवाजीमहाराजांनी औरंगजेबाचा नक्षा उतरविला, असेच आग्रा शहराला वाटले असल्यास नवल नाही. ता. १७ ऑगस्ट १६६६ (श्रावण वद्य द्वादशी, शके १५८८) या दिवशी शिवाजीमहाराजांनी आपली सुटका करून घेतली.

औरंगजेबाने शिवाजीमहाराजांना जिवंत अगर मृत पकडण्यासाठी चारी दिशांना आपले सैनिक पिटाळले; पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. शिवाजीमहाराजांच्या आग्रा शहराबाहेर असलेल्या स्वामिनिष्ठ नौकरांनी त्यांना लांब नेले. इतिहास सांगतो, की त्यांना बैराग्याचा वेष घ्यावा लागला आणि रामदासस्वामींनी अगोदरच भाकित केल्याप्रमाणे त्यांना तीर्थयात्रा करीत करीत महाराष्ट्र गाठावे लागले. या तीर्थयात्रेत ते मथुरेला गेले होते आणि तेथे त्यांना माता रणदेवीने आश्रय दिला असल्यास नवल नाही. अशी तीर्थयात्रा करीत करीत महाराज

कैदेतून सुटल्यावर दोन महिन्यांनी महाराष्ट्रात आले, आणि त्यांच्या मागचा औरंगजेबाचा ससेमिरा संपला. श्री स्वामी-रामदासमहाराज यांचीही तीर्थयात्रा तेव्हाच साहजिकपणे संपून, ते महाराष्ट्रात आले. नंतर झालेल्या या मातबर गुरुशिष्यांच्या अपूर्व व अवर्णनीय भेटीचे वर्णन कोण करू शकणार ? रामदासस्वामींनी या पुस्तकाच्या प्रारंभीच वर्णिलेले स्वराज्य-सूर्याचे ग्रहण शिवाजीमहाराजांनी आपल्या बुद्धिबलाच्या जोरावर दूर सारून स्वराज्यसूर्य जास्त तेजस्वी केला.

समाप्त

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र ...९२२... दिनांक ......
विभाग ...किशोर क्र. ..४१९.